|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ३३ सोमवार दि. ०९ ऑगस्ट २०२१ ते रविवार दि. १५ ऑगस्ट २०२१ पाने : ४ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com


ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## परप्रांतीय गुन्हेगार मोकाट सुटले महिलेची हत्या करून दागिने लुटले

मुंबई/क्राईम रिपोर्टर

परप्रांतातून मुंबईत येऊन खून दरोडे आणि लुटमार करणाऱ्या गुन्हेगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून हे लोक कधी कारागीर बनून तर कधी घरगडी बनून मुंबई आणि आसपासच्या परिसरात येतात. थोडे दिवस इमानदारीने काम करतात आणि नंतर मालकाची तिजोरी साफ करून किंवा त्याला ठार मारून आपल्या मुळगावी परत जातात. तर काही गुन्हेगार फक्त ...पान २ वर

## कशी करावी रुग्णांनी आता कोरोनाच्या भयंकर संकटावर मात बनावट औषधांच्या रॅकेटमध्ये अन्न व औषध प्रशासनाचा हात?




लातूर/राम पोटोळे

'सय्या भये कोतवाल तो अब डर काहे का' असाच काहीसा प्रकार सध्या अन्न व औषध प्रशासन विभागाचा आहे. कोरोनाच्या काळात रेमडेसिवीर सारया औषधांचा काळा बाजार सुरु होता औषध विक्रेत्यांनी या औषधांची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण केली होती आणि साडेतीन हजारांचे हे इंजेक्शन ४० हजारांना विकले जात होते. या इंजेक्शंची मागणी वाढल्यामुळे चक्क मेडिकलमधून बनावट रेमडेसिवीर इंजेक्शन विकले जात होते. उदगीर मधील उदयगिरी रुग्णालयात तर डॉक्टर लोकांनीच पेशंटना बनावट इंजेक्शन विकली आणि त्यात एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला.




अन्न व औषध प्रशासन मंत्री राजेंद्र शिंगणे

आजही लातूर जिल्ह्यातील २१००हून अधिक मेडिकल स्टोरमध्ये कोरोना प्रतिबंधक बनावट औषधे विकली जात असल्याचा लोकांना संशय आहे आणि या बनावट औषधांमुळे जिल्ह्यातील हजारो रुग्णांवर मृत्यूची टांगती तलवार लटकत आहे. पण बनावट रेमडेसिवीर इंजेक्शन विकल्या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊनही अजून कुणालाही अटक झालेली नाही. उलट पोलिसांनी या प्रकरणातील आरोपींना (४१अ)ची नोटीस बजावून एक प्रकारे त्यांना पाठिशी घातले आहे. बनावट औषधे विकणे हा कायद्याने गुन्हा असून अशा गुन्ह्यात जन्मठेपेपर्यंतची शिक्षा होऊ शकते. पण जिल्ह्यातील मेडिकल स्टोरवाले आणि अन्न व औषध प्रशासन विभागाचे आर्थिक साटेलोटे असल्याने बनावट औषधे विकणाऱ्या कुठल्याही मेडिकल स्टोरवर अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई केलेली नाही. बनावट रेमडेसिवीर हॉस्पिटल मधील डॉक्टरांनीच विकल्याचे एवढे मोठे प्रकरण 'क्राईम संध्या' वृत्तपत्राने उघडकीस आणले तरीही या बाबत अन्न व औषध प्रशासन विभाग कारवाई करायला तयार नाही. 'आमच्याकडे तक्रार आल्याशिवाय आम्ही कुणाचीही चौकशी करणार नाही' असे या विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन बुगड यांनी सांगितले. पण टपरीवरचा गुटखा किंवा तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक करणाऱ्या गाड्या आणि साठवणूक करणारी गोदामे यांच्यावर जेंव्हा धाड टाकली जाते तेंव्हा या धाडीच्या सर्वच प्रकरणांमध्ये अन्न व औषध विभागाकडे तक्रारी आलेल्या असतात का? मग तक्रारी न येताच त्यांच्यावर धाडी टाकल्या जातात. मग सामान्य माणसांचा जीव घेणाऱ्या बनावट इंजेक्शन विकल्या प्रकरणी पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल होऊनही या प्रकरणाची अन्न व औषध प्रशासन विभाग चौकशी का करीत नाही? असा प्रश्न लातूरकर जनता विचारीत आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाची कोरोना काळात मोठी जबाबदारी होती. ज्या ज्या ठिकाणी औषधांमध्ये भेसळ होत असल्याच्या घटना उघडकीस येत होत्या त्या त्या ठिकाणी या विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाडी टाकून बनावट औषधे इंजेक्शन जप्तत करायला हवी होती. पण बनावट औषधे विकण्याच्या या रॅकेटमध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारीच सामील असल्याने कोरोना काळात खाजगी हॉस्पिटल आणि मेडिकल स्टोरवाल्यांनी बेधडक बनावट औषधे विकून लोकांचा जीव तर घेतलाच, पण उपचाराच्या नावाखाली कोट्यावधी रुपये उकळून मालामाल झाले. त्यामुळे उदगीरमध्ये सापडलेल्या आणि ९० हजारांना डॉक्टरांनीच रेमडेसिवीर इंजेक्शन विकलेल्या या प्रकरणाची ...पान २ वर

### कारवाई करायला आम्हाला भीती वाटते -सचिन बुगड

बाजारामध्ये सध्या काही बनावट औषधे आणि इंजेक्शन विकली जात आहेत. मात्र हे एक मोठे रॅकेट असून आमच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने आम्हाला कारवाई करायला भीती वाटते असा हास्यस्पद खुलासा अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन बुगड यांनी केला आहे, त्याची या विभागाचे मंत्री राजेंद्र शिंगणे यांनी दाखल घ्यावी. अन्न व औषध विभागाचे बडे अधिकारीच जर बनावट औषधे विकणाऱ्यांना इतके घाबरणार असतील तर प्रत्येक मेडिकल स्टोरमध्ये केवळ कोरोना प्रतीबंधकच नाही, तर हार्ट, किडनी, कॅन्सर, ब्रेन, टीबी यासारख्या आजारांची हि बनावट औषधे विकली जातील. अन्न व औषध प्रशासनाची हि भूमिका म्हणजे मेडिकल स्टोरवाल्यांना आणि खाजगी हॉस्पिटलना मृत्यू विकण्याचा परवानाच म्हणवा लागेल अशी संतप्त प्रतिक्रिया लातुरांनी व्यक्त केली आहे.

## प्रियकराच्या प्रेमात भान हरपून गेले सुपारी देऊन पत्नीने पतीला ठार केले





भिवंडी/राजेंद्र वेदांते

अनैतिक संबंधात एकदा का माणूस गुरफटला कि मग त्याला कुणाचीही परवा नसते आणि ज्या चंचल बायका असतात त्यांचे जर एखाद्याशी लफडे असेल तर प्रियकरासाठी त्या पतीचाही काटा काढायला मागे पुढे पाहत नाहीत. भिवंडीत अशाच एका चंचल विवाहितेला पैसेवाल प्रियकर मिळताच तिने पतीकडे घटस्फोटासाठी तगादा लावला. पण तो घटस्फोट द्यायला तयार नव्हता. त्यामुळे त्याला मार्गातून हटवण्याचा निर्णय तिने घेतला आणि आपली मैत्रीण व प्रियकराच्या मदतीने एक लाखांची सुपारी देऊन तिने पतीचा काटा काढला आणि आपल्यावर संशय येऊ नये म्हणून स्वतःच पती हरवल्याची पोलिसांकडे फिर्याद नोंदवली. पण पोलिसांच्या चाणाक्ष नजरेतून तिचा बनाव सुटला नाही. पोलिसांच्या चौकशीत अखेर तिला तिचा गुन्हा कबुल करावाच लागला.

१ ऑगस्ट रोजी मुंबई-नाशिक महामार्गावर उभ्या असलेल्या एका ओला कारमध्ये मृतदेह असल्याची खबर भिवंडीतील नारपोली पोलिसांना मिळाली आणि भिवंडीतील पोलीस यंत्रणा कामाला लागली. तपास पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. एका बंद ओला कार मध्ये कार चालक निपचित पडला होता. तो कोण? कुठला? इथे कसा? कार मध्ये हा कार चालक मयत झाला आहे की, याला कुणी संपवलं? तपास यंत्रणेच्या समोर असे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. ते प्रश्न पोलीसांनी सोडवले तेंव्हा एक धक्कादायक माहिती समोर आली आणि तपास पथक गोंधळून गेले. मुंबई-नाशिक महामार्गावर भिवंडी ठाणे बायपास रस्त्यावरील माणकोली नाका येथे एका कारमध्ये तो मृतदेह आढळला होता. महामार्गावरील माणकोली परिसरात उड्डाणपुलाच्या खाली उभ्या असलेल्या व्हॅगन आर कारच्या ड्रायव्हरचा हा मृतदेह होता. या घटनेची माहिती स्थानिक नारपोली पोलिसांना समजताच त्यांनी घटनास्थळी जाऊन मृतदेहाची बारकाईने तपासणी केली असता मृतदेहाच्या गळ्याभोवती आवळल्याचे व्रण दिसल्याने ही हत्या असल्याचे निष्पन्न झाले आहे.नारपोली पोलीस आणि गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस या गुन्ह्याचा संयुक्तपणे तपास करीत होते. या ओला चालकाची ओळख पटवण्यासाठी पोलीस प्रथम प्राधान्य देत पोलीसांचा तपास सुरू झाला होता. सर्वत्र ओला कार चालकाच्या मृतदेहाचे छायाचित्रासह प्रसार माध्यमातून ही ओला कार चालकाची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न करीत होते.एकदा का ओळख पटली की त्याच्या मारेकऱ्यांपर्यंत पोहचणे ...पान २ वर

## एकतर्फी प्रेमाचे सुडात रुपांतर झाले माथेफिरू प्रेमवीराने तिला बदनाम केले

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

एखाद्या तरुणीवर एकतर्फी प्रेम करणाऱ्या माणसाला त्या तरुणीने प्रतिसाद दिला नाही कि मग तो तिच्यावर सूड उगवण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो. आजवर प्रेमभंग झालेल्या अशा कित्येक तरुणांनी एकतर्फी प्रेमातूनत्यांना भाव न देणाऱ्या तरुणींवर ॲसिड हल्ला केलाय. तर काहींनी एकतर्फी प्रेमातून खूनही केले आहेत. औरंगाबादमध्ये तर एका प्रेमवीराने त्याला आवडलेली मुलगी त्याला भाव देत नसल्याने चक्क तिला बदनाम करण्यासाठी तिचे बनवत फेसबुक खाते उघडून तिच्या नावाने चॅटिंग करू लागला. हा भयंकर प्रकार त्या मुलीला समजताच तिने सायबर सेलकडे धाव घेतली आणि अखेर हा भामटा पोलिसांच्या हाती लागला.

एका कौटुंबिक सोहळ्यात उपस्थित असलेल्या तरुणीवर त्याचे एकतर्फी प्रेम जडले. त्यामुळे त्याने तिच्याशी बोलण्याचा हट्टच धरला. मात्र तरुणी देखील जिद्दी होती. तिने त्याच्याशी बोलण्याचा नकार कायम ठेवला. त्यानंतर त्याने तिचा मोबाईल क्रमांक मिळवला. तिचे बनावट फेसबुक खाते त्याने तयार केले. त्या बनावट खात्यावर त्याने तरुणीचा मोबाईल क्रमांक व्हायरल आणि अश्लिल फोटो अपलोड करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच तो थांबला नाही तर त्याने अनेक मुलांसोबत चॅटींग सुरु केली. तरुणी आपल्यासोबत चॅट करत असल्याचे बघून अनेकांनी त्याला प्रतिसाद देखील दिला. ...पान २ वर

## अण्णाभाऊंच्या जयंती वरून झाला दोन गटात राडा प्रतिस्पर्ध्यांनी पाडला मामा भाच्यांच्या रक्ताचा सडा

सांगली/क्राईम रिपोर्टर

दोन गटातील वाद जर लवकर मिटले नाहीत तर त्यातून दुष्मनी आणखी वाढत जाते आणि त्यातून कधी तरी मोठा राडा होऊन रक्ताचे पाट वाहतात. सांगली जिल्ह्यातील दुधोंडी गावात असाच प्रकार घडला. दोन शेजाऱ्यांमध्ये वाद होता आणि दोन्हीकडचे तरुण त्या भागात आपलेच वर्चस्व राहावे यासाठी दादागिरी दाखवत होते. दरम्यान अण्णाभाऊ साठे यांची जयंती कशाप्रकारे आणि कोणी साजरी करायची यावरून दोन्ही गटात राडा झाला. यावेळी लाठ्या काठ्या आणि तलवारी चॉपरचा वापर करण्यात आला. या राड्यात दोन सख्खे भाऊ आणि त्यांचा मामा असे तिघांचे मुडदे पडले. या प्रकरणी पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे.





पलूस कुंडल जवळील दुधोंडी येथील वंसतनगर परिसरात मातंग वसाहत आहे. या वसाहतीत सनी आत्माराम मोहिते, विकास आत्मराम मोहिते आणि त्याचा मामा अरविंद बाबुराव साठे हे मांतग वसाहतीत राहयला आहेत. त्याच वसाहतीत प्रवीण मोहिते, आदित्य मोहिते, विजय मोहिते, प्रकाश मोहिते हे ही त्याच्या शेजारीच राहयला आहेत. या दोन मोहिते कुंटूंबात गेल्या काही माहिन्यापासून एका घटनवेरून वाद झाला होता. त्यावेळी हा वाद जास्तच चिघळला होता. त्यावेळी प्रवीण मोहिते याला सनी मोहिते आणि विकास मोहिते यांनी जबर मारहाण केली होती. याचा राग प्रवीण मोहिते याला होता. मांतग वसाहतीत सनी मोहिते आणि विकास मोहिते याचे वर्चस्व होते. त्याची दादागिरी तेथे चालत होती. ते म्हणतील ते सर्व समाजाने मान्य करायचे किंवा ते सांगतील तसे करायचे हा जणू अलखित नियमच बनला होता. विकास आणि सनी मोहिते यांनी प्रवीणला मारहाण केल्याने प्रवीण हा त्याचेवर चिडून होता. कोणताही सण उत्सव हा सनी आणि विकास मोहिते याच्या सांगण्यावरूनच मांतग ...पान २ वर

## झोपण्याच्या जागेवरून दोघांमध्ये भांडण झाले एका भिकाऱ्याने दुसऱ्या भिकाऱ्याला ठार केले

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



आजकाल भिकारीही इतके मुजोर झालेत कि त्यांना कुणी उलट बोललेले सहन होत नाही. काही भिकाऱ्यांनी तर मोडकळीस आलेल्या इमारतीत किंवा बांधकाम सुरु असलेल्या जागेत आपला निवारा शोधलाय आणि ती जागा जणू काही आपल्या बापाच्याच मालकीची आहे अशा रुबाबात ते तिथे राहत असतात. कोल्हापुरातील पद्मा टोकीज परिसरात बांधकाम बंद पडलेल्या एका जागेत दोन भिकारी राहायचे. दिवसभर हमाली करून किंवा भिक मागून रात्री तिथे झोपायला यायचे आणि याच जागेवरून त्यांच्यात वाद झाला आणि एकाने दुसऱ्याला १५ फुटावरून खाली फेकले त्यात त्या भिकाऱ्याचा मृत्यू झाला. त्यानंतर स्थानिकांनी आरोपी भिकाऱ्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

कोल्हापूर शहरात ही दिवसे दिवस फिरस्त्यांची संख्या वाढत आहे. कुणीही कुठून येतो आणि जागा मिळेल तेथे राहणे, दाढी गळ्यापर्यंत वाढलेली शर्ट पॅन्ट मळकटलेले अस्थाव्यस्था, हातात फाटकी तुटकी पिशवी त्यात खराब कपडे, पाण्याची बाटली घेऊन रस्त्यात भीग फिरणे एवढाच त्याचा उदयोग असतो. शहरातील बंद पडलेल्या दुकानासमोर अथवा बांधकाम बंद ...पान २ वर

## दारूच्या नशेत कुटुंबातील भानगडींना खेचले चिडलेल्या मित्राने मित्रालाच दगडाने ठेचले



नाशिक/क्राईम रिपोर्टर

दारूची नाश खूप वाईट असते. एकदा का ती डोक्यात गेली कि माणसाला त्याची शुद्ध राहत नाही, तो काहीही बडबडतो. कुणालाही शिवीगाळ करतो. अगदी मित्राची किंवा नातेवायीकाचीही परवा करीत नाही. नाशिक जवळच्या अवताळे गावातील जगदीश असाच होता. त्याला त्याचा मित्र दारू पिण्यासाठी घेऊन गेला, पण तिथे त्या दोघांचे दारूच्या नशेत भांडण झाले. यावेळी चिडलेल्या मित्राने जगदीशच्या डोक्यात दगड घालून त्याला ठार मारले आणि पळून गेला. मात्र पोलिसांनी मोठ्या कौशल्याने तपास करून त्याच्या मुसक्या आवळल्या.



जगदीश मंगल भोये, विष्णू बाळू बागुल आणि गणेश शंकर गावित हे तिघे मित्र होते. नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी तालुक्यातील अवताळे या गावी ते रहात होते. तिघा मित्रांना दारु पिण्याचे भारी व्यसन होते. तिघे मित्र सोबतच मजुरी करण्यासाठी जात होते. काम आटोपून घरी परत ...पान ६ वर

## भाच्याला बनवले आपला यार मामानेच केले मामीला ठार

जळगाव/क्राईम रिपोर्टर



वासनेच्या आहारी गेलेल्या माणसाला फक्त इच्छापूर्ती करून घ्यायची असते. अशावेळी तो नाती गोती सुद्धा पाहत नाही आणि नात्यातल्या या अनैतिक संबंधातून माणसाला कधी कधी प्राणही गमवावा लागतो. रावेर तालुक्यातील पालमध्ये अशाच एका घटनेत साधू मानसिंग बारेला याच्याकडे मध्य प्रदेशातून त्याचा दूरच्या नात्यातला भाचा पाहुणा म्हणून आला होता. साधू हा आदिवासी समाजाचा आहे आणि आदिवासी समाजात पुरुष व महिला एकत्र बसून दारू पितात. त्या दिवशी साधू त्याची पत्नी सायजाबाई आणि भाचा भायला एकत्र दारू प्यायला बसले होते. यावेळी भायलाने साधूला दारू आणायला पाठवले, तर मुलीला चॉकलेट आणायला पाठवले आणि त्यानंतर साधूच्या पत्नीशी शृंगार चाळे करू लागला. मात्र त्याच वेळेस साधू घरात आला आणि त्याने दोघांना नको त्या अवस्थेत पाहताच तो चिडला आणि त्याने पत्नीला लाकडी दांडक्याने बदडून काढले यात तिचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर साधू व भायला पळून गेले. मात्र पोलिसांनी दोघांनाही मध्य प्रदेशातून अटक केली आहे.

पतीला दारू, तर मुलीला चॉकलेट आणण्यासाठी बाहेर पाठवून विवाहितेशी लैंगिक संबंध ठेवताना आढळल्याने पतीने ...पान २ वर

## उसन्या पैशाच्या वादात मैत्रीचा पुसला टिळा दारूच्या नशेत मित्रानेच चिरला मित्राचा गळा





आरोपी सुरज






बेळगाव/क्राईम रिपोर्टर

मैत्रीत खरे तर पैशाचे व्यवहार करू नये आणि उसनवार जरी केली असली तरी घेतलेले पैसे वेळेवर द्यावेत अन्यथा मैत्रीही तुटते आणि पैशाच्या वादातून जिवलग मित्रही एकमेकांचे शत्रू बनतात. बेळगावमध्ये सुरज आणि महादेव हे दोन गवंडी एकमेकांचे जिवलग मित्र होते. मात्र सुरजने महादेवकडून उसने घेतलेले दोन हजार रुपये परत करीत नसल्याने त्या दोघांमध्ये वाद झाला. हा वाद सूरजच्या घरापर्यंत आला. त्यामुळे चिडलेल्या सुरजने महादेवची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी आरोपी सुरजला पोलिसांनी अटक केली आहे.

महादेव मारूती जाधव हे मुळचे कोल्हापूर जवळील आंबेवाडी येथील असून ते सध्या भारतनगर येथील आपल्या बहिणीकडे राहयला आहेत. बेळगाव शहर परिसरात ते गंवडी काम करीत होते. त्यांना दारू पिण्याची सवय होती. गंवडी काम करीत असताना त्याची ओळख ही नाझरे कॅप वडगाव येथे राहत असलेल्या सुरज पुंडिलक केदारीचे याच्याबरोबर झाली. तो ही महादेव जाधव याच्याबरोबरच गंवडी काम करीत होता. ते दोघे, एकत्र काम करीत ...पान ६ वर

09 TO 15 AUGUST 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 07/08/2021 9:09 PM Page 1



पान १ वरून....

## कशी करावी रुग्णांनी आता कोरोनाच्या...

अन्न व औषध प्रशासन मंत्री राजेंद्र शिंगणे यांनी चौकशी करावी अशी मागणी लातूरच्या जनतेने केली आहे. ज्या उदयगिरी हॉस्पिटलमध्ये डॉक्टर लोकांनीच बनावट इंजेक्शन विकली आणि एका वृद्ध कोरोना बाधित महिलेचा जीव घेतला त्याबद्दल अन्न व औषध प्रशासन विभागाने हात झटकले आहेत. परंतु उदयगिरी रुग्णालयाला कोव्हीड सेंटर म्हणून परवानगी दिलेली होती का? विशेष म्हणजे ज्या नामांकित कंपनीचे लेबल लाऊन ही बनावट रेमडेसिवीर औषधे विकण्यात आली त्या कंपनीने पेशंटच्या नातेवायीकांना ई-मेल पाठवून ती औषधे बनावट असल्याचे सांगितले होते. तरीही अन्न व औषध प्रशासन विभाग गप्प आहे. या विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन बुगड सांगत आहेत कि आमच्याकडे तक्रार आल्याशिवाय आम्ही कारवाई करणार नाही, म्हणजे लातूरच्या २१०० मेडिकल स्टोर मधून बनावट औषधे विकली जात असतील आणि त्याने माणसे जरी मेली तरी अन्न व औषध प्रशासन विभाग तक्रार आल्याशिवाय कारवाई करणार नाही. मग चिरीमिरीसाठी गुटखावाल्यांवर कारवाई कशी करता. उदगीरमध्ये विकल्या गेलेल्या बनावट रेमडेसिवीर इंजेक्शनने एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे आणि अजूनही मृत्यूचे हे समान लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या मेडिकल मधून विकले जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे शांताबाई जीवने या कोरोना बाधित वृद्ध महिलेच्या मृत्यू प्रकरणी ज्या प्रमाणे बनावट इंजेक्शन विकणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाला तसाच गुन्हा या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांवर दाखल करून त्यानाही या प्रकरणात सहआरोपी करण्याची मागणी लातूरची जनता करीत आहे. कारण याच लोकांमुळे जिल्ह्यात बनावट औषधे आली आणि मेडिकल स्टोर किंवा डिलर्सकडून ती विकली गेली, त्यामुळे खरे गुन्हेगार हे लोक आहेत.

## प्रियकराच्या प्रेमात भान हरपून...

पोलीसांना शक्य होणार होते. म्हणून पोलीसांनी आपल्या तपासात मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी भर दिला जात होता. चालकाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना करत नारपोली पोलिसांनी अज्ञाता विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. ही हत्या नेमकी कोणी केली, हत्येचं कारण काय, याचा तपास पोलिसांनी सुरु केला. हा तपास चालू असतानाच एका महिलेने आपला पती हरवल्याची तक्रार नारपोली पोलीस ठाण्यात दिली असल्याचे पोलीसांच्या लक्षात आले. बेपत्ता इसम ओला कार चालक होता. असं त्या महिलेने आपल्या तक्रारीत म्हटले होते. आता मात्र या तपासाला गती येणार होती. पोलीसांनी त्या तक्रारदार महिलेस पोलीस ठाण्यात बोलवून घेतले. श्रृती प्रभाकर गंजी (वय ३२ राहणार, पद्मानगर भिवंडी) असे तिचे नाव आहे. पोलीसांनी तिच्याकडून पुन्हा एकदा तिचा पती प्रभाकर पांडू गंजी (वय ४०) कधी? कसा? बेपत्ता झाला याची माहिती घेतली. दरम्यान ओला कार मध्ये मिळालेला तो मृतदेह ही पोलीसांनी श्रृतीला दाखवला. तेंव्हा तिच्या चेह-हावरचे रंग उडाले होते. हा मृतदेह माझ्या पतीचाच असल्याचे तिने पोलीसांना सांगितले. आपल्या पतीचा मृतदेह पाहून तिच्या चेह-हावर दु:खाचा लवलेश ही नव्हता. याच पोलीसांना आश्चर्य वाटले होते. म्हणून तपास पथकाला तिच्यावर संशय आला होता. परंतू ठोस पुरावा हाती नसल्यानेच पोलीसांनी श्रृतीच्या हालचालींवर बारीक नजर ठेवली होती. तिचे मोबाईल लोकेशन व ती कुणाच्या संपर्कात जास्त आहे यावर पोलीसांनी एक नजर टाकली असता पोलीसांचा तिच्यावर संशय अधिकच बळावला होता. म्हणून पोलीसांनी श्रृतीला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलवून घेतले. तेंव्हा सराईत गुन्हेगारासारखे तिने पोलीसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न केला. मला यातील काहिच माहित नाही यावर ती ठाम होती. ती तोंड उघडायला तयार नव्हती. श्रृती खूपच निगरगट्ट होती. परंतू पोलीस पथकही कमी नव्हते. पोलीसांचा तिच्यावर पक्का संशय होता. पतीच्या हत्येमागे श्रृतीचाच हात असल्याची त्यांना पूर्ण खात्री होती. पण श्रृती कबुली देत नव्हती. अखेर पोलीसांनी श्रृतीची सक्तीने चौकशी करण्यास सुरुवात केली. तसे तिचे अवसान गळाले आणि तिने प्रियकरासाठी पतीची हत्या करण्याची सुपारी दिल्याची कबुली दिली. श्रृती आणि प्रभाकर हे पती-पत्नी भिवंडीतील नारपोली भागात राहत होते. प्रभाकर हा यंत्रमाग कारखान्यात व्यवस्थापक म्हणून काम करीत असताना कोरोनामुळे यंत्रमाग कारखाना बंद पडला होता. म्हणून प्रभाकरने आपल्या व्हगेनआर कारला ओलाचे स्वरूप आणून तो हा व्यवसाय करू लागला होता. त्याची पत्नी श्रृती देखणी व सौंदर्याचा जणू टम बॉम्बच होता. परंतू तिच्यामानाने प्रभाकर साधासुधा तरूण होता. ओला कार चालवून तो कुटुबाचा गाढा ओढत होता. श्रृतीचा स्वभाव चंचल होता. ती कुठल्याही अनोळखी व्यक्तीबरोबर ही बोलत होती. याचा प्रभाकरला राग येत होता. त्याने श्रृतीला याबाबत अनेकदा समज दिली होती. तरीही तिच्यात काहीच फरक पडला नव्हता. याच दरम्यान तिची नितेश गोवर्धन वाला (वय २८, राहणार भादवड) याच्याशी ओळख झाली होती. श्रृती मदमस्त नगीना होती. त्यामुळे नितेश तिच्यात गुंतुन गेला होता. तिच्या मादक नजरेत नितेश गुरफटून गेला होता. श्रृतीच्या शरीरावरचे चढ-उतार नितेशच्या नजरेत भरले होते. तसा श्रृतीलाही तो खूप आवडला होता. नितेशचे व्यक्तीमत्व भारदस्त होते. त्याचे तारूण्य सळसळत होते. या दोघांची ओळख झाल्यानंतर श्रृती आणि नितेश चोरी चोरी चुपके चुपके भेटत होते. कालांतराने या दोघांमध्ये अनैतिक संबंध सुरू झाले होते. जिवणाचा खरा आनंद हे दोघे मनमुरादपणे लुटत होते. ते दोघेही ऐकमेकात गुरफटून गेले होते. वेळ मिळेल तेंव्हा आपल्या लैंगिक भावना शमवत हवातेवढा आनंद लुटत होते. श्रृतीने हि गोष्ट आपली खास मैत्रिण प्रिया सुहास निकम (वय ३२, राहणार, वेताळपाडा) हिला सांगितली. प्रियानेही श्रृतीला याकामात मदत करण्याचे आश्वासन दिले. श्रृतीला आता नवरा प्रभाकरचा राग येत होता. त्याला घटस्फोट घेऊन नितेश बरोबर विवाहित होण्याचे स्वप्न ती भर दिवसाही पाहत होती. म्हणून श्रृतीने प्रभाकरकडे घटस्फोट घेण्यासाठी तगादा लावला होता. परंतू प्रभाकर श्रृतीला घटस्फोट देण्यास तयार नव्हता. ऐकीकडे नावडता पती तर दुसरीकडे आवडता प्रियकर या दोघांच्या कचाट्यात श्रृती अडकली होती. तिला कशीही करून प्रभाकर पासून कायमचीच सोडवणूक हवी होती. प्रभाकर हा श्रृतीच्या पायात रूतलेला काटा होता. हा काटा तिला कायमचाच काढून टाकायचा होता. जर प्रभाकर घटस्फोट देत नसेल तर त्याची हत्या करण्याचा कट श्रृती, प्रिया आणि नितेश या तिघांनी रचला होता. हत्येची सुपारी घेऊन काम तमाण करणाऱ्या मारेकऱ्यांना प्रिया ओळखत होती. प्रिया श्रृतीला घेऊन त्यांच्याकडे पोहचली. श्रृतीने आपले दागिने गहाण ठेवून एक लाख रूपये जमा केले होते. ते पैसे तिने मारेकऱ्यांना देऊन कोणत्याही परिस्थितीत प्रभाकरचा मुडदा पाडण्याची विनंती तिने मारेकऱ्यांकडे केली. ३१ ऑगस्ट रोजी रात्री मारेकर्यांनी प्रभाकरला फोन करुन मुंबईला जाण्यासाठी त्याची कार बुक केली. प्रवासादरम्यान मानकोली पुलाखाली त्यांची कार येताच मारेकऱ्यांनी प्रभाकर याला कार थांबवण्याचा इशारा केला. त्याने कार थांबवताच या दोन अज्ञात मारेकऱ्यांनी प्रभाकरची गळा आवळून हत्या केली. तो मृत पावला आहे अशी खात्री पटताच मारेकरी कार मधून बाहेर पडले व आरामात पळून गेले. श्रृतीच्या चौकशीत तिने आपली मैत्रिण प्रिया आणि प्रियकर नितेश याचे नाव घेताच मैत्रीण प्रिया आणि श्रृतीचा प्रियकर नितेश यांना अटक केली असून अटक आरोपींना न्यायालयाने १३ ऑगस्ट पर्यत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार श्रृती असून यातील दोघे मारेकरी अजूनही फरार असून एक विशेष पथक या आरोपींचा कसून शोध घेत असल्याचे नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक मालोजी शिंदे यांनी सांगितले.

## परप्रांतीय गुन्हेगार मोकाट सुटले...

गुन्हा करण्याच्या हेतूनेच दोनचार दिवसासाठी येतात आणि मोठा हात मारून पुन्हा आपल्या गावी जातात. भायंदरमध्ये अशाच तीन परप्रांतीय लुटारुंनी एका महिलेची हत्या करून तिच्या घरातील दागिने व इतर वस्तू मिळून ३५ हजारांचा ऐवज लुटला. मात्र पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे युपीतील बलियामधून या आरोपींना अटक केली. भाईंदर परिसरात गेल्या आठवड्यात एका विवाहित महिलेची निर्घृण हत्या करण्यात आली होती. ही हत्येची घटना समोर आल्यानंतर खऱ्या आरोपींना शोधून काढणं पोलिसांसमोर एक आव्हानच बनलं होतं. चोरीच्या उद्देशानं हत्या केल्याचं प्रथमदर्शनी दिसत होतं. मात्र ही हत्या नेमकी कोणी केली, याच गूढ बनलं होतं. कोणताही पुरावा अथवा साक्षीदार नसल्यानं मारेकरी शोधून काढणं पोलिसांसाठी आव्हानात्मक होतं. पण पोलिसांनी हार मानली नाही. घटनेचा तांत्रिक तपास केला असता गुन्ह्याचे धागेदोरे उत्तर प्रदेशापर्यंत जाऊन पोहोचले आहेत. याप्रकरणी तपास करत असताना पोलिसांनी उत्तरप्रदेशातील बलिया जिल्ह्यांतून तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. विजय चौहान (३०), सुधीरकुमार तुलसी चौहान (१९) व मुन्नी कुलदीप चौहान (३२) असं अटक केलेल्या तीन आरोपींची नावं असून त्यांनी हत्येची कबुली दिली आहे. कोणताही पुरावा हाती नसताना, केवळ तांत्रिक पद्धतीनं तपास करत पोलिसांनी आरोपींना गजाआड केलं आहे. सुमनदेवी लाला शर्मा असं हत्या झालेल्या विवाहित महिलेचं नाव आहे. त्या भाईंदर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोलानगर येथील रहिवासी आहेत. याठिकाणी त्या आपला पती लाला शर्मा आणि भावासोबत वास्तव्याला होत्या. दरम्यान २१ जुलै रोजी पती आणि भाऊ नेहमी प्रमाणे रबर कंपनीत कामाला गेले होते. दुपारच्या सुमारास सुमनदेवी याचं आपल्या पतीशी बोलणं देखील झालं होतं. पण २१ जुलै रोजी पती लाला शर्मा जेव्हा घरी आले, तेव्हा त्यांच्या घराच्या लाइट बंद होत्या. दार उघडून त्यांनी आत प्रवेश केला असता, सुमनदेवी या अंथरूणावर निपचित पडल्या होत्या. तर घरातील सामान अस्ताव्यस्त पडलं होतं. तसेच सुमनदेवी यांच्या अंगावरील दागिने आणि अन्य मौल्यवान वस्तू घरातून गायब होत्या. लाला यांनी आपल्या पत्नीला उठवण्याचा प्रयत्न केला. पण त्या काही जाग्या झाल्या नाहीत. यांनतर त्यांचा मृत्यू झाल्याचं लाला यांच्या निदर्शनास आलं. या प्रकरणी लाला यांनी तातडीनं भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. चोरट्यांनी सुमनदेवी यांच्या गळ्यातील मंगळसूत्र, कानातील कुडी आणि नाकातील नथ या दागिन्यांसह तीन मोबाईल हँडसेट, एटीमएम कार्ड आणि साऊंड बॉक्स असा एकूण ३५ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला होता. यानंतर पोलिसांनी कोणताही पुरावा नसताना केवळ तांत्रिक तपासाच्या आधारावर तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. आरोपींनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली असून चोरीच्या उद्देशानं हत्या केल्याचं त्यांनी सांगितलं आहे. या घटनेचा पुढील तपास भाईंदर पोलीस करत आहेत.

## एकतर्फी प्रेमाचे सुडात रुपांतर झाले...

ऋषिकेश अनिल वायखिंडे (२३) रा. दौंड जिल्हा पुणे असे या तरुणाचे नाव आहे. एमएसस्सी पर्यत शिक्षण झालेला ऋषिकेशने एका कार्यक्रमात हजेरी लावली असता त्याच्या नजरेच्या टप्प्यात ती तरुणी आली. तिला बघून नजरेच्या पहिल्याच टप्प्यात तो घायाळ झाला व तिचा दिवाना देखील झाला. तिच्याशी बोलण्यासाठी त्याने विविध मार्गाने फिल्डींग लावली. मात्र त्यात त्याला अपयश आले. तिचा मोबाईल क्रमांक मिळवण्यात मात्र त्याला यश आले. तिचा मोबाईल क्रमांक मिळताच ऋषिकेशच्या मनाची कळी खुलली. एमएससी झालेल्या ऋषिकेशने तिच्या नावाचे बनावट फेसबुक खाते तयार केले. त्या बनावट खात्यावर त्याने विविध महिलांचे अश्लिल फोटो अपलोड करण्याचा सपाटाच लावला. विविध मुलांसोबत त्याने त्या बनावट फेसबुक खात्याच्या माध्यमातून चॅटींग सुरु केले. आपल्यासोबत तरुणी बोलत असल्याचे भासल्याने अनेक आंबटशौकीन तरुणांनी देखील या चॅटींगला सुरुवात केली. त्या तरुणीचा मोबाईल क्रमांक देखील ऋषिकेशने जाहिर केला. या प्रकाराची माहिती त्या तरुणीला मिळताच त्ला धक्का बसला. तिला प्रचंड मानसिक त्रास सुरु झाला. तिने ग्रामीण सायबर पोलिसांकडे धाव घेत तपास करण्याची विनंती केली. एका महिन्यात सायबर पोलिसांनी प्रयत्नांची पराकाष्टा करत ऋषिकेश अनिल वायखिंडे (दौंड, जि. पुणे) या अवघ्या तेवीस वर्षाच्या तरुणाला जेरबंद केले. ज्या वयात शिक्षण घेऊन भविष्याची वाटचाल करायची त्या वयात त्याला पोलिस कोठडीला सामोरे जाण्याची वेळ आली. ऋषिकेश याने त्या तरुणीचा मोबाईल क्रमांक नातेवाइकांकडून मिळवला होता. त्या क्रमांकावर त्याने सुरुवातीला तिला मेसेज पाठवणे सुरु केले. मात्र तिने त्याला देखील प्रतिसाद दिला नाही. तरीदेखील ऋषिकेशने तिला मेसेज पाठवत संपर्क ठेवण्याचा प्रयत्न सुरुच ठेवला होता. अनोळखी क्रमांकावरुन तिला व्हिडीओ कॉल व मेसेजेस येण्याचे प्रमाण वाढल्यामुळे तिने हा प्रकार घरी कथन केला. आपल्याच फेसबुक खात्यावरुन हा मोबाईल क्रमांक इतरांना मिळाला असल्याचे तिला समजले. त्यानंतर मात्र तिच्या पायाखालची वाळूच सरकली. तिने थेट पोलिसात धाव घेत आपबीती कथन केली. ग्रामीण सायबर पोलिसांकडे आल्यावर तिने अनोळखी व्यक्तीविरुद्ध रितसर गुन्हा दाखल केला. तिचे बनावट फेसबुक खाते तयार करण्यासाठी वापरण्यात आलेला ईमेल आयडी देखील बनावट होता. सायबर पोलिसांच्या अथक प्रयत्नाने ऋषिकेशचे नाव पुढे आले. हा सर्व प्रकार दौंड येथून ऑपरेट होत असल्याचे उघड झाले. सरकारी नोकराचा मुलगा असलेला ऋषिकेश हा एमएससी झालेला असून त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलिस पथक त्याच्या घरी गेले. तो घरी नसल्यामुळे आपण ऋषिकेशचे मित्र असल्याचे पोलिसांनी सांगत त्याच्या घरी ठाण मांडले. तो घरी येताच पोलिस पथकाने त्याला आपली खरी ओळख सांगत त्याच्याकडून गुन्हा वदवला. त्याने गुन्हा कबुल केल्यानंतर त्याला ताब्यात घेत अटक करण्यात आली. जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील, सायबर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अशोक घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक कैलास कामठे, संदीप वरपे, रवींद्र लोखंडे, नितीन जाधव, योगेश मोईम, सविता जायभाय, लखन पचोळे, योगेश दारवंटे, गजानन बनसोड, रुपाली ढोले आदींच्या पथकाने सदर कारवाईला मुर्त स्वरुप देण्यात आले. तरुणीचे बनावट फेसबुक खाते तयार करतांना ऋषिकेशने डिपीसाठी सदर तरुणीचा खरा फोटो वापरला होता. तिच्या मुळ फेसबुक खात्यावरुन त्याने तो फोटो स्क्रिनशॉटच्या मदतीने घेतला होता.

## अण्णाभाऊंच्या जयंती वरुन झाला दोन ...

वसाहतीमध्ये साजरा केला जायचा. बऱ्याच वेळेला हा सण उत्सव साजरा करणेसाठी प्रवीण मोहिते हा ही धडपत होता. पण त्याला किंवा त्याच्या घरच्या लोकांना या उत्सावात सनी मोहिते याचे लोक समावून घेत नव्हते. वर्षांतून एक दोन वेळा तरी सनी मोहिते आणि प्रवीण मोहिते याच्यात वाद भांडण मारामारी होत होती. बऱ्याच वेळेला हा वाद पोलीस स्टेशनपर्यंत पण ही गेला होता. पोलीसांनी ही त्या दोन गटात हस्तक्षेप करून वाद मिटिविण्यचा प्रयत्न केला पण तेवढयापुरते तो वाद मिटिलेला असायचा पण नंतर त्या दोन गटात धुसफूस ही कोणत्या ना कोणत्या कारणातून होत होती. त्या दोघांच्या भांडणात त्याच्या त्याच्या घरातील महिला ही भाग घेऊन एकमेकांच्या अंगावर जावून राडा करीत होत्या. घटनेच्या एक दोन दिवस अगोदर ही सनी मोहिते आणि प्रवीण मोहिते याचेत भांडणे होऊन शिवीगाळ होऊन हाणामारी झाली होती. त्यावेळी हे प्रकरण तात्पुरते मिटले होते.परंतू सनी मोहिते आणि विकास मोहिते यांनी प्रवीण मोहिते याच्या विरोधात कुंडल पोलीसात तक्रार दाखल केली होती. त्यामुळे पोलीसांनी दोन्ही बाजूच्या लोकांना पकडून नेऊन पोलीस स्टेशनला बसविले होते. त्यावेळी पोलीसांनी सनी मोहिते आणि प्रवीण मोहिते कडच्या लोकांना समजावून सांगत वाद न करता राहावा अन्यथा पोलीसांचा दुंडका बसेल असे सांगितले होते. त्यातच पोलीसांनी प्रवीण मोहिते कडच्या लोकांना या कारणातून एक रात्र गजाआड केले होते. त्यामुळे प्रवीण आणखीनच चिडला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी वंसतनगर मांतग वसाहतीत आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्याचे नियोजन ठरत असताना साठे जंयती आम्ही आमच्या प्रमाणे साजरी करू अशी धमकी प्रवीण आणि त्याच्या लोकांनी समाजातील विशेषता सनी मोहिते आणि त्याच्या लोकांना दिले होते. या कारणातून रविवार सकाळी आण्णाभाऊ साठे याच्या जंयतीच्या निमित्याने दोन्ही गटाचे लोक जमले होते. ही तर वादाची ठिणगी होती. कोण कोणत्या पध्दतीने साठे याची जयंती करायची यावरून वाद दोन्ही गटात पेटला होता. यावेळी प्रवीण कडच्या महिला ही भांडण करण्यासाठी तयारीनिशीच आल्या होत्या. सनी मोहिते आणि विकास मोहिते ही तयारीनिशीच त्याच्या समोर येऊन थांबले होते. सकाळी सुरू झालेला वाद दुपारी १२ ते १२.३०पर्यत मिटत नव्हता. यातच मागील भांडणाचा राग आणि आपल्या आणि आपल्याकडील लोकांच्या विरोधात मारहाण झालेली नसताना ही खोटी तक्रार पोलीसात दाखल का केली याचा जाब प्रवीण आणि त्याच्या लोकांनी सनी मोहिते याला विचारात असताना दोन्ही गटात धुमश्चक्री सुरू झाली. तरूण मंडळी एकमेकांना लाठी काठीने बडवत होते. तर माहिला या दगडफेक करीत होत्या. यातच सनी याचा मामा अरविंद साठे हे भांडण मिटवायला आल्यावर हा वाद आणखीनच जास्त चिघळला. त्यातच प्रवीण कडच्या महिला या जास्तच आक्रमक झाल्या.त्याच वेळी दोन्ही कडच्या लोकांनी आता तलवारीसह धारदार हत्यारे ही बाहीं काढली. प्रवीण मोहिते आणि आदित्य मोहिते यांनी तुम्ही आमच्यातील लोकांना मारहाण करून आमच्या विरोधात मारहाणीची खोटी तक्रार दाखल करता काय? आम्ही तुम्हाला आता जिंवत सोडणार नाही म्हणत सनी मोहिते आणि विकास मोहिते या दोघा भावाच्यावर तलवारीने सपासपा वार केले. त्यांना सोडवायला आलेल्या मामा अरविंद साठे याचेवर ही त्यांनी तलवारीने वार केले.सनी आणि विकास यांनी ही त्याचे तलवारीचे वार झेलत प्रवीण मोहिते आणि त्याच्या लोकांवर सपासप वार केले. यात सहा जण गंभीर जखमी झाले. त्याच्या हातापायाला गंभीर दुखापत झाली. प्रवीण याच्या कडील महिला वनिता मोहिते संगिता मोहिते यांनी त्याना चेतवणी देत मारा त्याना कापा त्याना म्हणत अर्वाच्च घाणेरड्या शब्दात शिव्या देत दगड फेकत होत्या तर सापडील त्याला त्या काठीनेही मारहाण करीत होत्या. घटनास्थळावरील परिस्थीती ही एखाद्या रणभुमी सारखी झाली होती. जागोजागी विठाचा दगडाचा खच पडलेला होता. यातच सनी मोहिते विकास मोहिते आणि त्यांचा मामा अरविंद साठे याच्या डोक्यावर मानेवर छातीवर तलवारीने आणि धारदार शस्त्राने वार झाल्याने ते तिघे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यांचा जागीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती कुंडल पोलीसांना समजताच ते ही तातडीने आपल्या पोलीस फौजफाटसह घटनास्थळी दाखल झाले. जमाव तर प्रक्षुब्ध बनला होता. जमावाला पांगवत पोलीसांनी परिस्थिती वरनियंत्रण मिळवले. या घटनेची माहिती समजातच घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक मनीषा दुबले यांनी तातडीने भेट देवून पोलीसांना घटनेची पाहणी केली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना केल्या.कारण दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी मा.मुख्यमंत्री साहेब हे याच भागातील पूरग्रस्त भागाच्या दौऱ्यासाठी येणार असल्याने त्याचा ताण ही पोलीसावर होता. दरम्यान कुंडल पोलीसांनी घटनास्थळावर नियंत्रण मिळवून या घटनेचील सहा गंभीर लोकांना त्यांनी तातडीने उपचारासाठी सांगली येथील सरकारी रुग्णालयात पाठवून देऊन घटनास्थळाचा पंचनामा करून घटनास्थळावरील हत्यारे काठया जप्त केल्या. या घटनेत सनी मोहिते विकास मोहिते आणि त्याचा मामा अरविंद मोहिते यां तिघांचा जागीच मृत्यू झाल्याने पोलीसांनी या तिघांचा ही मृतदेह सांगली येथील सरकारी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. सहा गंभीर लोकापैकी एकाची तब्येत जास्तच गंभीर बनली होती. पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून घटनेत वापरलेल्या दुचाकी गाडया ही पोलीसांनी जप्त केल्या होत्या. आण्णाभाऊ साठे याच्या जयंतीच्या दिवसीच्या दुधोडी वंसतनगर येथील मातंग वसाहतीत तिघांची हत्या झाल्याने सांगली सह सूंपर्ण महाराष्ट्राला या घटनेने हादरा बसला होता. या घटनेसदंर्भात कुंडल पोलीसात परस्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्या होत्या. दरम्यान सनी मोहिते विकास मोहिते आणि अरविंद साठे या तिघांच्या हत्येप्रकरणी सनी मोहिते याच्या नातेवाईकांनी पोलीसात तक्रार दिल्याने पोलीसांनी सनी आत्माराम मोहिते (वय २७) विकास आत्माराम मोहिते (वय ३२) आणि त्याचा मामा अरविंद बाबुराव साठे (वय ४५) याच्या हत्येप्रकरणी पोलीसांनी प्रवीण विलास मोहिते (वय २५) आदित्य विलास मोहिते, (वय २२), विजय मधुकर मोहिते (वय ५०), किशोर प्रकाश मोहिते, वनिता विलास मोहिते, संगिता मधुकर मोहिते याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, २०१सह महाराष्ट्र दंगल कायदा व शस्त्र कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना पोलीसांनी ताब्यात घेतले. पोलीसांनी त्याना सांगली येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास कुंडल पोलीस करीत आहेत. दोन समाजात किंवा दोन गटात झालेला वाद हा कधी ना कधी उग्रस्वरूप धारण करीत असतो त्यातूनच डाव धरून अशा प्रकारच्या घटना या एखादे निमित्य काढून घडविल्या जातात. बऱ्याच वेळेला अशा घडणाऱ्या घटनेत घरच्या महिलाही सहभागी होत असल्याने या घटना मिटिण्यऐवजी जास्तच चिघळत असतात. हेच या घटनेवरून दिसून येते आण्णाभाऊ साठे याच्या जयंतीचे निमित्य साधून मातंग वसाहतीमध्ये तिहेरी खूनाची घटना ही समाजाला मांतग लाजीरवाणीच अशीच आहे. वाद कोणताही असो तो वेळेतच मिटविला पाहिजे नाही तर अघटित अशा घटना घडतात.

## झोपण्याच्या जागेवरून दोघांमध्ये भांडण...

पडलेल्या इमारतीच्या जागेत राहून तेथेच आपला दररोजचा कार्यभार आटोपयाचा आणि कामधंदा न करता भीक मागत फिरणे. शहरातील पद्मा टॉकीजच्या परिसरात सत्यनारायण तालीम मंडाळाच्या इमारतीत गेल्या काही महिन्यापासून दोन फिरस्ते सकाळ संध्याकाळ पडून राहत होते. त्यापैकी अमर हा कुठून आणि कधी आला होता. त्याचा संपूर्ण नाव गाव पत्ता कोणाला काहीच माहित नव्हते. त्याने फक्त शेजारी असणाऱ्या लोकांना आपले नाव अमर आहे असेच सांगितले होते. त्यामुळे त्या परिसरातील चहा टपरीवाले, हमाल लोक त्याला अमर म्हणूनच ओळखत होते. त्याची बाकीची चौकशी कधीच कुणी केली नव्हती. पद्मा टॉकीज परिसरात तो कधी कोणाची हमाली करायचा तर कधी कुठल्या तरी हॉटेलमध्ये कमबश्या विसळायचा. काम मिळाले नाही तर भीक मागून खायचा असा त्याचा नित्यक्रम ठरलेला होता. चौविस तास तो त्या इमारतीच्या पॅसेजमध्ये मळकट कपडयात राहत होता. कोणी काही दिले तर खायचा. नाही दिले तर तो तसाच राहयचा. तो वरून जरी शांत वाटत असला तरी त्याला कुणी काही बोललेले आवडत नव्हते. तो त्यांना फटकून बोलत होता. तसे तो कायमच आपल्याच तालात राहत होता. उगीचच येणाऱ्या जाणाऱ्यांना शिव्या देत बसायचा. तो राहत असलेल्या इमारतीच्या पॅसेजमध्ये सुरज चंद्रकांत कांबळे हा ही आणखीन एक फिरस्ता राहयला होता. तो ही अमर सारखाचा मिळाले तर काम करायचा नाही तर भीक मागून खायचा. शहरातून इकडे तिकडे फिरून तो पैसे गोळा करायचा त्या पैशाची दारू पिऊन पद्मा टॉकीज शेजारील मोकळ्या इमारतीच्या ठिकाणी येऊन बसायचा. त्यावेळी त्याची व अमरची विनाकारण कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडणे होत होती. दोघे ही एकमेकांना अर्वाच्च भाषेत शिव्या देत एकमेकांच्या अगांवर जात होते. अमर ज्या एरियात भीक मागत होता. त्याच एरियात सुरज देखील भीक मागू लागला होता. त्यामुळे अमरला पैसे कमी मिळत होते. या कारणातून अमर त्याला शिव्या देत इकडे कशाला कलमडतोस? माझ्या पोटावर पाय आणतोस जा. तिकडं मरं जा. असे म्हणत त्याला मारायला जात होता. सुरजहा देखील रागीट स्वभावाचा होता. तो ही त्याला तसाच शिव्या देत तुच जा की तिकडं बोबंलत, कुठणं आलाय कुणास ठाऊक भिकारडं असे म्हणून त्याला हिणवत होता. त्या दोघांची भांडणे ही दररोजची होती. त्याची भांडणे ही त्या इमारतीच्या शेजारीच असणाऱ्या चहा टपरीवाला साद महंमद शेख याला माहित होती. तो ही त्याच्या भांडणाने वैतागून जायचा.कधी कधी तो त्या दोघांना तेथून हाकलून दयायचा. पण ते दोघे ही परत दिवसभर फिरून तेथच येत होते. मंगळवार दि.२७ जुलै २०२१ रोजी रात्रीच्या सुमारास अमर त्या इमारतीच्या आपल्या रोजच्या बैठकीच्या जागेत बाहेरील खाद्यपदार्थ कागदात आणून तेथे जेवत होता. त्यावेळी अमर हा थोडा दारूच्या नशेत होता. तो जेवण करीत असताना काही वेळातच तेथे सुरज हा ही दारू पिऊन आला. तो ही नशेत असल्याने बाजुलाच अमर जेवत होता त्याठिकाणच्या पायरीवर जावून बसला. त्याने अमर जेवत असल्याचे पाहिले होते. त्याला आता त्याच्याबरोबर भांडणच काढायचे असल्याने तो काही तरी निमित्य शोधण्याच्या तयारीत होता. अमर पुढे बघून जेवत असताना सुरजने त्याला लवकर जेवण कर रे बाबा आणि जेवण झाल्यावर ती जागा पण स्वच्छ कर. मी तेथे झोपणार आहे. ती माझी जागा आहे असे म्हणाला. त्यावर अमर त्याच्याकडे रागात बघत म्हणाला,ही जागा काय तुझ्या बापाची हाय काय? तुझ्या बा नं ती जागा कधी खरेदी केलीया असे म्हणत सुरजला डिवचले होते. याचा राग सुरजला आला होता. अमरने आपला बाप काढल्यावर तो त्याचेवर चिडला होता. तो अमरला शिव्या देत तुझ्या बा ची ही जागा हाय काय? म्हणत तो जेवत असतानाच त्याला लाथाबुक्कांनी मारायला सुरूवात केली. त्यावेळी अमरला ही त्याचा राग आला. तो ही जेवण अर्धेच सोडत त्याला शिव्या देत त्याच्या अंगावर गेला. त्या दोघांत झटापट चालू होती. दोघे ही एकेमकाला ढकलत एकमेकांना मारहाण करीत होते. ही गोष्ट त्या इमारतीच्या खाली असणाऱ्या चहाच्या टपरीवाल्याच्या लक्षात आली. तो त्या दोघांचे भांडण सोडावयला गेला असता. सुरजने त्या चहा टपरीवाल्या साद मंहमंद शेख तू आमच्या भांडणाच्या मध्ये पडून नकोसं नाही तर तुला पण जीवे मारून टाकतो बघ असे म्हटल्यावर त्याचे भांडण सोडवायला आलेला साद शेख हा मरा साल्यानो म्हणत तेथून निघून आला. त्या इमारतीच्या पॅसेजमध्ये दोघेही मारामारी करत होते.अमरने सुरजची गळपट्टी धरली होती.त्याचेवळी सुरजने ही अमरच्या शर्टाची गळपट्टी धरली. दोघे ही एकमेकाला ढकलत हाणत पॅसेजजवळील ग्रील जवळ आले होते.नेमकी हिच संधी साधून सुरजने अमरचे डोके त्या ग्रीलवर जोरात आदळत त्याला वरून खाली जोरात ढकलून दिले. त्यासरशी अमर त्या इमारतीच्या पॅसेजमधून खाली जोरात पडला.तसा काही तरी खाली पडल्याचा थपकन मोठा आवाज आला. त्यासरशी खाली असणारा चहावाला साद महंमद शेख हा तिकडे पळत गेला.तर अमर त्या इमारतीच्या खाली १५ फुटावरून खाली जोरात पडल्याने त्याचे डोके फुटले होते.त्याच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला होता.त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला होता.शेख याने वरती पाहिले असता सुरज हा उभा होता.त्यानेच अमरला खाली पाडले असल्याचे लक्षात येताच शेख याने आरडा ओरडा करायला सुरूवात केली. त्यावेळी लगेच तेथे आणखीन माणसे जमली. माणसांची गर्दी पाहताच वरून सुरज हा पळून जाण्याच्या विचारात होता. हे लक्षात येताच काही जणांच्या मदतीने शेख याने पळून जाणाऱ्या सुरजला पकडून ठेवले. तर एकाने या घटनेची माहिती लगेच लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनला दिली. या घटनेची माहिती मिळताच लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सतीश होडगर, पोलीस पोलीस उपाधीक्षक मंगेश चव्हाण यांनी घटनास्थळी दाखल होऊन पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्यांनी अमर याला उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात दाखल केले. परंतू तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. इकडे पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून संशयीत आरोपी सुरज कांबळे याला अटक करून ताब्यात घेतले. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची माहिती साद मंहमंद शेख याचेकडून पोलीसांनी घेऊन त्याचेकडूनच या घटनेची लेखी फिर्याद घेतली होती. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी अमर (वय ३५) याच्या मृत्यू प्रकरणी सुरज चंद्रकांत कांबळे (३१) याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा तपास पोलीस उपाधीक्षक मंगेश चव्हाण पो.निरी.सतीश होडगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार.एस.एस.वाघमोडे,हवा.संजय कोळी, धोडीराम शिंदे, दिग्विजय मर्दाने यांनी केला.

## भाच्यालाच बनवले आपला यार...

पत्नीला मारहाण केली. त्यात ३० वर्षीय विवाहितेचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी पाल येथील बर्डी भागात उघडकीस आली. सायजाबाई साधू बारेला असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. ही माहिती मिळताच पोलिसांनी मृत विवाहितेचा पती साधू मानसिंग बारेला (रा.पाल, बर्डी ता.रावेर) आणि त्याचा साथीदार भायला भंगा बारेला (रा.पिंपळखुटा, ता.जि.खांडवा) या दोघांना अटक केली. पाल येथील बर्डी भागातील रहिवासी साधू बारेला याच्याकडे त्याचा साथीदार भायला भंगा बारेला आला होता. गुरुवारी दुपारी ४ वाजेपूर्वी मृत विवाहिता, तिचा पती साधू बारेला आणि त्याचा साथीदार त्यांच्या घरात दारू पीत होते. त्यावेळी भायला याने साधू बारेला याला दारू आणण्यासाठी बाहेर पाठवले. तसेच साधूच्या लहान मुलीला २० रुपये देऊन चॉकलेट आणण्यासाठी दुकानात पाठवले. दरम्यान, दारू आणण्यासाठी बाहेर गेलेला साधू हा घरी परतल्यावर पत्नी व भायला हे लैंगिक संबंध ठेवत असल्याचे दिसले. यामुळे साधूला पाहून भायला तेथून पळाला. यानंतर साधूने पत्नी सायजाबाईला काठी व लाथाबुक्क्यांनी हात-पाय, बरगडी, डोके, मानेवर मारहाण केली. त्यात तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी मृत सायजाबाईचे वडील चमार दलसिंग बरेला (रा.गारबर्डी, ता.रावेर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून साधू बारेला विरुद्ध खुनाचा, तर त्याच्या साथीदार भायला बारेला विरुद्ध लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. उपनिरीक्षक अनिस शेख तपास करत आहेत. पोलिस निरीक्षक रामदास वाकोडे, एपीआय शीतलकुमार नाईक, उपनिरीक्षक मनोजकुमार वाघमारे, अनिस शेख यांनी घटनास्थळी पाहणी केली. आरोपींच्या अटकेसाठी कर्मचारी राजेंद्र राठोड, महेंद्र सुरवाडे, सुरेश मेढे, प्रदीप सपकाळे, प्रमोद पाटील, विशाल पाटील, मंदार पाटील, पुरुषोत्तम पाटील, श्रीराम कांगणे, नरेंद्र बाविस्कर, संदीप धनगर, अतुल तडवी, सचिन घुगे, कुणाल पाटील यांची पथके पाठवली. यानंतर दोघांना अटक करण्यात आली. त्यात आरोपी भायला बारेला याला पिंपळखुटा येथून ताब्यात घेण्यात आले. पाल येथील विवाहितेच्या खूनप्रकरणी तिचा पती आणि अत्याचारप्रकरणी पतीच्या साथीदाराला रावेर पोलिसांनी अटक केली.

# गुरधाळ येथे आण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

गुरधाळ येथे सामाजिक उपक्रम घेऊन संविधान वाचन करून आण्णाभाऊ साठे यांची येथे १०१ जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच संदिप पेठे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच कुमठेकर शत्रुघण, सोनकांबळे भगवान लक्ष्मणराव, ग्रामपंचायत सदस्य गायकवाड बळवंत, कांबळे उध्दव, अंकुश वलसे उपस्थित होते. तसेच यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण सरपंच संदिप पेठे सोनकांबळे भगवान यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी सोनकांबळे भगवान यांनी बोलताना म्हणाले कि पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसुन श्रमिकांच्या कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे, असा विज्ञानवादी महामंत्र देणारे, केवळ दीड दिवस शाळा करुन १३ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, १३ लोकनाटक, ३ नाटके, ७ चित्रपट, १५ पोवाडे, १ शाहीरी, पुस्तक व १ प्रवास वर्णन असा साहित्याचा डोंगर रचणारे, संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार,कामगार नेते, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त सोनकांबळे भगवान यांनी मत व्याक्त केले. अध्यक्षीय समारोपत बोलताना सरपंच संदीप पेठे यांनी म्हणाले, पर्यावरणाचे रक्षण व्हावे व मानवाला शुध्द ऑक्सिजन मिळावे, परिसरात स्वच्छ राहावे म्हणून काळाची गरज आहे. थोर समाजसुधारक विचारवंतांचे विचार आजही समाजात दिशा देण्याचे काम करत आहेत. विचारांची जपणुक व्हावी यांच्या विचाराचा विकसीत समाज घडविण्यासाठी प्रयत्नशील राहु असा संकल्प केला.

## तोकडे कपडे घातल्याने गुंडांकडून तरूण तरुणींना बेदम मारहाण!

**अंबरनाथ/किरण तेलगोटे**

केवळ तोकडे कपडे घातल्याचे कारण काढत मलंगगड च्या पायथ्याशी फिरण्यासाठी गेलेल्या दोन तरूण आणि दोन तरुणींना त्या ठिकाणी असलेल्या ६ ते ८ टवाळखोर मुलांनी बेदम मारहाण केली. हे तरुण इथेच थांबले नाही तर त्यांनी दोन्ही तरुणीचे कपडे फाडण्याचा प्रयत्न करत विनयभंग केल्याची घटना घडली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे घाबरलेल्या या चौघांनी स्वताची सुटका करून घेत नेवाळी पोलीस चौकी गाठली मात्र पोलिसाकडून त्यांना मेडिकल करून या तसेच इथे तक्रार होणार नाही हिललाईन ला जा असे सांगत वाटेला लावण्यात आले. मात्र यातील पीडित तरुणीने हिम्मत न हारता सोशल मिडीयावरून या घटनेला वाचा फोडताच जागे झालेल्या पोलिसांनी या प्रकरणी मंगळवारी संध्याकाळी उशिरा गुन्हा नोंद करत आरोपीचा शोध सुरु केला आहे. या घटनेनंतर मलंग गड परिसर सर्वसामान्यांसाठी नाहीच का? तरुणींनी नेमका कोणता पेहराव करावा हे ठरविण्याचा अधिकार यांना दिला कोणी? असा सवाल उपस्थित करत अशा समाज कंटकावर कारवाई करत वेळीच याला आवर घातला जावा अन्यथा नागरिकांना पर्यटन स्थळी देखील स्वताच्या सुरक्षेसाठी शस्त्र घेऊनच जावे लागणार का? असा प्रश्न देखील विचारला गेला आहे.

## देवणी तालुक्यातील अंगणवाडी इमारतीचे भाडे एक वर्षापासून रखडले

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यात एकुण १३५ अंगणवाडी आहेत. १३५ पैकी १२ अंगणवाड्या हे भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. १२ अंगणवाड्याला गेली एक वर्षापासून आद्याप इमारत भाडे भेटले नाही. अंगणवाडी इमारत भाडेसाठी देवणी पंचायत समिती अंतर्गत एकात्मिक बालविकास योजना कार्यालयात प्रस्ताव दाखल करून दिड महिना ऊलटून हि याची दखल घेतली जात नाही. अंगणवाडी भाडे इमारतीसाठी शासनाकडुन बजेट येउनही अद्याप देवणी तालुक्यातील इमारत भाडे कशामुळे रोखले गेले हे न उलगडणारे कोडे आहे. तसेच लातूर जिल्ह्यातील इतर तालुक्यात इमारत भाडे वाटप झाले आहे, तरी देवणी तालुक्यातील अंगणवाडी इमारतीचे भाडे त्वरीत वाटप करण्यात यावे अशी मागणी इमारत मालकाकडून केली जात आहे. या प्रकरणाकडे देवणी पंचायत समितीचे गटविकास आधिकारी मनोज राऊत यांनी लक्ष द्यावे व तसेच जाणुन बुजुन दुर्लक्ष करणाऱ्या व इमारत मालकास वेठीस धरणाऱ्या एकात्मीक बालविकास अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी अशी मागणी जोर धरत आहे.




## वाडा भिवंडी रस्त्याच्या दयनीय अवस्थेबद्दल अधिकाऱ्यांच्या उपहासात्मक सत्काराचे आयोजन

**वाडा/वार्ताहर**

वाडा भिवंडी महामार्ग हा अतिशय धोकादायक ठरला असून मागील काही वर्षात या मार्गावर शेकडो अपघात झाले आहेत या अपघातात अनेकांना जीव गमवावा लागला आहे, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. कित्येक घर उद्धवस्त झाली आहेत. पावसाळ्यात या रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची चाळण झालेली दरवर्षी पहावयास मिळते, त्या साठी अनेक संघटनांनी व राजकीय पक्षांनी अनेक वेळा आंदोलने केली आहेत मात्र तरीही झोपेचे सोंग घेतलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग येत नाही. मंगळवार दि.१३ जुलै रोजी श्रमजीवी संघटनेच्या वतीने वाडा ते भिवंडी दरम्यान एकाच वेळी तेरा ठिकाणी तीन तास रास्ता रोको केला होता. या प्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यापुढे अपघात होणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल व खड्डेभरण्यासाठी दोन टीम कार्यरत राहतील असे लेखी दिले होते.त्या दिवसानंतरही अपघाताची शृंखला चालूच राहिली. लहानमोठे अपघात हे नित्याचेच झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या ढिसाळ कारभाराची समाज माध्यमांवर खिल्ली उडविली जात आहे, तरीही गेंड्याची कातडी पांघरलेल्या या अधिकाऱ्यांचे डोळे उघडत नाहीत. गुरुवारी (दि. ५ ऑगस्ट) सकाळच्या सुमारास किनईपाडा येथे एक बस खड्ड्यांमुळे अडकून पडली होती. तर काही दिवसांपूर्वी गर्वती महिलेला घेऊन जनारी रुग्णवाहिका खड्ड्यांमुळे अडकून पडली होती असे दिवसेंदिवस लहान मोठ्या गाड्यांचे अपघात चालूच आहेत. अतिशय निकृष्ट अशा वाडा भिवंडी महामार्गासारखा रस्ता कुठे असूच शकत नाही, या रस्त्यावरील अपघाती मृत्यू मुळे लोकसंख्या वाढीस आळा बसण्याचे काम या महामार्गाने केले आहे, तसेच कंबरदुखी व मणक्यांच्या आजारापासून नागरिकांची सुटका झाली आहे, सरकारने पाणी अडवा पाणी जिरवा ही मोहीम अपयशी झाली मात्र या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे ही योजना यशस्वी झाली आहे. या सर्व खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचे राष्ट्रीय काम पिडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांनी करावे असे उपहासात्मक निवेदन देऊन अशा अधिकाऱ्यांचा या खड्ड्यात बसवून सत्कार करून रस्त्याच्या कामासाठी वापरलेले डांबर भेट स्वीकारण्यास पिडब्ल्यूडीच्या अधिक्यनी मंगळवारी (दि.१० ऑगस्ट) रोजी उपस्थित राहावे असे श्रमजीवी संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



## उल्हासनगर महापालिका जनसंपर्क अधिकाऱ्याची पीएचडी पदवी बोगस

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**



महापालिका जनसंपर्क अधिकाऱ्याची पीएचडी पदवी बोगस असल्याचे आदेश आयुक्त डॉ. राजा दयानिधी यांनी काढल्याने, एकच खळबळ उडाली. नावापुढे डॉक्टर लावण्याचे यापूर्वीचे आदेश रद्द केल्याचे आयुक्तांनी महापालिका विभाग प्रमुखांना व सामान्य प्रशासन विभागाला लेखी कळविले आहे. भदाणे यांचे अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. जनसंपर्क अधिकारी युवराज भदानेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी पत्रकार परिषदेत करण्यात आली. महापालिका जनसंपर्क अधिकारी युवराज भदाणे यांनी महापालिकेत पीएचडी पदवीचे प्रमाणपत्र जमा केल्यानंतर, सन २०१७ साली तत्कालीन आयुक्तांनी भदाणे यांच्या नावापुढे डॉक्टर लावण्याचे आदेश काढले. मात्र तेव्हापासून पीएचडी पदवी बोगस असल्याची चर्चा शहरात रंगून कारवाईची मागणी वेळोवेळी झाली. अखेर राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने जनसंपर्क अधिकारी युवराज भदाणे यांची पीएचडी पदवी अवैध असल्याची माहिती महापालिकेला दिली. त्यानुसार आयुक्त डॉ. राजा दयानिधी यांनी पीएचडी पदवी अवैध असल्याचे आदेश काढले.महापालिका आयुक्तांनी पीएचडी पदवी बोगस असल्याचे आदेश काढून यापुढे भदाणे यांच्या नावापुढे डॉक्टर लावू नये, असे महापालिका विभागाना व युवराज भदाणे यांना लेखी कळविले. दरम्यान भदाणे यांनी बोगस पीएचडी पदवी प्रमाणपत्र महापालिकेला देऊन महापालिकेची फसवणूक केल्याचा आरोप समाजसेवक दिलीप मालवणकर यांनी केला. याप्रकरणी महापालिका भदाणे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल का करीत नाही? असा प्रश्न त्यांनी केला. गुन्हा दाखल करीत नसल्याच्या निषेधार्थ ९ ऑगस्ट पासून मुंबई आझाद मैदानावर उपोषणाला बसण्याचा पवित्रा समाजसेवक दिलीप मालवणकर व रामेश्वर गवई यांनी घेतला. तसेच गुरवारी आनंद हॉटेल येथे पत्रकार परिषद घेऊन भदाणे यांच्यावर आरोप केले.

## भांबेवाडीत हातभट्टी दारू बनविणाऱ्या केंद्रावर मोहोळ पोलिसांनी टाकली धाड

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील भांबेवाडीत बेकायदेशीर हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर मोहोळ पोलिसांच्या पथकाने छापा टाकून विषारी रसायनासह इतर साहित्य असा एकूण ३० हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून याप्रकरणी दोघांवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहोळ पोलीस कर्मचारी मिळालेल्या माहितीनुसार पोहोचले असता त्या ठिकाणी एक महिला व एक पुरुष बॅरल मध्ये लाकडाने काहीतरी टाकून हलवत असलेले दिसले. पोलीस कर्मचाऱ्यांना संशय आल्याने ते घटनास्थळाकडे जात असल्याची चाहूल लागल्यानंतर एक महिला व एक पुरुष साहित्य त्या ठिकाणी टाकून पळून गेले. पोलिसांना एक लोखंडी बॅरलमध्ये विषारी रसायन असल्याचे मिळून आले आहे. शांताबाई शिवाजी काळे व दीपक मधुकर काळे (रा. दोघेही भांबेवाडी ता.मोहोळ जि.सोलापूर) हे तेथून पळून गेले, हातभट्टी दारूचे रसायन लोखंडी बॅरल, प्लास्टिक बॅरल व इतर साहित्य असा मिळून ३० हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून याप्रकरणी दोघांवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर खारगे करीत आहेत.

## मोखाडा तालुक्यातील शेंड्याचीमेट येथील शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप




**वाडा/वार्ताहर**

वाडा तालुक्यातील जन ग्रामीण सेवा संस्थेचे अध्यक्ष अनंता वणगा यांनी २५ जुलै रोजी मोखाड्यातील एका शाळेला भेट दिली असता येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची कमतरता असल्याचे लक्ष्यात आल्याने त्यांनी समाज माध्यमावर मदतीचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत वसई येथील एका संस्थेने या विद्यार्थ्यांना ३१ जुलै रोजी शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याने विद्यार्थी व शिक्षकांनी आभार व्यक्त केले आहे. मोखाडा तालुक्यातील शेंड्याचीमेट येथील आमदार किसन कथोरे माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय या संस्थेच्या शाळेला जन ग्रामिण सेवा संस्थाचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते अनंता वनगा यांनी भेट दिली होती. या शाळेचे मुख्याधापक सोनु भोये यांच्याशी चर्चा केली असता शाळेसाठी शैक्षणिक साहित्याची गरज आहे असे भोये यांनी अनंता वनगा यांना सांगितले होते.

सदर शाळेला मदत मिळावी असे अनंता वनगा यांनी सोशल मिडियावर आवाहन केले होते, ही पोस्ट वाचुन पालघर जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारी आमची वसई या सामाजिक संस्थेने शाळेतील १५० विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य देण्याचे ठरवले त्यानुसार शनिवारी (दि.३१ जुलै) मोखाडा तालुक्यातील अतिदुर्गम शाळेतील ६ वीते १० वीच्या विदयार्थीना दोनशे पानी लांब वह्या, पेन, फुलस्केप पेपर, प्लेन फुलस्केप पेपर, झाडू, खराटे, ब्लॅक बोर्ड, स्कुल बॅग, डस्टर, खडू असे साहित्य पुरविण्यात आले. तर मुलींना सॅनिटरी पॅडही देण्यात आले. तसेच गावातील महिला, पुरुष, लहान मुले, मुली यांना कपडे सुद्धा वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास आमची वसई सामाजिक संस्थेचे रुग्णमित्र राजेंद्र ढगे, दुर्गमित्र पुरुषोत्तम देवधर, साई पाटील, हिम्मत घुमरे, ईश्वरी घुमरे, केशव भावसार, रोशनी वाघ, मधुबाला सिंग, सुरेखा सावंत, महेश पेंडसे, पुष्कर करंदीकर, शर्वरी बापट, अनिल भालेराव, पल्लवी पवार, रुचिता रेडकर, सचिन पाटील, गौरी जांभेकर, दीप देवधर, मल्हार वाघ इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच जन ग्रामिण सेवा संस्था वाडाचे अध्यक्ष अनंता वनगा,उपाध्यक्ष व नगरसेवक अरुण खुलात व वकील किरण भोईर शाळेचे संचालक मंडळही उपस्थित होते. यावेळी शेंड्याचीमेट ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य राम भोये यांनी आमची वसई सामाजिक संस्थेच्या व जन ग्रामिण सेवा संस्था वाडा च्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

## अहमदपूरच्या भक्तीस्थळ परिसरातील गैरव्यवहारांची चौंकशी करण्याची मागणी

लातूर : वसुंधरारत्न राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची समाधी असणाऱ्या भक्तीस्थळ परिसरात अनेक गैरव्यवहार होत आहेत. या गैरव्यवहारांची चौकशी करावी या मागणीसाठी शिवा लिंगायत युवक संघटना, अखिल भारतीय वीरशैव महासभा, लातूर, अनुभव मंटप व बसव सेना यांच्या वतीने लातूर येथे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या मृत्यूची सीआयडी चौकशी करावी. शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होऊनही काही लोक समाधी खोदण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यास प्रतिबंध करावा. समाधीस पोलीस संरक्षण मिळावे. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची आयुष्याच्या शेवटच्या काळात कॅमेऱ्यासमोर बोललेली सीडी सार्वजनिक करावी. भक्तीस्थळ परिसरातील गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. वीरमठ राजुर, संस्थानला भक्तांनी दिलेली जमीन वैयक्तिक नावावर करून विक्री केलेल्या प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही व्हावी. निलंगा मठाच्या जमिनीवरील सर्व अतिक्रमणे काढावीत. औसा मठाची २५ एकर जागा खाजगी व्यक्तींना विक्री केली असून त्याची चौकशी करावी, आदी मागण्यांसाठी हे उपोषण करण्यात आले. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.शिवा संघटनेचे दयानंद पाटील, अखिल भारतीय वीरशैव महासभेचे शिवराजअप्पा शेटकार, मल्लिकार्जुन कानडे, शिवाजीअप्पा भांजी, उमादेवी चोळखणे यांच्या या निवेदनावर स्वाक्षर्या आहेत. शीलाताई माळोदे, लताताई मुद्दे, पद्मिनी मुनाळे,पूनम स्वामी, सविता गंगापूरे, मंगल मानके, पुष्पाबाई मुळे यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी या आंदोलनात सहभाग नोंदवला.

## थोडक्यात वृत्तांत

### उपजिल्हाधिकारी विकास माने यांची नांदेड येथे बदली



देवणी : निलंगा उपविभागाचे मनमिळावू, शांत, संयमी व कर्तव्यनिष्ठ उपविभागीय अधिकारी, विकास माने यांची उपविभागीय अधिकारी नांदेड या ठिकाणी पदस्थापना झाली. मागील अडीच वर्षात निलंगा उपविभागात माने साहेबांच्या मार्गदर्शनाखाली कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना, जलयुक्त शिवार अभियान, वॉटर कप स्पर्धा, लोकसभा निवडणूक, विधानसभा निवडणूक, मतदार नोंदणी कार्यक्रम, पीएम किसान योजना, नैसर्गिक आपत्ती, पाणीटंचाई, ई फेरफार प्रणाली, वसुली व इतर अनेक कामांमध्ये निलंगा उपविभाग नेहमीच पुढे राहिला होता याचे श्रेय उपविभागीय अधिकारी विकास माने साहेब यांनी प्रत्येक गोष्ट शांतपणे समजून घेऊन त्या त्या वेळी योग्य ते निर्णय घेतले, देवणीचे तहसीरदार सुरेश घोळवे यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी शामराव सुर्यवंशी

लातूर : महाराष्ट्र राज्य अनुदानित कर्मचारी वसतिगृह या संघटनेची लातूर जिल्हा कार्यकारिणी निवड करण्याच्या उद्देशाने प्रदेशाध्यक्ष मारोती कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली ४ ऑगस्ट रोजी बैठक घेण्यात येऊन यावेळी सर्वानुमते शामराव सुर्यवंशी यांची संघटनेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. निवडीनंतर सर्व उपस्थित मान्यवरांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शामराव सुर्यवंशी म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील वसतिगृह कर्मचाऱ्यांचे अनेक प्रलंबित प्रश्र्न तसेच या कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून त्यांना न्याय देण्याचे काम यापुढील काळात करण्यात येईल. याबरोबरच वसतिगृह कर्मचाऱ्याला वेतनश्रेणी लागु करण्यासाठी पुढाकार घेवून प्रश्र्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे याप्रसंगी सांगितले. संघटनेचे जेष्ठ मार्गदर्शक ज्ञानोबा केंद्रे, प्रमुख पाहूणे मंगेश सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत जिल्हा उपाध्यक्ष बंडू गंगे, सचिव विकास शिंदे, कार्याध्यक्ष आयरेकर सिध्देश्वर, सहकार्याध्यक्ष महादेव चव्हाण, कोषाध्यक्ष जनार्दन कांबळे, सहसचिव रोहन सूर्यवंशी आदींची निवड करण्यात आली.

### मुख्याध्यापक हरी यादव यांचा सत्कार

लातूर : तालुक्यातील शिऊर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक हरी शेषराव यादव यांचा सेवानिवृत्तीनिमित्त अभंगराव बिरादार कुटुंबियांच्यावतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक यादव यांची पहिली नेमणूक १९८५ साली रेणापूर तालुक्यातील कुंभारवाडी येथे झाली होती. येथे त्यांनी सलग १९ वर्षे सेवा बजावली. प्राथमिक शाळेचे रुपांतर उच्च प्राथमिक इयत्ता ७ वी पर्यंत झाले. त्यानंतर स्वगावी जवळा कासार येथे बदली झाल्यानंतर येथे नवीन शाळा इमारत सर्वांना सोबत घेवून त्यांनी मंजूर करून घेतली. केवळ तीन महिन्यात इमारत बांधकाम करून त्यांनी 'पॅटर्न' निर्माण केला. दरम्यान, शिऊर येथे मुख्याध्यापक पदावर त्यांना पदोन्नती मिळाली. या शाळेत बाला उपक्रमांतर्गत सर्व शिक्षक, कर्मचारी व गावकर्यांच्या सहकार्याने लोकवाट्यातून स्वच्छ व सुंदर शाळा करण्यात मुख्याध्यापक यादव यांनी परिश्रम घेतले. या सत्कार सोहळ्याप्रसंगी अभंगराव बिरादार, बालासाहेब शितोळे, शिवकांत वाडीकर, दीपक बिरादार, बालाजी गुंगे, मंगल यादव, निर्मला बिरादार, मीना शितोळे, ओमकार बिरादार आदी उपस्थित होते.

### कोकण पुरग्रस्थांना ३३ हजाराची मदत

अहमदपूर : सध्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पुरामुळे जनजिवन विस्कळित झाले असून कोकण विभागात तर पुराणे थैमान घातले आहे. अनेकांचे संसार उद्धवस्त झाले तर अनेक जण मृत्युमुखी पडले. मानुसकीचा धर्म पाळत शिरूर ताजबंदच्या जनतेच्या वतीने रोख रक्कमेच्या स्वरूपात आर्थिक मदत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे व तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या कडे सुपुर्त करण्यात आली असल्याने कोकण विभागातील जनतेला आधार देण्याचे कार्य शिरूर ताजबंदच्या ग्रामस्थांनी केले आहे. शिरूर ताजबंद येथील व्यंकटेश बहुउद्देशीय सेवा भावी संस्था, व्यापारी, डॉक्टर, कर्मचारी व सर्वसामान्य ग्रामस्थांकडून भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा च्या युवकांनी निधीचे संकलन केले. तेहतिस हजार तिनशे ,३३, ३०० रुपये चा पुरग्रस्थ निधी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते अहमदपुरचे उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्या कडे नुकताच देण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती आर.डी.शेळके, महेश बिलापट्टे, शिवानंद भोसले,सादीक शेख, मच्छिंद्र कांडनगिरे, बिरादार एन.टी., व्यंकट धुळे , शिवराज पाटील, गोविंद गिरी, प्रताप पाटील, गजेंद्र वलसे, मारोती मोरे, हणमंत बडगिरे, शिवचंद्र मलफेदवार, ज्ञानोबा मंतलवाड, यशवंत कांबळे, रवी दावणगावे, रमेश कौरवार, दिलीप पाटील, नागनाथ बलशेटवार, बबन मलफेदवार, राजकुमार बदलला, शशिकांत पेदेवाड, विनायक खेडेकर यांच्या सह शिरूर ताजबंद येथील नागरिक यावेळी उपस्थित होते.

### गैरहजर कर्मचाऱ्यांचा सभापतींनी केला पंचनामा

रेणापूर : अचानक पाहणी केली असता पंचायत समितीमधील २१ कर्मचारी गैरहजर असल्याचे आढळून आले.त्याचा पंचनामा करून अनुपस्थित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्याचे आदेश गटविकास अधिकाऱ्यांना दिले असल्याची माहिती पंचायत समितीचे सभापती रमेश सोनवणे यांनी दिली. याबाबत सभापती रमेश सोनवणे यांनी सांगितले की, बुधवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मी पंचायत समितीमध्ये अचानक भेट दिली.यावेळी कार्यालयात विविध कामांसाठी आलेले नागरिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची वाट पाहत होते. यासंदर्भात माहिती मिळाल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्य स्थानावर जाऊन पाहणी केली. त्यावेळी अनेक अधिकारी व कर्मचारी अनुपस्थित असल्याचे आढळले.त्यामुळे कनिष्ठ प्रशासन अधिकारी व्ही.जी.बुजुर्गे यांच्या उपस्थितीत पंचनामा केला. या पाहणीमध्ये जी.एस. काळे, एन.बी. कुमठेकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी के.एम.जाधव, पशुधन अधिकारी के.डी.लिंबाळकर, डीआरडीए विभागातील पवळे व चव्हाण, एन.ए. गायकवाड,एच.डी.सगरे, शाखा अभियंता एस.जी. कुलकर्णी, एस.के.सोमवंशी, एस.एम.राठोड,एस.एम. जटाळ, आढळकर, तालुका आरोग्य अधिकारी देशमुख, शृंगारे, डमाळे, एस.एस. नरहरे, येलाले, जाधव, शेख व रबशेट्टी हे कर्मचारी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले.

09 TO 15 AUGUST 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 07/08/2021 9:10 PM Page 1



# मानवी चुकांचे निसर्गावर खापर!

माणसाने विज्ञानाच्या जोरावर किती जरी प्रगती केलेली असली तरी निसर्गासमोर तो खुजा आहे. निसर्गाला आव्हान देन किंवा निसर्गावर मात करणे त्याला पूर्वीही शक्य नव्हते आणि आताही नाही. मात्र सगळ्याच बाबतीत निसर्गाला दोष देता येणार नाही. अतिवृष्टी ही जरी निसर्गामुळे होत असली तरी अतिवृष्टीतील पाण्याचा निचरा करणे किंवा या पाण्याची साठवणूक करून आवश्यकता असलेल्या भागाकडे ते वळवणे माणसाच्या हाती आहे. शिवाय अतिवृष्टीची पूर्व कल्पना देणारी यंत्रणा आपल्याकडे आहे. पण उपलब्ध साधन संचितांचा योग्य वापर करण्याची अक्कल सरकारलाही नाही आणि प्रशासनाला सुद्धा नाही. आज अतिक्रमणे इतकी वाढली आहेत की नद्यांची पात्र अरुंद करण्यात आलीत. अतिक्रमणाला जमीन उपलब्ध व्हावी यासाठी नद्यांचे प्रवाह बदलण्यात आलेत. शहरातील सांडपाणी वाहून नेणारे नाले बुजवून त्यावर इमारती बांधण्यात आल्यात, त्याचेच दुष्परिणाम म्हणून जेंव्हा अतिवृष्टी होते तेंव्हा साचलेले अतिरिक्त पाणी वाहून जाण्यासाठी मार्गच नसल्याने शहरात साचलेल्या पाण्याची पातळी वाढते. त्यातच धरणांचे पाणी पूर्व सूचना न देताच त्याचा विसर्ग केला जातो. परिणामी धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील गावांमध्ये पाणी घुसते, म्हणजे एकीकडे मुसळधार पावसाने साचलेले पाणी आणि धरणातून सोडलेले पाणी यामुळे शहरे बुडतात. नद्यांना पूर येतो. चिपळूणमध्ये तेच घडले. वशिष्ठ नदीला दरवर्षी पूर येतो, पण संपूर्ण शहर बुडत नाही. यावेळी दोन तासात ६५० मिमी.पाऊस पडला. त्यामुळे शहरात गुडघाभर पणी साचले आणि त्याच वेळेस कोलकेवडी धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आला. परिणामी संपूर्ण चिपळूण शहर बुडाले. आता या बाबत निसर्गाला दोष देणार का? त्यामुळे याला चिपळूण मधील महापालिका प्रशासन जबाबदार आहे का? याची चौकशी करा अशी काँग्रेस पक्षाने जी मागणी केली आहे ती योग्यच आहे. प्रशासनाने आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी निसर्गाला दोष देणे बरोबर नाही. उलट निसर्ग प्रामाणिक असल्याने त्याच कालचक्र नियमानुसार सुरू आहे. पण माणूसच जर जाणून बुजून काही चुका करीत असेल आणि त्यातून वित्त आणि जीवित हानी होत असेल तर त्याला निसर्ग काय करणार? प्रत्येक वेळी निसर्गाला दोष देऊन आपली जबाबदार झटकण्याचा काम सरकार आणि प्रशासनातील अधिकारी करीत आहेत. पण आता त्यांचं पितळ उगड पडणार आहे. कारण लोकांना कळून चुकले आहे की अतिवृष्टी जरी निसर्गामुळे होत असली तरी महापूर येणे किंवा शहरांमध्ये अथवा गावात पणी घुसून लोकांचे वित्त आणि जिवित्त हानी होणे याला निसर्ग जबाबदार नाही, तर अतिक्रमणाला प्रोत्साहन देणारे आणि नद्या नाल्यांचे प्रवाह अडविणारे, धरणांच्या कामात भ्रष्टाचार करणारे लोकच महापुर आणि शहरात जलभराव होण्यास कारणीभूत आहेत. आज शहरे आणि काही गावांमध्ये सुद्धा सिमेंटचे जंगल उभे राहते आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरेनासे झालेय. परिणामी पूर्वी जिथे चार फुटावर पाणी लागायचे तिथे आता ४० फूट खोदले तरी पाणी लागत नाही. जमिनीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जातेय. तर कारखान्यातील धुरांड्या मधून बाहेर फेकलेले दूषित वायू आणि दूषित पाणी यामुळे लोकांचे आरोग्य बिघडत आहे. पण त्याकडे कुणाचेही लक्ष नाही. आमच्याकडे जे प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे त्याचा संबंध फक्त पैसे खाण्यासाठीच असल्याने लोकांच्या आरोग्यापेक्षा कारखानदारांचे हित त्यांच्यासाठी अधिक महत्वाचे आहे. महाराष्ट्र हा सह्याद्रीच्या कड्या कपाऱ्यांनी वेढलेला आहे. त्यामुळे बरीचशी गावे डोंगर उतारावर आहेत. आणि त्या गावांच्या सुरक्षेबाबत कुणालाच काही पडलेली नाही. त्यामुळे माळीनसारख्या दुर्घटना होतात. पण अशा गावांच्या सुरक्षित स्थलांतर बाबत आजवर कुठल्याही सरकारने गांभीर्याने विचार केलो नाही. दरड कोसळून दुर्घटना घडली की पाच लाखांची मदत जाहीर करायचे रिकाम्या हाताने आणि निर्विकार चेहऱ्याने दुर्घटनाग्रस्त गावांना भेटी द्यायच्या बस! सरकारची जबाबदारी संपली! हे कुठेतरी थांबायला हवे सरकारने माणसे मेल्यावर त्यांना मदत करण्याऐवजी त्यांचे जीव वाचवण्यासाठी पैसा खर्च करावा येवढेच लोकांचं म्हणणं आहे.

# भाजपची 'मनसे' सलगी!



**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

प्रत्येक राजकीय पक्षाची स्वतःची एक विचारसरणी असते. आणि त्याच्या आधारेच त्या पक्षाची वाटचाल सुरू असते. अशावेळी सत्तेसाठी जर काही समीकरणे जुळवयची असतील तर तडजोडी कराव्याच लागतात. पण त्याचा भविष्यात तोटाही होऊ शकतो. छोट्या प्रादेशिक पक्षाचे ठीक आहे. पण मोठ्या राष्ट्रीय पक्षांची जी इमेज तयार झालेली असते तिची व्याप्ती राष्ट्रीय स्तरावर असल्याने छोट्या आणि प्रादेशिक पक्षा सोबत युती किंवा आघाडी करताना आपल्या राष्ट्रीय प्रतिमेला जराही धक्का बसणार नाही याची काळजी घ्यावी लागते. शिवसेना भाजपची २३ वर्षांची मैत्री तुटल्यानंतर भाजपला एक सक्षम अशा राजकीय मित्राची आवश्यकता होती आणि त्यासाठीच भाजपने मनसेला चुचकारण्यास सुरवात केली आहे. काल भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत दादा पाटील आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट झाली. या भेटीत भलेही राजकीय चर्चा झाली असेल पण मनसेचा जो परप्रांतीय लोकांबाबतचा दृष्टिकोन आहे तो भाजपला परवडणारा नाही. कारण भाजप एक मोठा राष्ट्रीय पक्ष आहे आणि केंद्रात या पक्षाचे सरकार आहे. त्याच बरोबर भाजपचे बहुसंख्य खासदार आणि प्रमुख नेते हे उत्तर भारतीय पट्ट्यातले आहेत. आणि परप्रांतीयांच्या मुद्यावरून उत्तर भारतातील लोकांचे मनसेशी तीव्र मतभेद आहेत. अशा स्थितीत मनसे बरोबर युती करणे भाजपला परवडणारे नाही. आणि तसेही मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे नाशिक सोडले तर उर्वरित महाराष्ट्रात मनसेची फारशी ताकत नाही. पण दुर्दैवाने महाराष्ट्रात भाजप सोबत काही असेच पक्ष आहेत ज्यांची राज्यात फारशी ताकत नाही. ज्यात विनायक मेटेंचा शिवसंग्राम, महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष आणि आठवलेंचा आरपीआय या तिन्ही पक्षाची स्वतःचा एक नगरसेवक निवडून आणण्याची इतकीही ताकत नाही. त्यामुळेच भाजप अस्वस्थ आहे आणि म्हणूनच त्यांना मनसेसारख्या आक्रमक पक्षाची आज गरज आहे. आरपीआय, शिवसंग्राम आणि रासप पेक्षा मनसेची ताकत निश्चितच मोठी आहे. शिवाय राज ठाकरे यांच्या सारखा मास लीडर आहे. ज्याची आज मराठी माणसांवर बऱ्यापैकी पकड आहे. अशा वेळी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपला राज ठाकरे यांचा मोठा फायदा होऊ शकतो आणि तसे पाहता लॉकडाऊन आणि सततच्या निर्बंधांमुळे तसेच मुंबई लोकल सर्वसामान्यांना बंद केल्यामुळे शिवसेनेवर मुंबईकर जनता नाराज आहे. त्यामुळे आगामी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत या नाराजीचा मोठा फटका शिवसेनेला बसू शकतो. अशावेळी राज ठाकरे जर भाजपच्या सोबत असतील तर मुंबई महापालिका शिवसेनेच्या हातून हिसकावून घेणे भाजपला कठीण नाही. पण मनसे भाजपा युती मध्ये व परप्रंतियांचा मुद्दा अडसर ठरू शकतो आणि मनसेचे सर्व राजकारण हे स्थानिक भूमिपुत्र, मराठी अस्मिता आणि परप्रांतीय विरोध यावरच अवलंबून असल्याने मनसे त्यापासून हटणार नाही. मात्र युती किंवा आघाडी न करता मैत्रीपुर्वक संबंध ठेऊन शिवसेनेला सतत दबावाखाली ठेवता येईल. त्याचबरोबर शिवसेनेने आतापर्यंत मनसेचे बरेच नेते आणि कार्यकर्ते फोडले आहेत. त्यामुळे पालिका निवडणुकीच्या तोंडावर मनसेला हाताशी धरून भाजप शिवसेनेला खिंडार पडू शकेल आणि तसे झाले, तर त्याचा भाजपला मोठा फायदा होईल आणि त्यादृष्टीनेच भाजपकडून चाचपणी सुरू आहे. मनसेकडे तरुण कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. पण संघटनात्मक बांधणी म्हणावी तशी झालेली नाही. पण तरीही भाजपला जर मनसेची ताकत मिळाली तरी भाजप मुंबई महापालिका काबीज करू शकेल. आणि त्यादृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. शिवसेनेची संघटनात्मक ताकत आहे, पण आता सततच्या कठोर निर्बंधांमुळे लोकं शिवसेनेवर चिडलेले आहेत. ज्या मुंबईकरांच्या नोकऱ्या गेल्या, ज्या मुंबईकरांना लोकल ट्रेनचा प्रवास नाकारला जातोय त्यांचा शिवसेनेवर भयंकर राग आहे आणि मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत १०० टक्के हा राग व्यक्त होणार त्या रागाला आणखी हवा देण्यासाठी भाजपला राज ठाकरे सारख्या हुकमी एकक्याची गरज आहे. मोठमोठ्या सभा गाजविणारे राज ठाकरे हे आज तरी महाराष्ट्रातील एक आक्रमक आणि लढाऊ नेते मम्हणून ओळखले जातात, आता भाजपा कशावप्रकरे त्यांच्याशी जवळीक साधते आणि त्यांचा वापर करून घेते ते लवकरच दिसेल.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# स्पायनल मस्क्युलर ट्रोफीग्रस्त आजारावरील उपचाराच्या सुविधेमुळे रुग्णांना नवजीवन –मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

## दुर्मिळ आजारावरील महागडी उपचाराची सुविधा नायर रुग्णालयात सुरू

**मुंबई/प्रतिनिधी**



लहान मुलांमध्ये आढळून येणाऱ्या 'स्पायनल मस्क्युलर ट्रोफी' या दुर्मिळ आजारावरील महागडी उपचाराची सुविधा येथील नायर रुग्णालयात सुरू करण्यात आली आहे. यामुळे योग्यवेळी उपचार मिळाल्याने या मुलांना नवजीवन मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. या सुविधेसोबतच मुंबईत जिनोम सिक्वेंसिंग लॅब देखील सुरू करण्यात आली असून कोरोनाविरुद्धच्या लढ्याला त्यामुळे बळ प्राप्त झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय आणि बाई यमुनाबाई लक्ष्मण नायर रुग्णालयाच्या शतकोत्तर महोत्सवास मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यानिमित्त जिनोम सिक्वेसिंग लॅब आणि स्पिनराझा औषधोपचार प्रकल्पाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, आमदार श्रीमती यामिनी जाधव, उप महापौर ॲड. सुहास वाडकर, महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेता श्री. रवी राजा, महापालिका आयुक्त आय. एस. चहल, टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक, सदस्य डॉ. शशांक जोशी, बालरोग तज्ज्ञांच्या टास्कफोर्सचे अध्यक्ष डॉ. सुहास प्रभू आदि मान्यवर उपस्थित होते. अनेकांना दीर्घायुष्य देणाऱ्या शतायुषी नायर रुग्णालयाच्या सेवेला प्रणाम करून सर्व डॉक्टर, नर्सेस आणि कर्मचाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन करीत शतकोत्तर वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते रेज अगेन्स्ट दि डाईंग ऑफ लाईट या डॉ. शिशिर श्रीवास्तव लिखित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले, स्पायनल मस्क्युलर ट्रोफीसारख्या दुर्धर आजारापासून लहान मुलांना वाचवण्याची गरज आहे. या आजारावरील उपचाराचा खर्च हा कोट्यावधीमध्ये आहे. काही दिवसांपूर्वी वेदिका शिंदे या बालिकेचे याच आजाराने निधन झाले. तिला १६ कोटी रुपयांचे इंजेक्शन देण्यात आले होते मात्र तिचे प्राण वाचू शकले नाहीत. भविष्यात या आजाराने लहान मुले दगावू नयेत म्हणून महापलिकेचे डॉक्टर्स अविरत प्रयत्न करत आहेत. त्यावरील औषध भारतात उपलब्ध करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. आजपासून नायर रुग्णालयात स्पायनल मस्क्युलर ट्रोफी' या दुर्मिळ आजारावरावर उपचाराची सुविधा निर्माण झाली आहे. अमेरिकास्थित संस्थेच्या माध्यमातून या आजारावर प्रभावी असणारे महागडे इंजेक्शन रुग्णांना मोफत उपलब्ध करून दिले जाणार असून सध्या नायर रुग्णालयातील १७ रुग्णांना त्याचा लाभ होईल.

कोरोनाविरुद्धची लढाई गेल्या दीड वर्षापासून सुरू असून त्यात डॉक्टर्स, कर्मचारी खंबीरपणे लढत आहेत. या परिश्रमामुळे लाखो नारिकांना जीवनदान देण्याचे काम झाले आहे. मुंबई महापालिकेमार्फत करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे जगात मुंबई मॉडेलचे कौतुक झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कोरोनाचा विषाणु नवीन अवतार घेत असतो. विषाणूने बदलेला अवतार शोधून त्यावर वेळीच उपचार शोधण्यासाठी जिनोम सिक्वेंसिंग लॅब उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे मुंबईमध्ये अशी लॅब असणे गरजेचे होते. आजपासून ही लॅब कार्यरत होईल त्यामुळे कोरोना विषाणू विरुद्धच्या लढ्याला अधिक बळ प्राप्त होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

कोरोनाची वाढ जिथे जिथे होते तिथल्या विषाणुला शोधून काढणे, त्याचे जनुकीय परिणाम शोधणे गरजेचे असते. नसता अनर्थ घडतो. जेवढा विषाणुचा प्रकार ओळखण्यास उशीर तितके त्याचे परिणाम समजून घेणेही कठीण असते हे कोरोना विषाणुवरून आपणास दिसून आले आहे. त्यामुळे मुंबईमध्ये सुरु झालेली जिनोम सिकवेन्सींग लॅब स्थापन करण्याची इच्छा महापालिकेने पूर्ण करून दाखवली. त्यासाठी शासन आणि महापालिकेवर आर्थिक भार न टाकता त्यांनी सीएसआर निधीतून हे काम केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. यावेळी महापौर किशोरी पेडणेकर, पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य समितीच्या अध्यक्ष श्रीमती राजुल पटेल, डॉ. शशांक जोशी, डॉ. संजय ओक, महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी मनोगत व्यक्त केले. अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव, श्रीमती राखी जाधव, शिक्षण समिती अध्यक्ष श्रीमती संध्या दोशी, महिला व बाल कल्याण समिती अध्यक्ष श्रीमती राजराजेश्वरी अनिल रेडकर सह आयुक्त (मनपा आयुक्त कार्यालय) चंद्रशेखर चोरे, उप आयुक्त (सार्वजनिक आरोग्य) संजय कुऱ्हाडे, संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये) तथा नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. रमेश भारमल यांच्यासह संबंधीत मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

जिनोम सिक्वेसिंग लॅबविषयी : नेक्स्ट जनरेशन जीनोम सिक्वेसिंग ही पद्धती वापरुन विषाणूंचे जनुकीय सूत्र ओळखता येते. त्यामुळे एकाच विषाणूच्या दोन किंवा अधिक प्रजातींमधील नेमका फरक ओळखता येतो. असा फरक ओळखू आल्यानंतर उपचार पद्धतीची नेमकी दिशा स्पष्ट होते. जिनोम सिक्वेसिंग वैद्यकीय प्रयोगशाळा (लॅब) मध्ये एकाचवेळी मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय नमुन्यांची चाचणी करता येणे शक्य होते. सध्याच्या कोविड – १९ विषाणू संसर्ग कालावधीत कोविड विषाणूचे नवनवीन प्रकार समोर येत आहेत. अशा स्थितीत जीनोम सिक्वेसिंग लॅबमध्ये वैद्यकीय नमुन्यांची तपासणी करुन उपचारांना वेग देणे शक्य होणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात जिनोम सिक्वेसिंग संयंत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहे. अमेरिकेतील इलुम्निया या कंपनीने, अमेरिकेतीलच अल्ब्राईट स्टोनब्रिज ग्रुप (ए. एस. जी. – बोस्टन) या संस्थेच्या माध्यमातून एकूण ६ कोटी ४० लाख रुपये किंमतीचे २ जीनोम सिक्वेसिंग संयंत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेला दान स्वरुपात दिले आहे. त्यासोबत ए. टी. ई. चंद्रा फाऊंडेशन यांनी देखील सुमारे ४ कोटी रुपयांची मदत या संयंत्रांसाठी आणि त्याद्वारे होणाऱ्या चाचण्यांसाठी केली आहे. जीनोम सिक्वेसिंग संयंत्राद्वारे एकाचवेळी ३८४ नमुन्यांची तपासणी होऊन ४ दिवसांच्या आत वैद्यकीय निष्कर्ष प्राप्त होऊ शकतात.

स्पिनराझा औषधोपचार प्रकल्पाविषयी : स्पायनल मस्क्युलर ॲट्रॉफी (एस. एम. ए.) हा लहान मुलांमध्ये आढळणारा दुर्मिळ आजार असून त्यातून मुलांचे स्नायू विकसीत होत नाहीत. परिणामी, या आजाराने ग्रस्त संबंधीत मुलांना आयुष्यभर विकलांग जीवन जगावे लागू शकते किंवा त्यांचा मृत्यू देखील ओढवू शकतो. या आजारावरील औषधोपचार अत्यंत महागडे आहेत. ही बाब लक्षात घेता, अमेरिकेतील कॅलिफोर्निया स्थित डायरेक्ट रिलिफ या बिगर शासकीय संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयामध्ये स्पायनल मस्क्युलर ॲट्रॉफी रुग्णांवर उपचार करण्यासाठी मदतीचा हात पुढे केला आहे. सदर आजाराने ग्रस्त १७ रुग्णांची निवड आंतरराष्ट्रीय वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीने केली आहे. या १७ रुग्णांना स्पिनराझा हे औषध देण्यासाठी डायरेक्ट रिलिफ ही संस्था सर्व आर्थिक भार उचलणार आहे. स्पिनराझा औषधाच्या एका डोसची किंमत सुमारे ८७ लाख रुपये इतकी असून पहिल्या वर्षी सुमारे ६ कोटी तर, त्यापुढील प्रत्येक वर्षी ३ कोटी २० लाख रुपये इतका खर्च संपूर्ण आयुष्यभर एका रुग्णाला करावा लागतो. ही आत्यंतिक महागडी उपचार पद्धती निवडलेल्या १७ रुग्णांना पुरविण्यासाठी डायरेक्ट रिलिफ ही संस्था महानगरपालिकेला सहकार्य करीत आहे.

# न्यायालयाच्या आदेशाने भिवंडीतील भूमी वर्ल्डच्या मालकावर गुन्हा दाखल

**भिवंडी/प्रतिनिधी**

अनधिकृत बांधकामासह शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक आदी प्रकरणांमध्ये सतत चर्चेत असलेल्या भिवंडीतील भूमी वर्ल्ड गोदाम संकुलनाचे मालक व बांधकाम व्यावसायिक प्रकाश नानाजी पटेल यांच्यासह त्यांचे भाऊ व व्यवस्थापकावर दलित समाजातील युवकाला शिवीगाळ व अंगावर धावून गेल्याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यासह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे पोलिसांकडून न्याय न मिळाल्याने घटनेच्या तब्बल पाच महिन्यांनंतर ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशा नंतर कोनगाव पोलिसांनी भूमी वर्ल्डच्या मालकांवर गुन्हा दाखल केला आहे.

प्रकाश नानजी पटेल, संदीप नानजी पटेल व रंजित बाबरे असे गुन्हा दाखल झालेल्या बांधकाम व्यावसायिक व व्यवस्थापकाची नवे असून प्रकाश पटेल व संदीप पटेल हे भिवंडीतील पिंपळास येथे असलेल्या भूमी वर्ल्ड गोदाम संकुलाचे मालक असून रंजित बाबरे हा त्यांचा व्यवस्थापक आहे. २३ जानेवारी रोजी आरपीआय आठवले गटाचे भिवंडी तालुकाध्यक्ष अभय बंडू जाधव हे आपला मित्र जितेंद्र जगन्नाथ जाधव याच्या सोबत पाईप लाईनने माणकोली येथे जात असतांना भूमी वर्ल्ड जवळ थांबेल असता फोनवर बोलत असतांना सुरक्षारक्षकाने अभय यांनी बांधकामाचे फोटो काढल्याचा संशय आल्याने तशी माहिती भूमिवर्ल्ड व्यवस्थापनास दिली त्यांनतर याठिकाणी भूमिवर्ल्ड गोदाम संकुलनाचा व्यवस्थापक रंजित बाबरे, भूमिवर्ल्डचे मालक प्रकाश पटेल व संदीप पटेल यांच्यासह इतर आठ ते दहा जण आले व त्यांनी अभय यांच्या अंगावर धावत जाऊन जातीवाचक शिवीगाळ केली. त्यामुळे अभय जाधव यांच्या सामाजिक व धार्मिक भावना दुखावल्या होत्या. याप्रकरणी अभय जाधव यांनी कोनगाव पोलीस ठाण्यात भूमिवर्ल्डच्या मालक व व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार केली होती मात्र कोनगाव पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष करत उलट अभय जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांवर त्यावेळी गंभीर गुन्हा दाखल केला होता. कोनगाव पोलिसांकडून




न्याय न मिळाल्याने अखेर अभय जाधव यांनी ठाणे जिल्हा स्तर न्यायालयात धाव घेतली होती अखेर जिल्हा सत्र न्यायालयाने सीआरपीसी कलम १५६(३) नुसार कोनगाव पोलिसांना तपास करण्याचे आदेश दिल्यानंतर घटनेच्या पाच महिन्यांनंतर १३ जुलै रोजी कोनगाव पोलिसांनी भूमिवर्ल्ड चे मालक व व्यवस्थापक अशा तीन जणांवर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यासह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान न्यायालयाच्या आदेशाने भूमी वर्ल्ड गोदाम संकुलच्या मालकावर गुन्हा दाखल केला असून अजून कुणालाही अटक करण्यात आली नाही अशी प्रतिक्रिया या प्रकरणाचे तपास अधिकारी तथा भिवंडी पश्चिमचे सहा. पोलीस आयुक्त किसन गावित यांनी दिली आहे. तर गुन्हा दाखल होऊन २० दिवस उलटूनही कोनगाव पोलिसांनी आरोपींना अटक केलेली नसल्याने फिर्यादी अभय जाधव यांनी पोलिस प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात संबंधीतांशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# मध्यस्थी करण्याचा प्रयत्न अंगाशी आला जळगावच्या उपमहापौरांवर गोळीबार झाला

जळगाव/क्राईम रिपोर्टर

**आजकाल सामाजिक क्षेत्रातील वातावरण सुद्धा इतके बिघडलेले आहे कुणाच्या भांडणात मध्यस्थी करून ते मिटवण्याचा प्रयत्न करणे हा सुद्धा गुन्हाच ठरतोय आणि मध्यस्थी करणाऱ्याला त्याची किमत सुद्धा चुकवावी लागतेय. जळगावच्या उप महापौरांच्या बाबतीतही असेच झाले. त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन दोन गटातील भांडण मिटवण्यासाठी प्रयत्न केले. पण काही लोक त्यांच्याच जीवावर उठले. त्यांना धमक्या देऊ लागले आणि एकेदिवशी त्यांचा घरापर्यंत पाठलाग करून त्यांच्यावर गोळीबार केला. सुदैवाने ते यातून बचावले. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून दोघे फरार झालेत.**







किरण शरद राजपूत



उमेश पांडुरंग राजपूत

जळगावचे शिवसेनेचे उप-महापौर कुलभुषण पाटील यांच्यावर २५ जुलै गोळीबार झाला. या गोळीबारापुर्वी हल्लेखोरांनी उप महापौर कुलभुषण पाटील यांना तु जिवंत राहणार नाही असा दम दिला होता. तुझा गेम करु, सकाळी पेपरमधे मोठ्या बातम्या भरुन येतील. मात्र त्या बातम्या वाचण्यासाठी तु जिवंत राहणार नाही अशी हल्लेखोरांनी कुलभुषण पाटील यांना धमकी दिली होती. या प्रकरणी उप महापौर कुलभुषण पाटील यांनी रामानंद नगर पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली आहे. या फिर्यादीत म्हटल्याप्रमाणे २५ जुलै रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास नितीन भिमसिंग पाटील, निलेश ठाकुर, उमेश पाटील यांच्यात जुन्या कारणावरुन वाद झाला होता. याप्रकरणी समोरचे लोक पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेल्याचे समजल्यामुळे कुलभुषण पाटील पोलिस स्टेशनला गेले व त्यांनी आपसात समेट घडवून वाद मिटवला होता. त्यानंतर प्रत्येक जण आपल्या घरी गेला. त्यानंतर रात्री पावणे नऊ वाजेच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर फोन आला. पलीकडून बिऱ्हाडे बोलत असल्याचे सांगणा-या व्यक्तीने त्यांना म्हटले की तु दुपारी पोलिस स्टेशनला समझौता घडवून आणला. नितीन राजपूतला माझ्याकडे आणणार होता. आम्ही त्याला सोडणार नाही. तु मधे पडला तर तुझा देखील गेम करु. पलीकडून बोलणाऱ्या व्यक्तीला समजावण्याचा प्रयत्न करत असतांना शिवीगाळ करत पलीकडून फोन कट झाला. त्यानंतर उप महापौर पाटील यांना रात्री नऊ वाजेच्या सुमारास पुन्हा फोन आला. तु कुठे आहे? तु फार मोठा नेता झाला आहे काय? आज तुझा गेम करु. उद्याच्या पेपरमधे तुझ्या बातम्या येतील मात्र तु त्या बातम्या वाचण्यासाठी जिवंत राहणार नाही. त्यानंतर पुन्हा फोन कट झाला. त्यानंतर उप महापौर पाटील पिंप्राळा रस्त्याने घराच्या दिशेने त्यांच्या सहका-यासोबत दुचाकीने जात होते. त्याचवेळी वखारीजवळ एक कार तेथे आली. कारमधे बसलेल्यांनी पाटील यांची दुचाकी अडवली. वाहनात बसलेल्यांनी कारची काच खाली करत म्हटले की थांब कुल्या आज आम्ही तुझा गेम करणार आहे. तुला जिवंत सोडणार नाही. गाडीत महेंद्र राजपुत, त्याचा भाऊ उमेश राजपुत, मंगल राजपुत, बिऱ्हाडे (पूर्ण नाव माहीत नाही) असे बसले होते त्यातील महेंद्र राजपुत व उमेश राजपुत यांनी गाडीतुन पिस्टल बाहेर काढली. पिस्टल बघून उप महापौर पाटील घाबरले. मोटार सायकल चालवणाऱ्या अनिल यादव याला घराच्या दिशेने जोरात दुचाकी दामटण्यास त्यांनी सांगितले. कारमधील सर्व जण त्यांचा पाठलाग करत होते. हनुमान मंदिराजवळ,आनंद मंगल कॉलनी जवळ कारमधून एक गोळी सुटलि. मात्र ती पाटील यांना लागली नाही. घाबरलेल्या अवस्थेत आलेल्या कुलभुषण पाटील यांनी घराबाहेर बसलेल्या परिवाराला तातडीने घरात पळून जाण्यास सांगितले. तेवढ्यात आलेल्या इनोव्हा गाडीतून आलेल्या सर्वांनी कुलभुषण पाटील यांना जोरजोरात शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. महेंद्र राजपूत याने कुलभुषण पाटील यांच्या दिशेने एक गोळी झाडली. गोळीबार झाल्याचा आवाज ऐकून पाटील यांची पत्नी व मुले देखील घाबरली व गॅलरीत आली. दरम्यान महेंद्र राजपुत याने पाटील यांच्या दिशेने गोळीची एक फैर झाडली. त्या आवाजाने पाटील यांची पत्नी व मुले घराच्या पहिल्या मजल्यावरील गॅलरीत आले. परिवारला बघून हल्लेखोरांनी त्यांच्या दिशेने गोळी झाडली. पाटील यांनी घाबरुन पत्नी व मुलांना वॉल कंपाऊंडच्या मागे लपण्यास सांगितले. हल्लेखोरांनी पुन्हा पाटील यांच्या दिशेने फायर केले. या गोळीबारीचा आवाज ऐकून गर्दी जमली. गल्लीतील लोकांना शिवीगाळ करत कुणी मधे पडल्यास मारुन टाकण्याची धमकी सत्र सुरु करण्यात आले. आलेले सर्व हल्लेखोर आल्या पावली परत गेले. या घटनेची माहीती मिळाल्यानंतर रामानंद नगर पोलिस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. उपमहापौर कुलभूषण पाटील यांच्यावर गोळीबार झाल्याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयित तरुणांना अटक केली असून त्यांनी गोळीबार झाला असल्याचे पोलिसांना सांगितले आहे. दरम्यान क्रिकेटमधील वादातून हा गोळीबार असल्याचे सांगण्यात येत असले तरी दीड लाख रुपयांच्या थकित रकमेवरुन हा वाद झाल्याचे समोर येत आहे. संशयित आरोपींपैकी किरण शरद राजपूत (२४) आणि उमेश पांडुरंग राजपूत (२१) या पिंप्राळा भागात राहणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. महेंद्र पांडुरंग राजपूत आणि भूषण बिऱ्हाडे हे दोघे फरार असून पोलिस त्यांच्या मागावर आहेत. गोळीबाराच्या वेळी संशयितांच्या सोबत जुगल बागुल व रोशन हे दोघेही सोबत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. रोशनचा जबाब पोलिसांनी नोंदवला असून महेंद्र राजपूतने पिस्तुलातून गोळीबार करण्यास सुरुवात केल्यामुळे आपण तेथून पळून गेलो, असे त्याने तपास करणाऱ्या पोलिसांना सांगितल्याचे स्थानिक सुत्रांकडून सांगण्यात आले आहे. नितीन भिमसिंग पाटील, नीलेश ठाकुर आणि उमेश पाटील यांच्यात रविवारी वाद झाले. यानंतर दोन्ही गटांनी थेट पोलिस स्टेशन गाठून एकमेकांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल केला. पो.नि. अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास स.पो.नि.संदीप परदेशी करत आहेत.

# शिवसैनिकांच्या खूनप्रकरणी पाच जणांना पोलीस कोठडी

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



सतीश क्षीरसागर विजय सरवदे

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथील शिवसैनिक सतीश क्षिरसागर व विजय सरवदे या दोघांच्या अंगावर टेम्पो घालून खून प्रकरणातील उर्वरित पाच आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना सोलापूर येथील न्यायालयात हजर केले असता ९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. १४ जुलै रोजी शिवसैनिक क्षिरसागर व सरवदे या दोघांच्या अंगावर टेम्पो घालून खून केल्याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे संतोष सुरवसे, रोहित उर्फ अण्णा फडतरे, पिंटू सुरवसे, आकाश बरकडे व रमेश सरवदे यांच्यासह चालक भैय्या असवले यांच्यावर मोहोळ पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. यातील टेम्पो चालक भैय्या असवले याला पोलिसांनी १५ जुलै रोजी अटक केली होती, तर उर्वरित पाच आरोपी फरार होते. दरम्यान सोमवारी उर्वरित पाच आरोपींना कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यातील आळंद तालुक्यातील हिरोळी गावच्या भाग्यवंती मंदिराच्या परिसरातून मोहोळ पोलीस निरीक्षक अशोक सायकर यांच्या पथकाने अटक केली होती. दरम्यान मंगळवारी सोलापूर येथील न्यायालयामध्ये रोहित फडतरे, संतोष सुरवसे, पिंटू सुरवसे, रमेश सरवदे व आकाश बरकडे यांना हजर केले असता तपास अधिकाऱ्यांनी मागील पंधरा दिवसांपासून संशयित आरोपी कोठे होते. या गुन्ह्यामध्ये आणखी किती जणांचा सहभाग आहे. या गुन्ह्यांचा कट कोठे रचण्यात आला. आरोपीचे मोबाईल जप्त करणे या कारणास्तव पोलीस कोठडी मागितली असता न्यायालयाने मान्य करून सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सोलापूरहून मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये संशयित आरोपींना आणताना मृतांच्या नातेवाईकांनी पोलीस ठाण्याच्या आवारात मोठी गर्दी केली होती. त्यांना पाहून पोलिसांनी पाठीमागील आवारातून आरोपींना नेताना मृतांच्या नातेवाईकांनी गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. काही काळ पोलीस ठाणे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सूर्यकांत पाटील हे करीत आहेत.

## देवणी खुर्द येथे लक्ष्मण रणदिवे यांच्या घरी फुलले ब्रह्मकमळ



देवणी : पावसाळ्याच्या दिवसात खास करून श्रावण महिना ते गणपती या दरम्यान अंधाऱ्या रात्री उगवणारे ब्रह्मकमळ हे सुंदर फूल आहे. हे फड्या निवडुंगाचे फुल वर्षातून एकदाच खुलत असल्याने ते दुर्मिळ आहे मात्र यंदा अधिक महिना अगोदर आल्याने श्रावण आगोदरच हा दुर्मिळ योग साधला गेला आहे देवनी खुर्द येथील पत्रकार लक्ष्मण रणदिवे यांच्या घरी ,बुधवारी रात्री बारा वाजल्यानंतर, ब्रह्मकमळ फुलण्याचा योग साधला गेला, हे फुल सहा वेळा उगवले गेले आहे, या वेळी सरोजा रणदिवे, श्रीशांत रणदिवे, केवळबाई रणदिवे, कुटुंबीयांनी रात्री १२:४० वाजता विधिवत पूजा केली. या फुलाचा इतिहास थोडक्यात ब्रह्मकमळ याला काटे नसतात त्यांचे पाने मांसल व हिरवी पप्पी लांबट असतात अंधाऱ्या रात्री फुलणाऱ्या या ब्रह्म कमळावर कीटकांना रक्षणासाठी आकर्षित करण्याचा हेतू असतो. या फुलाचा पानासारखा दिसणाऱ्या हिरव्या रंगाचा भाग हे या वनस्पतीचे खोड अनु कांडे म्हणतात. पकडायला असणाऱ्या काचेतून या ब्रह्म कमळाचा उगम होतो पांढ-या रंगाची चार ते १२ इंच लांबीची ही फुले जून ऑक्टोबर ते सप्टेंबर महिन्यात येतात कळी मोठे होते तसे पूल हळूहळू रात्री बारा वाजेपर्यत पूर्ण होत निशोमिलिंग अशा ब्रह्मकमळाची शोभाअवर्णनीय आहे.

# मोहंम्मद अयाज यांनी गायलेली कोरोना ध्वनिचित्रफीतीचे पोलीस आयुक्त अकुंश शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन



सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

शासनाचे नियम पाळा घरी रहा सुरक्षित रहा विनाकारण बाहेर फिरू नका या कोरोना जनजाग्रृती गीताचे प्रकाशन सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पोलीस उपायुक्त डॉ.दीपाली धाटे, पोलीस उपायुक्त बापू बांगर, पोलीस उपायुक्त डॉ.वैशाली कडुकर उपस्थित होते. हा कार्यक्रम पोलीस मुख्यालय येथे पार पडली आहे. या गीताचे गायक व संगीतकार महाराष्ट्राचे महागायक विजेता मोहम्मद अयाज असुन हे गीत कोरोनावर अधारीत आहे. कोरोनाला हद्दपार करा अजुन ही कोरोनाचा धोका संपलेला नसताना पुन्हा डेल्टा नावाच्या व्हाइरसने जगाला संकटात आणलेला आहे. अशा परिस्थीतीमधे समाजासाठी सतर्कता बाळगायला पाहिजे विना कारण बाहेर पड़णे, मास्क न लावणे, गर्दी जमवणे या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन अहोरात्र काम करत आहे. या ध्वनी चित्रफीतीमधे सोलापूर पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन कडुन समाजात कोरोना जनजाग्रृती म्हणुन अनेक उपक्रम राबवत आहेत. या गीतामधे पोलीस प्रशासनाने कोरोना संदर्भात केलेले कार्य दाखवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. पुन्हा एकदा कोरोनाची तिसरी लाट न येऊ देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार ६ ऑगस्ट रोजी पोलीस मुख्यालय येथे करण्यात आला आहे.

# पर्यावरणवादी सिद्धार्थ गणाईचा सह्याद्री ते हिमालय पायी प्रवास सुरू

भिवंडी/आकाश गायकवाड

शासनाच्या वतीने पर्यावरण संवर्धनासाठी विविध प्रयत्न केले जातात मात्र त्याकडे नागरिक दुर्लक्ष करीत झाडांची राजरोस कत्तल करीत असतो. त्यातच जंगलांचा ऱ्हास होत असल्याने पर्यावरण रक्षणाची जागतिक समस्या सध्या सर्वत्र निर्मा झाली आहे. मात्र अशा परिस्थितीतही कोणतीही शासकीय मदत न घेता पर्यावरण रक्षणासाठी एक झाड माणुसकीचं, एक पाऊल परिवर्तनाचे हि मोहीम हाती घेत रायगड ते सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट असा सुमारे दोन हजार किलोमीटरचे अंतर पायी चालत देशातील नागरिकांना पर्यावरण राक्षणासोबतच झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देत भिवंडीतील २४ वर्षीय तरुणाने आगळी वेगळी मोहीम हाती घेतली आहे. त्याच्या मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत आहे. सिद्धार्थ गणाई असे या २४ वर्षीय पर्यावरणवादी ध्येयवेड्या तरुणाचे नाव असून मागील ९ दिवसांपूर्वी २० जुलैला त्याने रायगड येथील छ. शिवाजी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन रायगड ते माउंट एव्हरेस्ट या मोहिमेला सुरुवात केली आहे. सिद्धार्थ अंधेरी येथील भवन महाविद्यालयात टी.वाय. बीएस.सी मध्ये शिक्षण घेत असून भिवंडीतील बापगाव येथील मैत्रिकुल येथे तो आपल्या मित्रांसोबत राहतो. पाच वर्षापूर्वी त्याने माउंट एव्हरेस्ट शिखर चढण्याचे स्वप्न उराशी बाळगले आहे. मात्र त्यासाठी येणार आर्थिक खर्च मोठे असल्याने सिद्धार्थने मोटरसायकल, सायकल, स्केटिंग अशा सर्व पर्यायांचा विचार व अभ्यास केलामात्र त्यातही खर्च व अडचणी जास्त असल्याने सिद्धर्थने पायी प्रवास करून माउंट एव्हरेस्ट सर करण्याचा निर्धार केला आहे. या मोहिमेत चालत जातांना प्रकृती बिघडू नये म्हणून फक्त घरचे जेवण व पाणी मिळावे असे आवाहन तो पायी जातांना करत असून प्रत्येक ठिकाणी थांबून एक एक झाड लावून 'एक झाड माणुसकीचा, एक पाऊल परिवर्तनाच' हा सामाजिक संदेश देत आहे.




पर्यावरणवादी सिद्धार्थ गणाईचे बालपण अत्यंत हलाखीत गेले आहे. सिद्धार्थ लहान असतांनाच आई वडिलांच्या घटस्फोट झाला. त्यावेळी पालन पोषणाची जबादारी वडिलांनी स्वीकारली . मात्र वाडीलांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने लहानपणी एक ते दोनवर्ष सिद्धार्थने मुंबईतील अंधेरी येथील एका पुलाखाली आपले बालपण काढले. त्यांनतर पोलिसांच्या मदतीने सिद्धर्थच्या आईचा शोध घेण्यात आला त्यावेळी त्याची आई केरळ येथे असल्याने सिद्धार्थचे प्राथमिक शिक्षण केरळ येथे झाले.मात्र २०११ पासून तो मुंबईत परतला. त्यांनतर मावशी व इतर नातेवाईकांनी त्याचा सांभाळ केला. सध्या तो भिवंडीतील बापगाव येथील मैत्रीकुल येथे राहत असून विद्यार्थ्यासाठी काम करणाऱ्या विद्यार्थी भारती संघटनेचा सदस्य असून येथूनच त्याला माउंट एव्हरेस्ट सर करण्याची प्रेरणा मिळाल्याचे सिद्धार्थ गणाई याने लोकमत प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले. विशेष म्हणजे त्याच्या या मोहिमेला कोणतीही शासकीय मदत मिळाली नसून त्याने स्वतःच पायी आपल्या स्वप्नंना गवसणी घातली आहे. सिद्धार्थ याचा नवव्या दिवसाचा प्रवास भिवंडीतून झाला. यावेळी पडघा परिसरातील युवा कवी मिलिंद जाधव यांनी त्याचे स्वागत करत एक झाड लावून त्यालापुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. निसर्गाची होत चाललेली कत्तल आणि निसर्गाचा कोप ही परिस्थिती मानवी जीवनावर येण्याचं मूळ कारण आपणच आहोत, आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करणारे देखील आपणच आहोत यासाठी मी हा एक छोटा प्रयत्न करत आहेअशी प्रतिक्रिया पर्यावरणवादी सिद्धार्थ गणाई याने दिली आहे.

# मोबाईल चोरी करणाऱ्या चोरांचा शिवाजीनगर पोलिसांकडून पर्दाफाश

## ६ मोबाईलसह एक मोटार सायकल व रोख रक्कम हस्तगत

लातूर/करकरे अंबादास

लातूर जिल्हयाचे पोलीस अधीक्षक निखील पिंगळे अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव उप विभागीय पोलीस अधिकारी जितेंद्र जगदाळे (लातुर शहर) यांनी मोबाईल चोरीचे वाढत्या गुन्हयाचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सुचना दिल्या होत्या त्यानुसार शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनिल पुजारी यांनी मोबाईल चोरीचे गुन्हे करणारे गुन्हेगाराचे माहिति घेवुन लातुर शहरातील तसेच पोलीस स्टेशन शिवाजीनगर हद्दीतील महत्वाच्या वर्दळी ठिकाणी बँक, हॉस्पीटल्स, मॉल्स व मंगल कार्यालय तसेच लातुर शहरातील गल्लीबोळातील पादचारी तसेच मोटार सायकलवर जाणाऱ्या लोकांचे मोबाईल जबरदस्तीने चोरी केले जातात याबाबत गोपनीयरित्या सविस्तरपणे माहिति घेऊन पोलीस स्टेशनकडे नेमणुकीस असलेले अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. त्याप्रमाणे शिवाजी नगर पोलीस स्टेशन भाग ५ गुरनं. ३०१/२०२१, गुरनं. ३०३/२०२१ कलम ३९२,३४ भादंवि प्रमाणे



दि. ३१/०७/२०२१ रोजी दाखल होता त्यात चोरीस गेलेला सॅमसंग कंपनीचा ए ७ तसेच रेड मी नोट असे मोबाईल व इतर यांचा शोध घेण्याकरीता पोलीस स्टेशन अंमलदार व उपविभाग अंतर्गत गुन्हे शोध पथक अंमलदार मोबाईल चोरी करणारे गुन्हेगाराचा शोध घेणे कामी गस्त घालताना सुशण जगन्नाथ कणसे वय २४ वर्ष रा.मोती नगर लातुर. प्रदीप संभाजी सुर्यवंशी वय २६ वर्ष रा. दगडवाडी ता.निलंगा जि.लातुर ह.मु. अजिंठा नगर लातुर ओमकार रमाकांत कसबे वय १९ वर्ष रा. महात्मा गांधी नगर लातुर हे मोबाईलची चोरी करण्याच्या सवईचे आहेत असे समजल्यावरून पथकातील अंमलदार यांनी सदर आरोपींना अटक करुन विश्वासात घेवुन चौकशी केली असता ६ मोबाईल, एक मोटारसायकल व रोख रक्कम ६ हजार रुपये चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. वरील आरोपींना सदर मोबाईल चोरी केल्याचे कबुली दिलेली आहे गुन्हयाचा अधिक तपास उप विभागीय पोलीस अधिकारी जितेंद्र जगदाळे पोलीस निरीक्षक सुनिल पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली मपोउपनि एस.आर. देशमुख, सपोउपनि काझी पोह चौगुले, पोना शिंदे, पोना देशमुख, पोना चामे, पोशि जाधव, बोचरे, हणमंते यांनी मोबाइल हस्तगत करुन वरील कामगिरी केली आहे.

## आपण यांना पाहिलत का?



कल्याण : नाव: सरगम श्रीरंग सातपुते (४०), अंगाने सडपातळ, रंग सावळा, चेहरा गोल , नाक सरळ, डोळे काळे, केस सफेद, उंची ५ फुट, अंगात नेसुस काळया व हिरव्या रंगाचा टि शर्ट व ग्रे रंगाची फुल पॅन्ट घातलेली भाषा मराठी, हिंदी बोलतात अशा वर्णनाची व्यक्ती रा. पराग बिल्डींग रूम नं २, नाना पावशे चौक, कालीमाता मंदीर जवळ, कोळसेवाडी, कल्याण पुर्व येथून दिनांक २४ जुलै २०२१ पासून बेपत्ता झाले असल्याची तक्रार त्यांची पत्नी आरती सातपुते यांनी कोळकेवाडी पोलीस ठाण्यात केली आहे. तरी ते कोणाला आढळून आले तर ९३७२०२३३१७/ ९८६९९९०५११/ ८१०४२२४३०२ या मोबाईल क्रमांकावर किंवा कोळकेवडी पोलीस ठाण्यात संपर्क करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# बचत गटांच्या माध्यमातून वृक्षसंवर्धन गांधी रिसर्च फाऊंडेशनचे खर्ची येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

जळगाव/प्रतिनिधी

गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे बचत गटांच्या माध्यमांतून ग्रामीण भागातील नागरीकांना आर्थीक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात असतानाच वृक्षसंवर्धनाचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षापासून एरंडोल तालुक्यातील खर्ची खु. येथे वृक्षारोपण करण्यात आले. पहिल्या वर्षी दहा विविध जातीच्या झाडांच्या रोपांची लागवड व संगोपन करण्यात आले. तर दुसऱ्या वर्षी १५ व यावर्षी ३० रोपांची लागवड केले. यापैकी ८० टक्के वृक्ष जगले आहेत. गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली ओम साईराम पुरूष बचत गटाकडुन १५ निंबाचे व १५ करंज चे असे ३० रोपांची खर्ची खु. येथील अंगणवाडी, राम मंदीर परिसर व रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आली. एवढेच नाही तर ते जबाबदारीने जगविण्याचा ध्यास युवकांनी यावेळी घेतला. गटाचा उद्देश निव्वळ बचत करणे नसून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून आहे. यातून सामाजीक बांधीलकी जोपासण्याचा संदेश देण्यात आला. वृक्ष लागवडीत ओम साई गटाच्या सदस्यांसोबत काही



ग्रामस्थांनीसुद्धा योगदान दिले. दरवर्षी हा उपक्रम गटाच्या निव्वळ नफ्यातुन रोपे आणी ट्रिगार्ड खरेदी करून राबवीला जातो. या प्रसंगी दिलीप मराठे, किशोर माळी, किरण पाटील, सुनील मराठे, महेंद्र जगताप, अविनाश मराठे, भगत भिल गांधी रिसर्च फाऊंडेशनचे प्रशांत सुर्यवंशी व मयुर गीरासे यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून....

## दारूच्या नशेत कुटुंबातील भानगडींना...

आल्यानंतर ते एकत्रच दारु पिण्यासाठी बसत होते. विष्णू हा नेहमीच जगदीशला दारु पिण्यासाठी घेवून जात असे. हा प्रकार जगदीशचे वडील मंगल भोये यांना आवडत नव्हता. ते नेहमी मुलगा जगदीश यास सांगत असत की तु विष्णूचा नाद सोड. तो चांगला मुलगा दिसत नाही. तु त्याच्यासोबत दारु पिण्यासाठी बसत जावू नकोस. मात्र वडील मंगल यांचे विष्णू या कानाने ऐकून त्या कानाने सोडून देत होता. मनाला वाटले तेव्हा विष्णू जगदीशच्या घरी येऊन त्याला दारु पिण्यास घेऊन जात होता. २४ जून २०२१ रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास विष्णू बागुल हा जगदीशला कामावर सोबत घेऊन गेला. दिवसभर काम केल्यावर दोघे जण आपल्या घरी आले. जगदीश आपल्या घरीच थांबला, तर विष्णू त्याच्या घरी निघून गेला. रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास जगदीश घरी होता. त्यावेळी विष्णू आणि गणेश हे दोघे त्याच्याकडे आले व काहीवेळाने तिघे जण बाहेर निघून गेले. विष्णू व गणेश या दोघांसोबत गेलेला जगदीश रात्रभर घरी आला नाही. त्याचे वडील संजय यांनी त्याची घरी येण्याची रात्रभर वाट पाहिली. मात्र तो काही घरी परतला नाही. त्यानंतर दुसरा दिवस उजाडला तरीही जगदीश घरी आला नाही. त्यामुळे त्याच्या घरच्यांना काळजी वाटू लागली. रात्री आठ-साडेआठ वाजल्यापासून घराबाहेर गेलेला जगदीश अजून कसा घरी आला नाही म्हणून संजयने संदीप यास सांगितले की अरे, मी जगदीशला किराणा आणण्यास पाठवले होते. त्याने किराणा आणला नाही की मला पैसेही दिले नाहीत, तेव्हा तो कुठे गेला आहे. त्याचा शोध घे. वडीलांनी सांगितल्यावर संदीपने आपले नातेवाईक व जगदीशच्या मित्रांना फोन लावून जगदीशबाबत चौकशी केली. मात्र जगदीशचा शोध काही लागला नाही. अखेर संदीप स्वतः जगदीशला शोधण्यासाठी घराबाहेर पडला. अवताळे शिवारात जेथे मुले बसतात तेथे तो काचवाल्याच्या घराकडे गेला असता त्या घरात जगदीश जमिनीवर पडलेला दिसला. त्याच्या डोक्यास मोठी दुखापत झाली होती. त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरु होता. शिवाय त्या घरात इकडे-तिकडे रक्ताचे सडे पडलेले होते. संदीपने जगदीशला हलवून पाहिले. आवाज देखील दिला, पण जगदीश काही उठला नाही. तो केंव्हाच मरण पावलेला होता. हे पाहून संदीप मनातून हादरला. त्याने या घटनेची खबर वडीलांना दिली. तसेच जगदीशचा मित्र गणेश गावित यास फोन करुन सांगितले की, जगदीशला कोणीतरी मारुन टाकले आहे. तो काचवाल्याच्या घरात पडला आहे. तो मरण पावला आहे. त्याच्या डोक्यास लागले आहे. हा निरोप मिळताच गणेश लगेच तेथे पळत आला. त्याला दिसले की जगदीशला काचवाल्याच्या पडक्या घरात कोणीतरी मारुन टाकले आहे. जगदीशचे वडील मंगल भोये हे देखील घटनास्थळी आले. त्यांनीही परिस्थिती पाहिली. जगदीश हा काचवाल्याच्या घरात पालथ्या अवस्थेत पडलेला होता. त्याच्या डोक्याला मोठी जखम झाली होती. तसेच जमिनीवर रक्त सांडलेले होते. त्याच्या अंगावरील कपडे रक्ताने माखलेले होते. त्याच्या डोक्यावर काहीतरी व कशाने तरी मारुन त्याचा खून करण्यात आला होता. मुलाचा क्रूरपणे झालेला खून झाल्याचे पाहून जगदीशच्या वडीलांना रडू कोसळले आणि याबाबतच फिर्याद दाखल करण्यासाठी त्यांनी वणी पोलीस ठाणे गाठले. जगदीश संजय भोये (२२) यास २४ जून २०२१ रोजी रात्री आठ ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास कोणीतरी घरातून बोलावून घेतले. त्याचा दि. २४ जूनच्या रात्री आठ-साडेआठ वाजल्यापासून ते दि. २६ जून २०२१ रोजी सकाळी नऊ वाजेपर्यत अवताळे शिवारातील हे काचवाल्याच्या पडक्या घरात नेवून व त्याचा कुठल्या तरी कारणावरुन डोक्यात दगड टाकून त्यास गंभीर जखमी करत ठार मारले अशी फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा रजि.नं. ४०४/२१ भा.दं. वि, कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वनिल राजपूत यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह आणि घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. घटनास्थळावरून रक्ताने माखलेल्या दगडासह महत्वाचे पुरावे पंचनामा करुन पुराव्यासाठी त्या वस्तू जप्त करण्यात आल्या. अप्पर पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, उपअधीक्षक अमोल गायकवाड यांनी घटनास्थळी धाव घेवून गुन्ह्याची माहिती घेतली. पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल राजपूत यांनी तपासाला सुरूवात केली. जगदीशचे कोण-कोण मित्र होते. घटनेच्या दिवशी व आधी कोणासोबत तो गेला होता याची माहिती पोलिसांनी घेतली. माहिती घेत असतांना पोलिसांना समजले की, जगदीशचा जीवलग मित्र विष्णू बाळू बागुल हा घटना घडल्यापासून गावातून बेपत्ता झाला आहे. मग पोलिसांनी तो कुठे गेला आहे याची माहिती मिळवली. गुजरात राज्यातील धरमपूर, ता. बलसाड या खेड्यात जावून तो लपून बसला असल्याची माहिती मिळताच तेथे एक पथक पाठवून त्याच्या मुसक्या आवळल्या. त्यास वणी पोलीस ठाण्याला आणून त्याच्याकडे चौकशी करण्यात आली असता मारेकरी विष्णू बाळू बागुल याने गुन्ह्याची कबुली दिली. मित्रानेच मित्राचा दगडाने ठेचून खून केल्याची घटना उघडकीस आली. पोलिसांनी जगदीशचा खून केल्याच्या आरोपाखाली विष्णू बाळू बागुल यास अटक केली. जगदीश हा विष्णूसोबत दारु पिण्यास बसला होता. त्यावेळी घरातील कौटुंबिक वादाच्या कारणावरुन दोघा मित्रांमध्ये वाद विकोपाला गेला. हा वाद इतका वाढला की विष्णूने जगदीशच्या डोक्यात दगड घालून त्याचा क्रूरपणे खून केला आणि गुजरात राज्यात पळून गेला असे त्याने कबुल केले. दिंडोरी पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी विजय बच्छाव, रोहिदास टोपले, कुणाल मराठे, सुमित जाधव आदींनी या गुन्ह्याच्या तपासात मोलाची कामगिरी बजावली.

## उसन्या पैशाच्या वादात मैत्रीचा पुसला...

असल्याने त्या दोघांची मैत्री ही वाढली. या मैत्रीतून ते दोघे एकमेकांच्या घरी येवू जावू लागले होते. सुरज हा प्रांपचीक होता. त्याला बायको मुले होती. त्यामुळे गंवडी कामातून मिळणाऱ्या पैशातून त्याची घरग्रहस्थी कशी बशी चालली होती. त्याचा हाता तोंडाचा घास पोटाला येत नव्हता. या उलट महादेव जाधव याचे होते. तो त्याच्या मोठया बहिणीकडे राहयाला असल्याने त्याचा खर्च थोडा आटोक्यात होता. सुरज आणि महादेव याची मैत्री असल्याने गंवडी कामाच्या सुट्टी दिवशी ते दोघे श्रमपरिहार म्हणून एकत्र बसून दारू पित होते. त्यामुळे दोघांच्या विचारांची देवाणघेवाण होत होती. एकमेकांच्या अडचणी दोघे ही जाणून होते.सुरज हा कायम पैशाच्या चणचणीत असतो हे महादेव याला माहित होते. गेल्या चार महिन्यापूर्वी सुरज याने आपली अडचण सोडविण्यासाठी म्हणून महादेवकडून दोन हजार रूपये हात उसणे घेतलेले होते. पैसे घेतेवेळी सुरजने महादेव याला दोन हजार रूपये एक दीड महिन्यात परत देतो असे त्याला सांगितले होते. तो पर्यत महादेव हा ही गप्प होता. परंतू दोन महिने झाल्यावर महादेव याने सुरजला दिलेले पैसे परत मागू लागला होता. तो त्याचेबरोबर कामावर आला की संध्याकाळी दोघे कामावरून परत जाताना महादेव मुद्दामच त्याच्याकडे दिलेल्या पैशाचा तगादा लावीत होता. सुरूवातीला सुरज हा त्याला आज देतो उदया देतो माझे अजून काम व्हयाचे आहे म्हणून सांगून वेळ मारून नेत होता.सुरज हा पैशासाठी आपल्याशी खोटे बोलत आहे हे महादेव याने ओळखले होते. त्याला ही माहित होते की सुरजकडे कुठले ही पैसे येणार नाहीत आणि तो सहजासहजी आपले घेतलेले पैसे ही परत देणार नाही म्हणून तो गंवडी कामाच्या पगारा दिवशी त्याचेकडे पैसे मागत होता. त्यावेळी सुरज हा त्याला वेगवेगळे कारण सांगून त्याला देशी दारूच्या दुकानात नेऊन एकादी दारूची बाटली देवून त्याला गप्प बसवत होता. महादेव याला ही दारू प्यायला मिळाली की तो तेवढयापुरते खुश असायचा. त्यावेळी तो दिलेल्या पैशाचा विषय काढत नव्हता. सुरजने त्याची ही कुंडली बरोबर ओळखली होती. तो पैशाचा विषय काढला की त्याला तो दारूची बाटली देत असायचा.त्यामुळे महादेव हा ही त्याचेकडे सारखा पैशाचा विषय काढत होता. त्याला त्याच्याकडुन उसणे दिलेले पैशापेक्षा दारू जास्त महत्वाची होती. पैशाच्या आडून तो त्याच्याकडून दारू पित होता. दारू पिला की तो गप्प बसत होता. पण कधी कधी महादेवलाही त्याच्याकडून पैसे घ्यावेत असेही वाटत होते. म्हणून तो सुरज भेटला की त्याला पैशाचा विषय काढून चार चौघांत त्याचा अपमान करीत होता. दोन तीन महिने झाले तरी तो काही पैसे देत नसल्याने महादेव हा त्याच्या घरी जावून त्याच्याकडे पैशाची मागणी करून त्याच्या घरच्या लोकासमोर त्याला अपमानीत करीत होता. त्याला ही महादेवकडून घेतलेले उसणे पैसे लवकर काही दयायला जमत नव्हते. तो त्याचे पैसे कसे दयायचे या विचारात सतत असायचा. महादेव घराकडे आला की सुरज त्याला गोड बोलुन दारूच्या गुत्यावर नेत होता. त्याला एखादी दारूची बाटली देवून गप्प बसवित पुढचा वायदा घेत होता. दारूच्या नशेत महादेव ही मला पुढच्या वेळी दारू नको आहे मला माझे सगळे पैसे पाहिजे बघ म्हणून सांगून परत जात होता. व्याजाला सोकला आणि मुद्दलाला मुकला अशी अवस्था महादेव याची झाली होती. दिलेले हात उसणे पैसे काही लवकर परत मिळण्याची चिन्हे दिसत नव्हती. गेल्या अनेक वर्षापासून त्याची मैत्री असल्याने त्या दोघात सहसा कधी भांडण होत नव्हते. दोघे ही एकमेकांना समजावून घेत होते. परंतू अलिकडच्या काही दिवसात सुरजला महादेव विषयी आकस निर्माण झाल होता. तो सतत आपल्याला खाली मान घालायला लावत आहे त्याला एकदा कशाची तरी भिती दाखवून गप्प बसवायचेच असे त्याने मनातून ठरविले होते. आता तो पैसे मागायला आला की आपण त्याला कायमची भिती दाखवून गप्प बसू याची त्याला खात्री होती.म्हणून तो आता त्याच्यावर डुख धरून होता.त्यातच सोमवार मंगळवार गंवडी कामाला त्या दोघांनी ही सुट्ठी घेतली असल्याने महादेव हा पैशासाठी सहजच त्याच्या घरी नाझरे कॅप वडगाव येथे गेला होता. त्यावेळी घरात सुरज हा होता. सकाळ सकाळी महादेव हा पैशासाठी दारात आल्याचे बघून त्याचे डोकेच सटकले होते. त्यातच महादेव हा त्याच्या दरवाजासमोर उभा राहूनच सुरजकडे पैशाची मागणी करत त्याला अर्वाच्च भाषत शिव्या देत होता. पैसे दयायला जमत नाहीत तर तू पैसे घेतलेस कशाला? असे म्हणून तो ओरडत होता. त्यामुळे सुरजच्या शेजारचे लोक ही बाहेर येवून तमाशा बघत होते. महादेवच्या तोंडाचा पट्टा चालू होता. त्यावेळी सुरज आणि त्याच्या घरचे लोक महादेवला तुम्ही जरा शांत राहा आम्ही एक दोन दिवसात पैशाची काही तरी व्यवस्था करतो असे सांगत होते. पण महादेव हा शांत न राहता मला आताच्या आता माझे घेतलेले पैसे परत दया नाही तर मी पुढचे बघतो असे त्यांना म्हणाला यावर सुरज हा महादेवचा राग शांत करत त्याला बाजुला घेत म्हणाला माझे वडिल आजारी आहेत इथे दंगा नको चल आपण बाजुला जावूया म्हणत त्याला नेहमी प्रमाणे दारूच्या दुकानात नेले. तेथे त्या दोघांनी मनसोक्तपणे दारू ढोसली. त्यानंतर महादेवचा थोडाफार राग शांत झाला. ते दोघे ही नशेतच जवळच्या एका रिक्षा स्टॉपजवळ बरळत आले. तेथे पुन्हा महादेवने त्याच्याकडे परत पैशाची मागणी करून मला माझे पैसे हवेत आहेत काही ही करून मला ते पैसे दे. मी माझ्या बहिणीच्या घरात राहयला असल्याने त्यांना घरखर्चाला पैसे दयावे लागतात. फुकटचे खाऊन चालत नाही असे त्याला खोचून म्हणाला यावर सुरज हा त्याच्याकडे रागाने बघत मी काय फुकटचे खातो काय मी ही काम करतोच नव्हे, पैसे दयायला थोडेसे मागे पुढे होत आहे तेवढे सांभाळून घे. घरासमोर येवून उगाच दंगा करू नकोस सक्त ताकीद दिली. त्यावर महादेव ही त्याला रागाच्या भरात म्हणाला मी पैसे दयायचे आणि मीच गप्प बसायचे हे कसे काय? म्हणून तो त्याच्यावर ओरडत होता. दोघे ही नशेत बरळत रस्त्याने चालले असल्याने दोघांच्याकडे जाणाऱ्या येणाऱ्याचे फारसे लक्ष नव्हते. दोघे ही दारूडे आहेत हे त्याच्या लक्षात आले होते. डुलत डुलत ते येळ्ळरू क्रास येथे आले. तेथे ही गर्दी ही होतीच. त्या गर्दीत ते दोघे एकमेकांना शिव्या देत चालले होते. दोघामध्ये भांडण सुरू होताच कळत नकळतपणे सुरजने आपल्या खिशातील रेडियम कापण्यचा कटर काढला आणि क्षणार्धात त्याने तो कटर महादेवच्या गळ्याला लावून त्याचा गळा कापला. त्यामुळे महादेवची श्वसननलिका कापली गेली आणि त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू होऊन तो रस्त्यावर पडला. त्याचवेळी गर्दीचे भान राखत सुरज हा त्याचेवर वार करून पळून गेला. ही गोष्ट तेथून जाणाऱ्या येणाऱ्याच्या लक्षात आल्यावर त्यांनी आरडा ओरडा करीत पळून जात असलेल्या सुरजला आडविण्यचा प्रयत्न केला पण तो पळून जाण्यात यशस्वी झाला. इकडे महादेवची श्वसननलिका कापली गेल्याने मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊन जागीच त्याचा मृत्यू झाला.या घटनेची माहिती रस्त्यावरील एका दक्ष नागरिकांने शहापूर पोलीसांना कळविल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.पोलीस निरीक्षक राघवेंद्र हावलदार,उपनिरीक्षक मंजूनाथ नाईक यांनी घटनास्थळाला भेट देवून घटनेची पाहणी करून तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसाना दिल्या. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मयताची ओळख महादेव जाधव अाी पटविली होती. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत महादेव जाधव याच्या घरच्या लोकांना दिल्यावर ते ही घटनास्थळी दाखल झाले.पोलीसांनी मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगाव येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी घटनास्थळावरील लोकांच्याकडून घेतली होती. घटनास्थळावरील एका दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना कैद झाली असल्याने पोलीसांना मारेकऱ्यापर्यत पोहचले होते. या घटनेनंतर संशयीत आरोपी सुरज केदारची हा वडगाव येथील एका स्माशानभूमीत जावून लपला असल्याची माहिती पोलीसांना मिळताच त्यांनी त्याला तेथून ताब्यात घेवून शहापूर पोलीस स्टेशनला आणले होते. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली. मयत महादेव जाधव याचा भाचा संदीप मारूती कुंडकर रा.भरतनगर याने या घटनेची तक्रार शहापूर पोलीसात दिल्याने पोलीसांनी महोदव मारुती जाधव (वय ५०) याच्या खून प्रकरणी सुरज पुंडलिक केदारीचे (वय ३५) रा.नाझरे कॅप वडगाव याच्या विरोधात आय.पी.सी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली. या घटनेचा पुढील तपास शहापूर पोलीस करत आहेत.

पान ८ वरून....

## वातावरण बदलाचे शिक्षण देणारे विद्यापीठ...

गरजचे आहे. एकंदरीत सृष्टीवरील बदलत्या वातावरणाचा मोठ्या प्रमाणात अभ्यास व्हावा. वातावरण बदलाचे महाराष्ट्राशी संबंधित संभाव्य परिणाम, वातावरण बदलाचे नैसर्गिक आणि कृत्रिम कारणे आहेत. यामुळे साथीचे आजार वाढण्याची शक्यता जास्त आहे. यामुळेच महाराष्ट्र सरकारने प्रथमच वातावरण बदलासंबंधीचा अभ्यास करण्यासाठी समिती निर्माण केली आहे. जागतिक तापमान वाढ आणि त्याचा अभ्यास याद्वारे केला जाणार आहे. भविष्यात केवळ अभ्यासक्रम आणि पदवी शिकविण्याची गरज नाही तर संकटाचा सामना करणारे अभ्यासक्रम तयार करावे लागणार आहेत. सध्याच्या काळात कोरोना व्हायरसने कहर केला आहे. त्या संदर्भात रोज वेगवेगळ्या बातम्या ऐकल्यामुळे सर्वसाधारण व्यक्ती हा गोंधळून गेला आहे. अशा वेळेस शिक्षण संस्थेने उत्तम प्रकारच्या लॅबची निर्मिती करावी. तेथे हुशार विद्यार्थ्यांकडून योग्य संशोधन करून घ्यावे. जेणेकरून मानव कल्याण साधले जाईल, असे ही रामराजे नाईक निंबाळकर यांनी सांगितले. डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले,जागतिक स्तरावरील स्पर्धा करणारे शिक्षण भारतात एमआयटीने कमी खर्चात उपलब्ध करून दिले आहे. बर्याच विद्यार्थ्यांकडे डिजिटल साधन नसल्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. त्यामुळे राज्य सरकारने डिजिटल राईट टू एज्यूकेशन साठी पॉलिस तयार करुन विद्यार्थी आणि शिक्षण संस्था यांच्यातील दुरावा कमी करावा. तसेच रोजगाराभिमूख शिक्षण देण्याची गरज आहे. आजची पिढी ही खूप हुशार आहे. अशावेळेस शाळेतील शिक्षणाच्या पुढे जाऊन आपल्याला नवी धोरणे आणावी लागतील. शिक्षणातील धोरणात लवचिकतेचा गुण समाविष्ट करणे काळाची गरज आहे. डॉ. विजय भटकर म्हणाले, भारताला एकसंघ करण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेल्या आव्हानंतर ते शक्य झाले. असेच कार्य एमआयटी ग्रूप करीत आहे. या संस्थेच्या चार विद्यापीठांच्या माध्यमातून विविध क्षेत्रात नेतृत्व करणारे व्यक्तिमत्व निर्माण केले गेले आहे. मूल्यात्मक शिक्षणाचा मुळ उद्देश ठेवून विज्ञान, तंत्रज्ञान आणि आध्यात्माची सांगड घालून शांती निर्मितीसाठी शिक्षण दिले जात आहे. सध्या डिजिटल युग असल्याने त्या संदर्भातील शिक्षणाची पॉलिसी करून जगातील सर्व शिक्षण संस्थांनी ते आत्मसात करावे. या शिक्षण संस्थेमुळे नेतृत्वगुण असलेले वैज्ञानिक, संशोधक, शिक्षणतज्ञ, लेखक आणि धोरणकर्ता निर्माण करण्यास महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, एमआयटीची स्थापनेसाठी घैसास कुटुंबाचे योगदान महत्वाचे आहे. त्यातूनच एमआयटीचा विकास झाला. शिक्षणाला आध्यात्माची जोड देऊन विद्यार्थी घडविणे हे ध्येय होते, ते आता पूर्णत्वास आले आहे. या वाटचालीत अनेक संस्था उभा राहिल्या त्यापैकी एमआयटी विश्व शांती विद्यापीठ निर्माण झाले. त्यातच आणखी तीन विद्यापीठांची निर्मिती झाली. भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञान हे आजच्या पिढीच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न या संस्थेतून केला जात आहे. त्यातूनच उदयाची सर्वगुण संपन्न पिढी निर्माण होणार आहे. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले,आज एमआयटीचे बीज हे वटवृक्षामध्ये परिवर्तन होत असतांना डॉ. कराड यांनी केलेल्या सर्व कार्याची आठवण होत आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून जगातील सर्वात मोठ्या विश्व शांती घुमटाची निर्मिती झाली आहे. एमआयटीच्या विकासाच्या टप्प्यात सुरवाती पासून बरेच व्यक्ती जुळलेल्या आहेत. त्यांच्याच सहयोगातून हे कार्य उभे राहिले आहे. डॉ. मंगेश तु. कराड म्हणाले,संशोधन आणि नवनिर्मितीचे वातावरण तयार करणे, रोजगारवृद्धी आणि क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्मित करण्यासाठी एमआयटी ग्रूपचा मानस आहे. सध्याचा काळ झपाट्याने बदलत आहे त्यानुसार समाजाला शिक्षण देण्याचे कार्य करते. आता जागतिक पातळीवरील शिक्षण देवून त्यानुसार नेतृत्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहात. डिजिटल युगाची सुरूवात झाली असल्याने शिक्षण क्षेत्रात भविष्यात एज्यूटेक कंपन्यांनी पुढे येण्याची गरज आहे. यानंतर नानिक रूपानी यांनी एमआयटी ग्रूप ने जागतिक स्तरावर नेतृत्व करण्याची क्षमता असलेले रोजगार निर्माण केले आहे. भविष्यात भारत जगाचे नेतृत्व करेल असे सांगितले. तसेच पुरस्कार्थी कोंडाबाई भोसले व सूर्यकांत महाडीक यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. स्वाती कराड चाटे यांनी आभार मानले.

## १५ ऑगस्टला आत्महत्या करण्याची ...

व मुख्याधिकारी नगरपंचायत देवणी यांच्या कडे निवेदनादवारे केली आहे. या निवेदनावर श्रमिक हक्क अभियानाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भाऊ सुर्यवंशी, पांडुरंग कदम, दशरथ कांबळे, अकबर शेख, वहिद काझी, युनुस मनियार, प्रकाश सुर्यवंशी, इब्राहिम बागवान, दिनकर गिरबोने, जब्बार सय्यद, अलिम मल्लेवाले, दत्ता तपसाळे, माजीत डोनगावे, अखील मल्लेवाले, शिवाजी तपासे, नरसींग लातुरे यांच्यासह अनेकांच्या सह्या आहेत.

## पालघर जिल्ह्यातील एलएफएम संस्थेच्या...

सर्व विजेत्यांना LFM या संस्थेचे कोच सुर्यप्रकाश मुंडापाट यांच्या मौलिक मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण मिळाले आहे. सदर स्पर्धेमध्ये रोहन साटम आणि डॉ. अतुल सुर्वे यांनी राज्यस्तरीय रिफ्रीची परीक्षा पास होऊन यश संपादन केले आहे. सर्व विजेत्यांचे अभिनंदन आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा!

## राज्यव्यापी आराधी, गोंधळी, वाघ्या ...

मिळावे या न्याय मागणीसाठी आजपासून राज्यव्यापी आराधी-गोंधळीवाघ्या-शाहिर भजनी परिषद राज्यभर विविध संघटना, संस्था, मंडळे, कलापथके यांना सोबत घेऊन जनजागर अभियान मागण्याची पुर्तता होईपर्यंत करणार असा इशाराही यावेळी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणा यांना दिला आहे. ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, वृद्धलोककलावंतांना मानधन देण्यासाठी जिल्हा परिषद अंतर्गत जी कमिटी आहे त्यांना दरवर्षी फक्त शंभरच नविन लोकांना मानधन योजना मंजूर करण्याचे अधिकार आहेत त्यामुळे कमिटीवर असणारे ज्यांनी ज्यांनी अर्ज केला त्यांना ते मानधन योजनेचा लाभ देऊ शकत नाहीत. याची जाणीव करून देण्यासाठी गेली अनेक वर्ष शासन दरबारी आम्ही प्रयत्न करीत आहोत. परंतू झोपेचे सोंग घेतलेले विविध राजकीय पक्षातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून असलेल्या लोकांनी या मागणीकडे दुर्लक्ष केले. याचे परिणाम त्यांना येणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगर पालिका आणि नगर पालिका निवडणकीत भोगावे लागणार आहेत. वेळीच जागे होऊन राज्याचे मख्यमंत्री मा.ना. उद्धवजी ठाकरे साहेब आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री मा.ना. अमित विलासरावजी देशमुख यांना या मागण्याच्या पुर्ततेसाठी अग्रह धरावा असे कळकळीचे नम्र आवाहन विनंती रूपाने निवेदनाद्वारे राज्यातील सर्व जिल्ह्यात देणार येणार आहेत. यावेळी भाजपाचे जेष्ठ नेते व्यंकटराव पन्हाळे, राज्यव्यापी आराधी-गोंधळी-वाघ्या-शाहिर भजनी परिषदेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष ह.भ.प. भास्कर चव्हाण महाराज रामेश्वरकर, माजी सरपंच विक्रांत पाटील, माजी सरपंच सौ. म्हेत्रे, पाणी फाउंडेशनचे अनमोल पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते दंडवत यात्रेकरूंचा सहृदय सत्कार करण्यात आला. यावेळी निलंगा, औसा, उमरगा, तालुक्यातील अनेक पारंपारीक लोककावंतातील कलापथक प्रमुख उपस्थित होते.

## वसई न्यायालयात लोकन्यायालयाचे...

यांनी लोकांनी आपसातील असलेले किरकोळ स्वरुपाचे दिवाणी, फौजदारी, कौटुंबिक वाद प्रकरणे व समज-गैरसमज अशा काही करणांमुळे दुभंगलेले संसार अशी प्रकरणे समोपचाराने मिटविण्यासाठी लोकन्यायालय हे उत्तम साधन असुन नागरिकांनी या संधीचा प्रत्येक लोकअदालतीत तसेच पुढील लोकअदालतीची लगेचच तयारी सुरु झाली असुन जास्तीत जास्त पक्षकारांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. लोकन्यायालय यशस्वीतेसाठी जिल्हा व सत्र न्यायालय येथील सर्व न्यायाधीश, वकील वर्ग, अधीक्षक व्हि. एस. ढवळ व वसई तालुका विधीसवा समितीचे लिपीक एस.बी. राठोड व न्यायालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लातूर शहरातील एमआयएमएसआर ...

त्यामुळे प्रत्येक मातेने आपल्या बाळास एक ते दिड वर्ष तरी स्तनपान करणे आवश्यक आहे. मातेने व्यवस्थीत बसून स्तनपान दिल्याने स्तनपान सुरळीतपणे होते. शिवाय गरोदरपणापासून स्तनांग्रहाची काळजी घेतल्यास बाळ व मातेची प्रकृती चांगली राहाते. यावेळी बोलताना संधीवात तज्ज्ञ डॉ. मोहिनी गाणु म्हणाल्या की, आईच्या दूधात कॅल्शियम भरपूर प्रमाणात असल्याने बाळाची कॅल्शियमची गरज ही स्तनपानातून भागते. साधारणपणे बाल वयापासून ते तरुण वयापर्यंत हाडांची वाढ होत असते. महातारपणी हाडे ठिसूळ होवू नयेत यासाठी लहान वयापासून काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी लहान वयात ५०० मी.ग्रा. दूध, हिरव्या पालेभाज्या, बदाम-काजू, अंबट फळे यांचे सेवन करावे. त्यासोबत 'ड' जिवनसत्वाची मात्रा भरून काढण्यासाठी आठवड्यातून किमान एकदा ३० मिनीटे उन्हात बसावे. चालणे, धावणे, दोरीवरच्या उड्या, खेळणे व योगासणे अशा प्रकारचे व्यायाम केल्याने हाडे बळकट होण्यासाठी मदत होते.यावेळी बोलताना नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. वर्षा कराड म्हणाल्या की, आईचे दूध हे बाळासाठी सर्वश्रेष्ठ अन्न असून ते अमृता समान आहे. त्याचा उपयोग प्रत्येक मातेने आपल्या बाळास नियमितपणे स्तनपान करुन करावा. बाळासाठी आईच्या दूधाचे फायदे अमर्याद आहेत. मात्र गैरसमजूतीमुळे समाजातील अनेक माता आपल्या बाळास स्तनपान करीत नाहीत. अशा मातांमध्ये जागृती व्हावी हा स्तनपान सप्ताह साजरा करण्यामागचा हेतू आहे. यावेळी बोलताना बालरोग तज्ज्ञ डॉ. विद्या कांदे म्हणाल्या की, पहिले सहा महिने बाळास इतर अन्न वर्ज्य असून बाळास केवळ आईचे दूधच द्यावे. स्तनपान ही केवळ एकट्या मातेची जबाबदारी नसून ती कुटूंबाची व सामाजिक जबाबदारी आहे. नकारात्मक मानसिकतेमुळे सध्या समाजातील ५० टक्केच माता नियमित स्तनपान करतात. परिणामी स्तनपानाअभावी समाजात कुपोषीत बालकांचे प्रमाण वाढत आहे. कोरोना संक्रमीत माताही सुरक्षा नियमांचे पालन करुन बाळास स्तनपान करु शकतात व गरोदर मातेला लसीचे दोन्ही डोस घेता येतील.यावेळी डॉ. एन.पी. जमादार, डॉ. सरिता मंत्री, डॉ. सी. एस. पाटील, मेट्रन मिना पवार यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. शिल्पा दडगे यांनी तर आभार डॉ. संस्कृती मरळी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. लिला भट्टड, डॉ. संजिवनी तांदळे, डॉ. आशा कोल्हे, डॉ. शैला बांगड, डॉ. चारुशिला उदगीरकर, डॉ. शितल शेळके, डॉ. कल्पना जाजू, डॉ. भागवत लवटे, डॉ. वर्धमान उदगीरकर, डॉ. दत्तात्रय कुलकर्णी, डॉ. विरेंद्र पाटील, प्रा. पद्मावती यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील प्राध्यापक, डॉक्टर, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, रुग्ण, माता व नातेवाईक उपस्थित होते.

## पालघर जिल्हा माहिती कार्यालयाच्या...

कॉन्फरन्स हॉल तसेच कार्यालयाचा अभिलेख ठेवण्यासाठी स्वतंत्र व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असा अभिलेख कक्ष देखील आहे. तसेच कर्मचारी वर्गासाठी स्वतंत्र दालन देण्यात आले आहेत. नवनिर्मित कार्यालयाच्या अंतर्गत सजावट व बांधकामाबाबत डॉ. मुळे यांनी समाधान व्यक्त केले. आवश्यक ते अंतर्गत बदलही सूचविले. लवकरच शासनाच्या आदेशानंतर जिल्हा माहिती कार्यालय नव्या वास्तुत स्थालांतरीत होईल असा विश्वास व्यक्त केला.

## साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे ...

दत्त गवई ज्ञानेश्वर माऊली वाघमारे, किशोर जाधव सर, गुरुलिंग धुमाळ, नागनाथ काटे, विकी शेंडगे, नितीन वाघमारे, रमजान सय्यद व गावातील विविध मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. सदर कार्यक्रम क्रांतिवीर लहुजी शक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष किसन नाना पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमात राजकुमार हौशेट्टी मालक व मान्यवरांच्या शुभहस्ते गरीब व होतकरू मुलांना शालेय वह्यांचे वाटप व खाऊचे वाटप करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून तरुणांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिश पाटोळे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार अजय बोराडे यांनी मानले या कार्यक्रमात समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

## वाडा बस स्थानकात खाजगी...

शेतकऱ्याची सोळा हजार रुपये असलेली पिशवी अशाच एका दुचाकीस्वाराने लांबवली असल्याचा तक्रारी अर्ज या शेतकऱ्याने वाडा पोलिसांत केला आहे. बस स्थानकात बाहेरील वाहनांनी शिरकाव केल्याने येथील प्रवाशी, बसचे चालक वाहक व इतर कर्मचाऱ्यांना या अनधिकृत पार्किंगच्या वाहनांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या वाहनांना वाडा बस स्थानकात मज्जाव करावा अशी मागणी होत आहे. या बाबत आगार व्यवस्थापक मधुकर धांगडा यांच्याकडे विचारना केली असता बाहेरील वाहनांनी बस स्थानकात प्रवेश करू नाही किंवा आपली वाहने स्थानकाच्या बाहेरच लावावी आशा सूचना ध्वनिक्षेपकातून वारंवार केल्या जात आहेत. त्याच बरोबर एका कर्मचारीही स्थानकात नियुक्ती केली असल्याची माहिती त्यांनी दिली. तर बस स्थानकातील अनधिकृत पार्किग कायमची बंद करण्या बाबतचे पत्र लवकरच वाडा पोलीस व आगार व्यवस्थापकाकडे देणार असल्याचे वाडा तालुका प्रवासी संघाचे सचिव किरण थोरात यांनी सांगितले.

## काजळ हिप्परगा येथे अण्णाभाऊ साठे ...

गणेश चामवाड, अनिल बेंबडे, इस्माईल आत्तार, राजाराम नामपल्ले, व्यंकट वाघमारे सतिष नामपल्ले, प्रविन जंगापल्ले, आशिष जंगापल्ले, यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रल्हाद कापसे प्रमुख पाहुणे प्रा.मनोज रेड्डी, बाबुराव जंगापले, दिलीप कापसे, अण्णाभाऊ साठे जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रवीण जंगापले हे मंचावर उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संमेश्वर जंगापले आणि अजय जंगापल्ले यांनी केले. या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले.

09 TO 15 AUGUST 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 07/08/2021 9:12 PM Page 1



# सिमेंट रस्त्याचे निकृष्ठ कामामुळे पोलीस चौकी समोरच टेंपो अडकला खड्यात!

**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी-कल्याण-शीळ या रस्त्याच्या कामात ठेकेदाराने हलगर्जीपणा व मनमानी कारभार केला असून या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याची तक्रार मार्च २०२१ मध्ये नुकताच पंचायतराज राज्यमंत्री पदाचा पदभार घेणारे खासदार कपिल पाटील यांच्यासह महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे भिवंडी तालुका अध्यक्ष परेश चौधरी यांनी केली होती. त्यातच रस्त्याचे निकृष्ठ काम झाल्याचे आता समोर आले असून या रस्त्यावरील कोनगाव पोलीस चौकी समोरच रस्ता व फुटपाथच्यामध्ये भगदाड पडून त्यामध्ये टेम्पो अडकल्याची घटना घडली आहे. यामुळे रस्त्याच्या कामाबाबत पुन्हा प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.



भिवंडी-कल्याण-शीळ या मार्गावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असल्याने या महामार्गावर रस्ता रुंदीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरु आहे. या रस्त्यावरून कल्याण, बदलापूर, अंबरनाथ, डोंबिवली, उल्हासनगर तसेच मुरबाड येथे जाण्याकरीताचा एकमेव व महत्वाचा तसेच मुख्य रस्ता असून हजारो हलक्या व अवजड वाहनांची वाहतूक या रस्त्यावरून होत असते. भिवंडी-कल्याण-शिळ सहापदरी सिमेंट कॉक्रीटचा रस्ता बनविण्यात येत असून लॉकडाऊनच्या काळात देखील हे काम मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. परंतु या काळात तयार करण्यात आलेला रस्ता निकृष्ठ दर्जाचा असल्याची तक्रारी केल्या होत्या. मे, साकेत इन्फ्रा ह्या कंपनीच्या माध्यमातून हलक्या दर्जाचे सिमेंट कॉंक्रेट या रस्त्याच्या कामासाठी वापरले जात असून ठिकठिकाणी रस्त्याला तडे गेले असून कामही संथगतीने सुरु आहे. त्यामुळे आजही टोलनाका ते पिंपळघरपर्यत वाहतूक कोंडीची समस्या कायमच आहे.

**मग संबधित विभागाने काय कार्यवाही केली?**

भिवंडी बायपास येथे असलेल्या टाटा आमंत्रा या निवासी संकुलनासमोर ठेकेदाराने चक्क मातीवरच रेडी मिक्स सिमेंट टाकून रस्ता बनवला असल्याचे पुरावे देखील, त्यावेळी मनसेचे चौधरी यांनी रस्ते विकास महामंडळाला सादर केले होते. तसेच स्त्याच्या निकृष्ठ कामाबाबत व ठेकेदारावर कारवाई व्हावी तसेच संबंधित कामाची आयआयटी मार्फत चौकशीची मागणी केली होती. मात्र त्यावर संबधित विभागाने काय कार्यवाही केली? असा प्रश्न टेम्पो रस्ता व फुटपाथ मध्येच पडललेल्या खड्यामुळे निर्माण झाला आहे. दरम्यान टेम्पो खड्यात अडकल्यानंतर चालकाने तातडीने जेसीबीच्या साह्याने काढला. मात्र या घटनेवेळी पोलीस चौकीत एकही कर्मचारी नसल्याने चौकीला कुलूप असल्याचे दिसून आले.


# तीस हजारांसाठी अपहरण; एकाला कर्नाटकातून अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

तीस हजार रुपयांसाठी तरुणाचे अपहरण करणाऱ्या कर्नाटकातील एका व्यक्तीला सोलापूर येथील सदर बझार पोलिसांनी बारा तासात अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून तरुणाची सुटका देखील करण्यात आली आहे. अनिल राठोड (३०) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. याबाबत पूजा विशाल पाटील (३३) यांनी सदर बाझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विशाल पाटील असे अपहरण झालेल्या तरुणाचे नाव आहे. विशाल हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल होता. तिथून त्याचे अपहरण करण्यात आले होते. अपहरणकर्त्यांनी विशालच्या आईच्या फोनवर संपर्क साधून तीस हजार रुपयांची मागणी केली होती. दुसऱ्या दिवशी पुन्हा सकाळी अपहरणकर्त्यांनी फोन करून रुपये लवकर द्या नाहीतर तुमच्या नवऱ्याला खल्लास करतो असे धमकी देऊन सांगून फोन बंद केला. दरम्यान पूजा यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अल्फाझ शेख व त्यांच्या पथकाने मोबाईल नंबर ट्रेस करून कर्नाटकातील विजयपूर जवळील हंचनाळ तांडा येथे जाऊन तरुणाची सुटका केली व आरोपी अनिल राठोड यास ताब्यात घेतले. विशाल व अनिल हे मित्र असून ऑर्केस्ट्रामध्ये एकत्र काम करीत होते. लॉकडाऊनच्या काळात अनिल याने अन्य एका व्यक्तीकडून तीस हजार रुपये घेऊन विशाल यास दिले. ती रक्कम तो मागत असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. यामध्ये अन्य चार आरोपींचा सहभाग असून त्यांनी कारमधून विशाल यास पळवून नेल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असे माहिती सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर पाटील यांनी सांगितले.

# भिवंडीत लो.टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी


**भिवंडी/अभिजित हिरे**




राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या साजऱ्या करत असतांना या राष्ट्रपुरुषांच्या जीवन कार्यातून आपण एखादा तरी गुण घेऊन आपलं आयुष्य समृद्ध करावे, आपण सातत्याने देशसेवेचा आणि समाजसेवेचा विचार करावा, असे मार्गदर्शन पंचायत समितीचे वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी संजय अस्वले यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून विद्यार्थ्यांना केले. जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ या शाळेने 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे यांची जयंती ऑनलाइन पद्धतीने साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक यांच्या कार्याची महती सांगणारी भाषणे सादर केली. लोकमान्य टिळकांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी २३ जुलै १८५६ रोजी झाला. देशसेवेसाठी त्यांनी पूर्ण आयुष्य वेचले. केसरी आणि मराठा ही वृत्तपत्रे सुरू करून सार्वजनिक गणपती उत्सव व शिवजयंती उत्सव सुरु केले. मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी गीतारहस्य नावाचा ग्रंथ लिहिला. १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचे निधन झाले. अशा पद्धतीची भाषणे विद्यार्थ्यांनी या ठिकाणी सादर केली. तर सिद्धी देसाई या विद्यार्थिनींना अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने त्यांचीच महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती विषयाची कविता सादर करून वाहवा मिळवली. राहनाळ शाळेच्या शिक्षिका संध्या जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी शिक्षिका रसिका पाटील, अनघा दळवी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांचा कथा सांगितल्या. त्यांच्या जीवन कार्याचे महत्त्व महत्त्व सांगितले. तसेच अण्णाभाऊ साठे यांचे कार्याचे माहिती दिली. ऑनलाईन कार्यक्रमाची संकल्पना आणि सूत्रसंचालन अजय पाटील यांची होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन चित्रा पाटील यांनी केले. ऑनलाइन पद्धतीने सादर झालेल्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

# गणवेशधारी पोलिसाचा तो व्हिडीओ झाला प्रसारीत अमरावती पोलिस अधिक्षकांनी केले त्याला निलंबित

**अमरावती/प्रतिनिधी**



अमरावती जिल्ह्यात पाय ठेवताना दादागिरी-भाईगिरी दहा किलोमीटर लांब ठेवूनच यायच भाऊ... अमरावतीत जो कायद्यात राहणार तोच फायद्यात राहणार, कारण कसं आहे ना, कायद्याचा बालेकिल्ला ओनली' अमरावती जिल्हा' असा दिलखेचक संवाद असलेला व हातात पिस्तुलसारखी दिसणारी वस्तू हाती घेत सिनेमातील हिरोप्रमाणे चाल असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याचा व्हिडीओ अमरावती जिल्ह्यात प्रसारीत झाला. २७ सेकंद एवढा कालावधी असलेल्या या व्हिडीओने अमरावती जिल्ह्यात तुफान प्रसिद्धी मिळवली.

या व्हिडीओच्या माध्यमातून गुन्हेगारीचा बिमोड करण्याचा संदेश असला तरी देखील गणवेशधारी पोलिसाने हातात पिस्तुल सारखी दिसणारी वस्तू घेऊन केलेला व्हिडीओ पोलिस खात्याशी योग्य नसल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. अमरावती ग्रामीण पोलिस अधिक्षकांनी त्या कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे. बक्कल क्रमांक २४१३ असलेल्या महेश काळे असे त्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे. चांदुर बाजार पोलिस स्टेशनला कार्यरत असलेल्या महेश काळे या कर्मचारयाची व्हिडीओ तयार करण्यामागची भावना चांगलीच होती. तो व्हिडीओ पोलिस अधिकारी वर्गापर्यंत गेला. व्हिडीओत हिरोप्रमाणे वर्तन करणारा व संवाद फेकणारा तो कर्मचारी अमरावती ग्रामीण पोलिस दलातील असल्याची खात्री झाल्यानंतर त्याला निलंबीत करण्यात आले आहे. काल परवा जळगाव (खान्देश) येथे एका सहायक फौजदाराच्या सेवानिवृत्तीनिमीत्त आयोजीत कार्यक्रमात काही कर्मचाऱ्यांनी मै हू डॉन या गाण्यावर थिरकत ठेका धरला होता. हा ठेका एका गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्या व्यक्तीसोबत धरल्यामुळे त्या पाच पोलिस कर्मचाऱ्यांना हेड क्वार्टरला जाण्याची वेळ आली. दरम्यानच्या कालावधीतच अमरावती ग्रामीण पोलिस दलातील कर्मचाऱ्याने चांगल्या हेतूने तयार केलेल्या व्हिडीओने त्याच्यावर निलंबीत होण्याची वेळ आली. दोन्ही व्हिडीओच्या घटनेत तफावत असली तरी एका ठिकाणी निलंबन तर दुसरीकडे हेड क्वार्टरला जाण्याचा प्रकार समोर आला आहे.

# जेऊर येथे शेतामध्ये महिलेवर विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथे एका ३१ वर्षीय महिला शेतात काम करीत असताना तिचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर विनयभंगाचा गुन्हा अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी नागिणी महादेव कोळी (३१) यांनी महिला पोलीस शिपाई १९०६ सोनकांबळे यांचे समक्ष हजर राहून फिर्यादी जबाब दिली आहे. याबाबत पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी सुरेश शंकर गुजले याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी नागिणी कोळी व पती महादेव रामचंद्र कोळी आपल्या मुलाबाळांसह जेऊर येथील शिवारातील हंद्राळ रोड लगत शेतातील वस्तीवर एकत्र राहण्यास आहेत. तसेच त्यांची सासू धोंडाबाई व नणंद सैदव्वा असे गावातील घरात राहण्यास आहेत. आमचा शेतीवरच उदरनिर्वाह आहे. पीडित महिला नागिणी ३० जुलै रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास पती महादेव हे जंबगी राज्य कर्नाटक येथे आमच्या शेजारी



राहणाऱ्या महेश सिद्धपा कोळी यांच्या पत्नीला बोलावण्याकरिता त्यांच्या सोबत गेले होते. तसेच माझे मुले नेहमी प्रमाणे शाळेत गेले होते. त्यानंतर मी शेतामध्ये मिरचीच्या पिकात खुरपणी करत होते. खुरपणी करीत असताना ११ वाजण्याच्या सुमारास आमच्या शेता जवळील शेतकरी बसू बोरीकरजगी यांच्या शेतात चाकरीस असणारा माझ्या ओळखीचा सुरेश शंकर गुजले रा जेऊर ता अक्कलकोट हा तेथे आला. त्यास मी बघून घाबरले, त्यावेळी त्याने मला तू घाबरली का असे विचारले असता, त्यावेळी त्याने माझा हात पकडला, मी हात सोडविण्यास हिसका मारला असता माझे हातातील मोबाईल खाली पडला, मी त्यास तू इथे का आला आहेस असे विचारले असता त्याने मला तू फार आवडतेस, तुला मी इथे बघायला आलो आहे. तुला इथे केलं तरी कोणी ऐकणार नाही व बघणार नाही, असे म्हणू लागला. त्यानंतर मी माझा खाली पडलेला मोबाईल घेत असताना तो पाठीमागून माझे हात धरून माझ्या अंगाशी झोंबझोंबी करू लागला. त्यास प्रतिकार करून माझा हात झिडकारून आरडाओरडा करू लागले. त्यावेळी त्याने मला आरडाओरडा करू नकोस असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी करून सदरचा घडला. प्रकार कोणास सांगशील तर तुला बघून घेतो अशी दमदाटी करू लागला. त्यावेळी माझा आवाज ऐकून आमचे शेताचे शेजारी राहणारे स्वामींनाथ कोळी व शालाबाई कोळी असे दोघे येत असल्याचे पाहून सुरेश शंकर गुजले हा तेथून पळून गेला. त्यावेळी स्वामींनाथ कोळी व शालाबाई कोळी यांनी माझ्याजवळ येऊन काय झाले का ओरडली असे विचारले असता त्यांना मी सदरचा घडला प्रकार सांगितले. त्यानंतर रात्री दहा वाजण्याच्या सुमारास माझा नवरा गावावरून घरी परत आल्यानंतर मी त्यांना घडलेल्या प्रकारची माहिती दिली व रात्रं झाल्याने दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात भादंवि ३५४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस नाईक दादाराव पवार यांनी करीत आहेत.

# ठाणे जिल्ह्यातील रस्त्यांबाबत नितीन गडकरींकडून विविध निर्णय



**भिवंडी/आकाश गायकवाड**

ठाणे जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी विविध निर्णय घेतले आहेत. केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष व आमदार किसन कथोरे यांच्या पुढाकाराने काल दिल्लीत झालेल्या बैठकीत मंत्री नितीन गडकरी यांनी महत्वपूर्ण आदेश दिले. कल्याणजवळील शहाड रस्त्यावर असलेल्या ओव्हरब्रिज मोठा करण्यासाठी तत्वतः मान्यता, वरप-कांबा ते माळशेज घाट रस्ता चौपदरी करण्यासाठी जमीन अधिग्रहणाचे आदेश, शीळफाटा-बदलापूर-म्हसा-माळशेज घाट रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा, माळशेज घाटात काचेचा स्कायवॉक व गार्डन बांधण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचा आदेश मंत्री नितीन गडकरी यांनी दिला. माळशेज घाटात नवीन बोगदा तयार करण्यासाठी दोन हजार ४७८ कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे आदेशही देण्यात आले. या बैठकीला केंद्रीय पंचायत राज राज्य मंत्री कपिल पाटील, खासदार गोपाळ शेट्टी, आमदार किसन कथोरे यांची उपस्थिती होती.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू मार्फत कार्यक्रमाचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू जि. पालघर यांच्याव्दारे ९ ऑगस्ट २०२१ पासून जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिवासी गौरव सप्ताह साजरा करण्यात येत आहे. सदर गौरव सप्ताह दि. ९ ऑगस्ट २०२१ ते दि.१५ ऑगस्ट २०२१ या कालावधीत राबविण्यात येत असून यादरम्यान खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

१. दि. ९ ऑगस्ट २०२१ रोजी शालेय विद्यार्थ्यांची नृत्य स्पर्धा कोविड-१९ बाबतचे सर्व नियमांचे पालन करून सदर स्पर्धा प्रकल्प कार्यालय डहाणूच्या कार्यक्षेत्रातील तलासरी, डहाणू, पालघर व वसई या तालुक्याच्या ठिकाणी घेण्यात येणार आहेत.

२. के. एल. पोंदा हायस्कुल, डहाणू येथे आदिवासी महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन व विक्री (सदरचे प्रदर्शन दि. ९ ऑगस्ट ते दि. १३ ऑगस्ट पर्यंत स. ११ ते सांय ४ वाजेपर्यंत असेल)

३. दि.१५ ऑगस्ट २०२१ रोजी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यासाठी डहाणू येथे स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन समारंभ व त्यानंतर के.एल. पोंदा हायस्कूल, डहाणू येथे आदिवासी कलाकारांची नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

त्यानंतर नृत्य स्पर्धेमधील विजेत्यांचा बक्षीस वितरण समारंभ, तसेच १० वी व १२ वी तील गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या अनुषंगाने सदर सप्ताहामध्ये कातकरी मुलींना सायकल वाटप, NEET / JEE सेंटर उद्घाटन, कर्मचाऱ्यांसाठी व्याख्यान, वनपट्टे धारकांचे वनहक्क दावे वाटप यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ ते १३ ऑगस्ट कालावलीधील बचतगट प्रदर्शनास नागरिकांनी कोविडचे नियम पाळून भेटी द्याव्यात व सहभागी बचत गटांच्या उत्पादन व विक्रीस प्रोत्साहन द्यावे असे आवाहन प्रकल्प कार्यालयाव्दारे करण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहितीसाठी हर्षद चौधरी ८२३७७६५३४३ व रोहित पाटील ९८६०९६६८६५ यांना संपर्क साधवा. असे आवाहन सहायक प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणु यांनी केले आहे.

## थोडक्यात वृत्तांत




### क्रांतीसिंह नाना पाटील यांना अभिवादन!

मुंबई, दि. ३ : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. मुख्यमंत्री अभिवादनात म्हणतात, क्रांतीसिंह नाना पाटील यांनी ब्रिटीशांच्या अराजकतेला, जुलमांना त्यांच्याच भाषेत उत्तर दिले. ते सत्यशोधकी विचारांचे होते. त्यांनी सामाजिक सुधारणांचाही आग्रह धरला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी खासदार म्हणून लोकसभेत मराठीचा दमदार आवाज घुमवला. अन्यायाविरोधात करारी आणि वंचितांप्रति कनवाळू असा त्यांचा बाणा होता. महाराष्ट्रसुपुत्र क्रांतीसिंह नाना पाटील यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

### जालना येथे ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय

मुंबई : जालना येथे ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय उभारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. यामुळे मराठवाडा व विदर्भातील रुग्णांसाठी उपचारांची सुविधा उपलब्ध होणार आहे. राज्यात पुणे, ठाणे, नागपूर व रत्नागिरी या चार ठिकाणी प्रादेशिक मनोरुग्णालये आहेत. जालना शहर मराठवाडा व विदर्भासाठी मध्यवर्ती असे आहे. या भागातील रुग्णांना उपचारांकरिता पुणे, नागपूर येथे जावे लागते. जालना जिल्हयात प्रादेशिक मनोरुग्णालय व्हावे, अशी अनेक वर्षापासूनची मागणी होती. त्यानुसार जालना येथे प्रादेशिक मनोरूग्णालय उभारण्याचा निर्णय आज घेण्यात आला. यामुळे रुग्णांसाठी आंतररुग्ण उपचार तसेच पुनर्वसन सुविधा उपलब्ध होणार आहे. मनोरुग्णालय उभारण्यासाठी इमारत बांधकाम, यंत्रसामुग्री रुग्णवाहिका, औषधी व उपकरणे व मनुष्यबळ यासाठी १०४ कोटी ४४ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

### कृषी विद्यापीठांतील अध्यापकांना ७ वेतन आयोग

मुंबई : राज्यातील कृषी विद्यापीठांमधील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. राज्यातील कृषी विद्यापीठे संलग्न कृषी महाविद्यालये यामधील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची सुधारित वेतन संरचना १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

### वस्तुसंग्रहालय,ग्रंथालयासाठी जमीन देण्याचा निर्णय

मुंबई : जयसिंगपूर नगरपरिषदेस वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय उभारणीसाठी जमीन देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर (ता.शिरोळ) नगरपरिषदेस वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय उभारणीसाठी जमिनीची आवश्यकता होती. त्यासाठी जयसिंगपूर येथील सि. स. नं. २३५७अ/ १अ/१ क्षेत्र २१०८ चौ. मी. ही शासकीय जमीन विनामुल्य देण्यास मान्यता देण्यात आली.

### पॅरामेडिकलविषयक प्रशिक्षणासाठी आवाहन

मुंबई : कोविड-१९ प्रादुर्भावामुळे आरोग्य व वैद्यकीय सेवा क्षेत्रात विशेषत: पॅरामेडिकल व हेल्थकेअर विषयक आवश्यक कुशल मनुष्यबळ वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार मुंबई उपनगर जिल्ह्यातील आरोग्य क्षेत्रात काम करण्यास स्वारस्य असलेल्यांनी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी मिलिंद बोरीकर यांनी केले आहे. या योजनेत १८ ते ४५ वर्ष वयोगटातील युवा-युवतींना जिल्ह्यातील प्रसिद्ध शासकीय व नामांकित खासगी रुग्णालयामधील क्षेत्रातील निवडक अभ्यासक्रमामध्ये विनाशुल्क प्रशिक्षण देवून प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यात येत आहे. प्रवेश घेण्याकरिता इच्छुक असणाऱ्यांनी https://docs.google.com/forms/d/e/1FIpQLSfXlE-35EmeZdNCQvmuCLgcc3Qqn89ULU7IY6YSfakEBJHrX/viewform?usp=sfšlink या लिंकवर त्वरीत आपली नोंदणी करावी. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य राहिल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर, शोभा शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### तृतीयपंथीयांसाठी तक्रार निवारण समिती गठित

पालघर : जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींच्या समस्या तक्रार निवारण करणेसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीची कार्ये व उद्दिष्टे पुढील प्रमाणे असतील. अ) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे. ब) जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारीचे विहीत कालावधीत निवारण करणे. क) तक्रारी बाबत पडताळणी करुन आवश्यकते नुसार विभागीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण कल्याण मंडळास शिफारस करणे. ड) समितीने तृतीयपंथीयांना भेडसावणाऱ्या अडचणीचा/समस्याचा/तक्रारीचा सखोल अभ्यास करणे व योग्य त्या उपाय योजना शासनास सुचविणे. इ) जिल्ह्यातील तृतीयपंथीयांच्या तक्रारीचे जलदगतीने प्रभावी नियंत्रण व निवारण करणे. पालघर जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींच्या काही समस्या किंवा तक्रार असल्यास त्यांनी समितीचे सदस्य सचिव तथा सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, पालघर, यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, पालघर यांनी केले आहे.

क्राईम Reporter 9890718873

क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

09 TO 15 AUGUST 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 07/08/2021 9:13 PM Page 1



# वातावरण बदलाचे शिक्षण देणारे विद्यापीठ निर्माण करावे -रामराजे नाईक निंबाळकर




**पुणे/प्रतिनिधी**

सध्या जगातील बदलते वातावरण हे मानवासाठी धोक्याची घंटा आहे. त्यामुळे भविष्यात क्लाइमेंट चेंज या विषयावर मोठ्या प्रमाणात अभ्यास करावा लागेल. अशावेळेस एमआयटी ने पुढाकर घेऊन त्या संदर्भात नव्या विद्यापीठाची निर्मिती करावी. असा सल्ला महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी दिला. माईर्स एमआयटी, पुणे आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी तर्फे माईर्स एमआयटीच्या ३९ व्या स्थापना दिन साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रियदर्शनी ॲकॅडमीचे अध्यक्ष व उद्योगपती नानिक रूपानी हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. तसेच, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड. अध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश तु. कराड, उपाध्यक्षा डॉ. सुचित्रा कराड-नागरे, सचिव प्रा. स्वाती कराड -चाटे, अधिष्ठाता प्रा. शरदचंद्र दराडे पाटील आणि माजी कुलसचिव एस. व्ही. उर्फ नाना कुलकर्णी हे उपस्थित होते. तसेच, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, जगविख्यात संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर हे ऑनलाईन उपस्थित होते.

या प्रसंगी लेखक सुधीर देशमुख यांनी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या जीवनावर आधारित विज्ञान, अध्यात्म और विश्वशांति का 'युग द्रष्टा' नामक कॉपी टेबल पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर संस्थेतील उत्कृष्ठ कार्य करणार्या डॉ.सायली पालधीकर, डॉ. अनुराधा पराशर, डॉ. विजय खंडाळे, डॉ. रेणू व्यास, शोभा काळे, इवेलिन शिन सिंग, कोंडाबाई भोसले, गजानन घुगे, वंदना खंडेलवाल, सूर्यकांत महाडीक आणि विलास घाटोळकर यांना माईर्स एमआयटी फाउंडेशन डे अवॉर्ड देवून सन्मानीत करण्यात आले. रामराजे नाईक निंबाळकर म्हणाले,सध्या महाराष्ट्रात विशेषतः मुंबई आणि कोकण क्षेत्रात पडलेल्या पाऊसाचे नियोजन आम्ही करू शकलो नाही. त्या संदर्भात विशेष अध्ययन होणे गरजेचे आहे. मानवाने निर्मित केलेल्या संकटामुळे कित्येक वर्षांपासून वेळेवर पाऊस पडत नाही. हे का होते यावर विचार मंथन होणे ...पान ६ वर

# १५ ऑगस्टला आत्महत्या करण्याची परवानगी द्या! छोट्या व्यावसायीकांची देवणी तहसीलदारांकडे मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील बोरोळ चौक ते हणुमान कट्टा प्रस्थापित व्यवसाईकांचे कांक्रेट घालून, लोखंडी बांबु, पत्रे घालून, नाली व नालीच्या पुढे असे कायम स्वरुपी पक्के अतिक्रमन आसताना सुद्धा याकडे मुद्दाम नगरपंचायत डोळेझाक करते व तसेच बसस्थानक लगत कंपाउंड लगतच्या नालीवर पाली घालून, गाडे उभे करून हातावर पोट असणाऱ्या लहान सहान तात्पुरते व कच्चे अतिक्रमन करणाऱ्यांना नगरपंचायतने वांरवार अतिक्रमण काढण्यासाठी नोटीसा देण्याचे क्षडयंत्र रचले आहे. छोटे व्यावसायीकांना माहमारीच्या काळात उपासमारीच्या खाईत लोटणाऱ्या नगरपंचायतने हे थांबवुन न्याय देण्याचा प्रयत्न करावा अन्यथा स्वातंत्र्य दिनी नगर पंचायतच्या झेंड्याखाली सॅनिटायझर प्राशन करून आत्महत्या करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी छोटया व्यावसायीकांनी देवणी तहसीलदार ...पान ६ वर

## अहमदनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग सिनियर निवड स्पर्धेत

# पालघर जिल्ह्यातील एलएफएम संस्थेच्या खेळाडूंनी १६ पकदं जिंकून स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावला!



**वसई/प्रतिनिधी**

१ ऑगस्ट रोजी वाको इंडिया महाराष्ट्र कीकबॉक्सिंग स्पोटॅर्स असोसिएशन तर्फे राज्यस्तरीय किकबॉक्सिंग निवड स्पर्धा (सिनियर) आयोजित केली होती. ही स्पर्धा कोविडच्या नियमांचे पालन करत कडक निर्बंध मध्ये पार पडली. सदर स्पर्धेमध्ये पालघर जिल्ह्यातील LFM या संस्थेच्या ११ खेळाडूंनी एकंदर १६ पदकं जिंकून सर्वसाधारण विजेतेपदाच्या स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावला. या १६ पदाकांमध्ये १० सुवर्ण, २ रौप्य आणि ४ कांस्य पदकांचा समावेश आहे. यावेळी सायली कान्हात (२ सुवर्ण), मिचेल डिसोझा (२ सुवर्ण), सिद्धांत मुंडापाट (२ सुवर्ण), अक्षय वेरणेकर (१ सुवर्ण, १ कांस्य), सागर भोईर (१ सुवर्ण), इयान रॉड्रिग्ज (१ सुवर्ण), जान्हवी उगले (१ सुवर्ण), राहुल खुबत्या (१रौप्य, १ कांस्य), जोनिटा डाबरे (१ रौप्य), रोहन साटम (१ कांस्य), भव्या ठक्कर (१ कांस्य) स्पर्धकांनी पदके पटकावली. ...पान ६ वर

# राज्यव्यापी आराधी, गोंधळी, वाघ्या, शाहिर आणि भजनी परिषदेची विविध मागण्यासाठी तुळजापूरपर्यंत दंडवत यात्रा

**निलंगा/प्रतिनिधी**

आराधी-गोंधळी-वाघे-शाहिर भजनी परिषदेच्या वतीने पुन्हा एखदा २५ वर्षानंतर महाराष्ट्रात पारंपारीक लोककलावंतांच्या न्याय मागण्यांसाठी दंडवत यात्रा काढून जनजागरणास प्रारंभ केला आहे, असे प्रतिपादन परिषदेचे प्रांताध्यक्ष राजेंद्र वनारसे यांनी नणंद येथे दंडवत यात्रेत सहभागी असणाऱ्या सर्वांचा सहृदय सत्कार भवानी माता मंदीरात आयोजित ऋणनिर्देश सत्कार समारंभात केले. यावेळी भाजपा जेष्ठ नेते व्यंकटराव पनाळे, राजेंद्र वनारसे, ह.भ.प. भास्कर महाराज रामेश्वरकर यांच्या हस्ते पुष्पाताई म्हेत्रे, तात्यासाहेब देशमुख, सुभाषराव जाधव आणि दंडवत यात्रेत सहभागी असणाऱ्या सर्वांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नणंदचे माजी सरपंच माधवराव पाटील, माजी सरपंच



शशिकलाबाई विरगावे, माजी चेअरमन नामदेव मारूती म्हेत्रे, बळीराम तोपन्ना, विक्रम श्रीमंत पाटील, सरपंच हरिदास बोळे, ग्रामसेवक धनंजय कोसले, रूक्मीणबाई अराधीन, राजाराम कुंभार, लक्ष्मण कांबळे, तात्यासाहेब तेलंग, सनिताताई माळी, केसरबाई माळी, परशुराम जाधव, दत्ता मिरगळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचलन पाणी फाऊंडेशनचे अमित तानाजी पाटील यांनी केले. यावेळी श्री वनारसे म्हणाले की, १९९७ पासून राज्यव्यापी आराधी-गोंधळी-वाघ्या-शाहिर-भजनी परिषदेच्या माध्यमातून पारंपारीक लोककावंतांना मबई पर्यंत मानधन मिळविण्याकरीता अर्ज पाठवन चकरा माराव्या लागत होत्या त्या बंद करून मानधन वाटप करण्याकरीता जिल्ह्याला कार्यालय असावे अशी मागणी केली. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात जिल्हा परिषद, समाजकल्याण विभाग अंतर्गत जिल्हा कमिट्या निर्माण झाल्या. या यशस्वी वाटचालीने कार्य करणाऱ्या संघटनेने त्यावेळी पारंपारीक लोककलासंवर्धन व संशोधन केंद्र प्रत्येक जिल्ह्यात निर्माण करावी अशी मागणी केली होती. त्या मागणीची पुर्तता अद्यापपर्यंत झालेली नाही अशी खंतही श्री वनारसे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. पारंपरिक लोक कलावंताना वयाची अट रद्द करून ज्यांनी ज्यांनी म्हणून जिल्हा परिषदेकडे मानधन लोककलावंत मानधन मिळविण्यासाठी अर्ज केला आहे त्या सर्वांना सरसकट दरमहा ५ हजार रूपये मानधन ...पान ६ वर

# वसई न्यायालयात लोकन्यायालयाचे यशस्वीरित्या आयोजन



**वसई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे व जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, ठाणे अनिल पानसरे यांचे मार्गदर्शनाखाली वसई न्यायालयात रविवार दि.०१ ऑगस्ट २०२१ रोजी पार पडलेल्या लोकअदालतीमध्ये दिवाणी स्वरुपाची, तडजोडीस पात्र फौजदारी स्वरुपाची तसेच दाखल पूर्व प्रकरणे इत्यादी तडजोडीसाठी आयोजीत करण्यात आलेल्या लोकन्यायालयात दाखल व दाखलपूर्व अशी एकुण १,१५४ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली, मोटार अपघात नुकसान भरपाईच्या १८ प्रकरणामध्ये १ कोटी ४६ लाख ९२ हजार भरपाई मंजुर करण्यात आली व ग्रामपंचायत क्षेत्रातील थकीत असलेली घरपट्टी एकुण १६ लाख रुपयांची तडजोड करण्यात आली. लोकअदालतीच्या आयोजन प्रसंगी जिल्हा न्यायाधीश-१ तथा अध्यक्ष तालुका विधीसेवा समिती, वसई सुधीर देशपांडे...पान ६ वर

# लातूर शहरातील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक स्तनपान सप्ताहा साजरा




**लातूर/प्रतिनिधी**

जन्मानंतरचे पहिले सहा महिने बाळासाठी आईचे दूध हे पुर्ण अन्न असते. नियमित स्तनपानामुळे बाळ व माता या दोघांचीही प्रकृती चांगली राहाण्यास मदत होते. बाळाच्या जन्मानंतर पहिल्या अर्ध्या तासात स्तनपान केल्याने बाळास आयुष्यभरासाठीची रोगप्रतिकारक शक्ती मिळते. प्रत्येक मातेने आपल्या बाळास नियमित स्तनपान केल्यास सशक्त आणि सुदृढ समाज निर्माण होण्यास मदत होईल. त्यामुळे स्तनपान करवून घेणे, ही केवळ मातेपूरती मर्यादित जबाबदारी नसून कुटूंबाची आणि समाजिक जबाबदारी असल्याचे मत एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना तज्ज्ञांनी व्यक्त केले. येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील बालरोग विभाग आणि भारतीय वैद्यकीय संघटना, महिला शाखा, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान सप्ताहनिमित्त बालरोग विभाग येथे कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुणालयाच्या वैद्यकीय अधिक्षक तथा महिला आरोग्य आणि कुटूंब कल्याण समन्वयक डॉ. वर्षा सौरभ कराड, प्रशासकीय व शैक्षणीक संचालीका डॉ. सरिता मंत्री, आयएमएच्या लातूर शहर अध्यक्षा डॉ. सुरेखा काळे, आयएमएच्या महिला शाखा अध्यक्षा डॉ. मोहिनी गाणु, आयएमएच्या सचिव डॉ. राजश्री सावंत, स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. सी. एस. पाटील, बालरोग विभाग प्रमुख डॉ. विद्या कांदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुरेखा काळे म्हणाल्या की, स्तनपानाचे महत्त्व कळावे यासाठी १ ते ७ ऑगस्ट या कालावधील जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात येतो. स्तनपान हे बाळ व माता या दोघांसाठीही फायद्याचे आहे. आईच्या पहिल्या दूधात प्रतिजैविक औषधे (Cholesterol) जास्त प्रमाणात असतात. त्यामुळे आईचे पहिले दूध बाळासाठी अधिक लाभदायी असते. गर्भधारणेच्या काळात मातेच्या पोटातील गर्भ पिशवी ही मोठी होत असते. नियमित स्तनपान केल्याने गर्भ पिशवी अकुंचन पावून पुर्ववतहोण्यास मदत होते....पान ६ वर


# पालघर जिल्हा माहिती कार्यालयाच्या नवीन जागेचे काम प्रगतीपथावर!



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशासकीय संकुलातील जिल्हा माहिती कार्यालयाच्या जागेचे काम प्रगतीपथावर असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांबाबत कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी आज कामाची पाहणीकरुन सूचना केल्या. यावेळी पालघरचे जिल्हा माहिती अधिकारी, राहुल भालेराव, विभागीय माहिती सहाय्यक, प्रविण डोंगरदिवे, लेखापाल गंगाराम बांगारा आदि उपस्थित होते. काही दिवसांपूर्वी माहिती व जनसंपर्क सचिव तथा महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी जागेची पाहणी केली होती. या जागेवर लवकरच जिल्हा माहिती कार्यालय सुरु करावे, अशा सूचना दिल्या होत्या. पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नविन इमारतीच्या परीसरातील प्रशासकीय इमारत-ब मध्ये जिल्हा माहिती कार्यालयास प्रशस्थ जागा उपलब्ध करुन दिली आहे. या ठिकाणी जिल्हा माहिती अधिकारी यांना स्वतंत्र कक्ष, ऑडिओ-व्हिडीओ रेकॉर्डिंग रुम, पत्रकार परिषदेसाठी ...पान ६ वर

# साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम संपन्न



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील तळे हिप्परगा येथे सालाबाद प्रमाणे यावर्षीही एकच दिवसाची पण विविध सामाजिक उपक्रम राबवणारी जयंती साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे तरुण मंडळ तळे हिप्परगा यांच्या वतीने साजरी करण्यात आली. एक ऑगस्ट सायंकाळी तळे हिप्परगा गावचे लाडके सुपुत्र राजकुमार हौशेट्टी मालक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना चे प्रदेशाध्यक्ष सुरेश अप्पा पाटोळे, राजेंद्र दादा गायकवाड चारिटेबल ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष प्रसिद्ध उद्योगपती मुंबई राजेंद्र दादा गायकवाड, ज्ञान माऊली परिवाराचे...पान ६ वर

# वाडा बस स्थानकात खाजगी गाड्यांचा शिरकाव



**वाडा/वार्ताहर**

वाड्यातील बस स्थानक हे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने बाजारपेठेत कामानिमित्त येणारे दुचाकी व चार चाकी वाहनधारक आपली वाहने चक्क बस स्थानकाच्या आवारात उभी करून जातात; तर तालुक्या बाहेर जाणारे नोकरदार सुद्धा आपली वाहने येथे लावून निघून जातात या वाहनांमुळे बस चालकास गाडी आत लावणे, बाहेर काढणे अशा वेळी त्रास दायक ठरत आहे. तर बस मधून उतरलेल्या प्रवाशांना ही या वाहनांमधून वाट शोधावी लागत आहे. महिला-मुलींची छेड काढणाऱ्या रोड रोमोयोंच्या धूम स्टाईलने येरझाऱ्या चालूच असतात. अशा एक ना अनेक समस्यांनी वाडा बस स्थानक ग्रासले आहे. तीन दिवसांपूर्वी एका ...पान ६ वर

# काजळ हिप्परगा येथे अणणाभाऊ साठे जयंती साजरी



**अहमदपूर/फिरोज शेख**

अहमदपूर तालुक्यातील काजळ हिप्परगा येथे अण्णाभाऊ साठे जयंती वेगवेगळे उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात आले भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले त्यात ३४ युवकांनी आपला सहभाग नोंदवत रक्तदान केले, गावातील मुख्य रस्त्यावर व शाळेतील प्रांगणात १०० वृक्षाची लागवड करण्यात आली व शाळेतील विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, गावात मास्क वाटप आणि आंबाजोगाई ते अहमदपूर रस्त्यावर गावात बसथांबा असलेल्या ठिकाणी प्रवाशांना बसण्यासाठी चार बाकड्याची सोय करण्यात आली. शाळेत विध्यार्थ्यांना किलोमीटर दर्शवनारे फलक लावण्यात आले. र्सवप्रथम उपसरपंच सुरेश नवटक्के यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करूण ध्वजारोहन करण्यात आले, यावेळी ग्रामसेवक राजाराम कांबळे, मा.सरपंच सतीश नवटक्के, ज्ञानोबा बेंबडे, ...पान ६ वर

CMYK